# A PRIZE NOVEL

STYLED

# HAMBÍRRAO AND PUTALÁBÁÍ

OR

# THE REBELLION OF 1857.

PRESENTED TO THE

**DAKSHIṆÁ PRIZE COMMITTEE**

BY

VISHNU JANARDAN PATAVARDHAN,

AND EDITED BY

ARASHARAM A. NÁGPURKAR,

---

Bombay :

PRINTED BY SAKHARAM PARASHURAM PANDIT

AT THE "INDU-PRAKASH" PRESS.

---

1885.

(*All rights reserved by the Editor*).

Price 1¼ Rupees.

# कादंबरी

# १८५७ सालचे बंडाची धामधूम

किंवा

# हंबीरराव आणि पुतळाबाई

यांचें चरित्र.

दक्षिणाप्राइज कमेटीसाठीं

विष्णु जनार्दन पटवर्धन

यांनीं सन १८७३ इसवींत तयार केली ती

परशराम अमृत नागपुरकर

यांनीं

मुंबईंत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

[ छापणार सखाराम परशुराम पंडित. ]

---

१८८५.

( सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यांनीं आपणाकडे ठेविले आहेत. )

---

किंमत १। रुपया.

# प्रस्तावना.

---

आलीकडे या देशांत वर्तमानपत्रद्वारें मराठी भाषेची योग्यता व सरणी दिवसानुदिवस लोकदृष्टीनें बरीच सुधारत चालली आहे असें दिसतें; परंतु ज्या लोकांस वर्तमानपत्रें वाचण्याच्या सोई नाहींत, व कितीएक स्त्रियांस तसेंच अल्पवयी व होतकरू मुलांस जरी वर्तमानपत्रें वाचण्याची अनुकूलता असली तरी तीं प्रस्तुतकाळीं राजकीय व इतर विषय पूर्वापार संबंध चांगलासा माहीत नसले कारणानें आवडेनाशीं होत जाऊन त्यांचे मनांतील वाचण्याची प्रीति कमी होत जाते; ह्या अडचणी दूर करण्याचा विचार मनांत घोळत असतां कितीएक लोकांनीं प्रयत्न करून ऐतिहासिक व मनोरंजक ग्रंथ लिहिले आहेत, व अशा कामांत उत्तेजन येण्याकरितां दक्षिणाप्राइज कमिती यांजकडून वारंवार जाहिराती प्रगट होऊन ग्रंथ करणाराचे मनांत उमेद उत्पन्न होत आहे, अशी स्थिति पाहून व दक्षिणाप्राइज कमिती यांनीं सन १८५७ सालचे शिपाई लोंकांचे बंडाचे संबंधानें एक ऐतिहासिक कादंबरी लिहिणारास बक्षिस मिळण्याची जाहिरात प्रसिद्ध केली ती पाहून जरी ह्या ग्रंथकरणाराचें ज्ञान विशेष नाहीं व बंडाविषयींची विशेष माहिती असण्याचा संभव नाहीं तरी केवळ ग्रंथ लि-

हिण्याचा हुरूप मनांत धरून कांहीं त्या वेळेचे वर्तमानपत्रांतून व कांहीं त्या वेळचे संबंधानें झालेले ग्रंथांतून माहिती घेऊन आणि वर दर्शविलेले उद्देश मनांत आणून यथामतिनें या ग्रंथाची रचना केली आहे.

हा ग्रंथ तयार करून विद्वज्जनांस आश्रय देणारी जी दक्षिणाप्राइज कमिती तिजपुढें सादर करण्यांत आला, तेव्हां त्या कमितीनें तो पसंत करून त्याजबद्दल बक्षीसही दिलें, त्याबद्दल ग्रंथकर्ता कमितीचा फार आभारी आहे. या कमितीचे कितीएक विद्वज्जन सभासद यांनीं या ग्रंथावर जे अभिप्राय दिले आहेत त्यांचे कांहीं उतारे दाखल केले आहेत. त्यांवरून जरी या ग्रंथाची योग्यता वाचकांचे लक्षांत येण्याजोगी आहे तरी तेणेंकरून ग्रंथकर्ता आपले ठिकाणीं विद्वत्तेचा गर्व न मानतां केवळ उत्तेजनार्थच विद्वान लोकांनीं आपला बहुमान केला आहे असें समजून हल्लीं हा ग्रंथ जनसमूहापुढें सादर करीत आहे. तर यांत जे विसंगतपणाचे व दूरान्वयाचे दोष तसेच व्याकरणनियम किंवा ऐतिहासिकसंबंध यांची न्यूनता हीं दिसून येतील त्यांविषयीं ग्रंथकर्त्यास माफी करून प्रसंगविशेषीं झालेल्या चुका पुनः छापते वेळेस न होऊं देण्यासाठीं पत्रद्वारें सूचविल्यास त्याबद्दल ग्रंथकर्ता फार आभारी होईल.

ग्रंथकर्ता.

## द. प्रा. कमितीचे सभासदांचे अभिप्रायां-
## तील उताऱ्याचें भाषांतर.

१. ज्या ऐतिहासिक गोष्टींचें विशेष वर्णन करावयाचें त्यांचे अनुरोधानें हंबीररावाचें चरित्र दाखववेल तितकें या कादंबरींत दाखविलें आहे व या कादंबरीचा कथाभाग अगदीं उघड असा आहे. तींत कोठेही दुर्बोधपणा नाहीं. बंडाचा आरंभ, त्याची मध्यावस्था व लय यांविषयीं या कादंबरींत जें वर्णन केलें आहे तेणें करून ही गोष्ट बरेच अंशीं मनोवेधक झाली आहे. या कादंबरींत मुख्यत्वें करून स्तुतीस पात्र एक विशेष प्रकार असा आहे कीं, विचित्र आणि मनोहर परिणामाचा ठसा वाचकांचे अंतःकरणावर उठावा ह्मणून कितीएक ग्रंथकर्त्यांनीं अवाढव्य व संबंधरहित गोष्टी लिहून व आपले पात्राचे संबंधानें अतिशय सद्गुणदर्शक किंवा अतिशय अघोरकर्मी वर्तणुकींचीं वर्णनेंही करून दाखविलीं आहेत. तीं अशीं कीं, त्यांचें अनुकरण करावें असें मुळींच वाटेनासें होतें; किंवा अतिशय महत्त्वाच्या आणि विसंगत अशा गोष्टी सांगून कुशाग्रबुद्धीचे लोकांचे मनांत आनंद उत्पन्न करावा ह्मणून प्रयत्न केलेले असतात; परंतु तेंही साधले जात नाहींत; तसा प्रकार या कादंबरींत नाहीं. शिवाय ही गोष्ट अगदीं फुशारकी रहीत आणि सहजगत्या घडल्यासारखी रचलेली आहे. नायक हंबीरराव हा साधारण

मनुष्य कल्पिलेला आहे, तेव्हां अर्थातच त्याजकडून झालेलें वर्तनही असाधारण किंवा अतिशयोक्तीसारखें नाहीं. त्याचे मनोविकार आणि शौर्यधैर्यादिक गुण त्याचे स्थितींत असलेले मनुष्याचे वर्तनांत बहुतेक आढळणारे असेच आहेत; त्याचे सद्गुणांत उत्तम म्हटले तर तारतम्य व स्वामिभक्ति व स्वदेशप्रीति हेच दाखविले आहेत; व जीं संकटें उत्पन्न झालेलीं दाखविलीं आहेत तींही बहुतेक मनुष्यास अनुभवण्यासारखींच आहेत. पुतळाबाई म्हणून जी नायिका कल्पिलेली आहे ती तरी अतिशय लावण्यवती किंवा सगळे बायकांत अगदीं उत्तम सद्गुणी अशी दाखविलेली नाहीं. परंतु जे सद्गुण संभावित कुटुंबाचे स्त्रियांत साधारण दृष्टोत्पत्तीस येतात तेच तिच्यांत असल्याचें वर्णन केलेलें आहे. तसेंच दुसरे पात्रांचेही त्यांचे स्थितीस शोभतील असेच गुणावगुण दाखविलेले आहेत. ग्रंथकर्त्याची कथाभाग वर्णन करण्याची शैली कितीएक प्रसंगीं लक्ष्यपूर्वक अवलोकन करण्यासारखी आहे. नानासाहेब यांचें साधारण वर्तन, व शौर्यप्रदर्शक सरदारी बाणा; तशीच अतिशयित स्वदेशप्रीति आणि तारतम्यरहित देवभोळेपणा ( ज्यांचे योगानेंच त्याचा विशेष नाश झाल्याचें दिसतें ) व दूरदृष्टि आणि विचार यांची कमताई, ( जी त्यानें आपलेकडील बंडवाल्याचा क्षणिक जय झाला तेव्हां दाखविलेली आहे ती २० व्या भागांत पहाणें ) जेव्हां त्यानें आपण जसें कांहीं खरेच पेशवे होणार असें समजून सारासार विचार न पाहतां

स्वमवत उपभोग घेण्याचा धडाका चालविला, त्यांत प्रगट केली आहे ती व तशीच त्याची अमानुष क्रुरत्वाची वर्तणूक, या सर्व गोष्टींचें वर्णन फार गांभीर्यानें आणि चांगले चित्तवेधक रीतीनें केलेलें आहे. एकंदर रीतीनें तर कांहीं ठिकाणीं हा ग्रंथ चांगला वाचण्यासारखा आहे व त्यांत पोरकटपणा किंवा उपहासास्पद असें क्वचित्‌च आहे.

(सही) रावजीशास्त्री गोडबोले,
सेक्रेटरी, दक्षिणाप्राइज कमेटी.

---

२. या गोष्टीचा कथाभाग मनोवेधक व आश्चर्यकारक कल्पनायुक्त असा आणि तेणेंकरून ग्रंथकर्त्याची बरीच काल्पनिक व आकलनशक्ति असल्याचें दिसून येतें ••••••लार्ड क्यानिंग साहेब यांजविषयीं या ग्रंथांत जें वर्णन लिहिलें आहे तें याथातथ्य आहे असें वाटत नाहीं. ज्या नानासाहेबाचे हातीं फारच थोडेवेळ पावेतों अधिकार आला होता, त्या नानासाहेबानें आपले दत्तक घेणारे बापाप्रमाणें ब्राह्मणभोजनाचा सपाटा चालविला असें जें वर्णन या ग्रंथांत केलें आहे तें खरें असेल असें मान्य करण्यास शंका वाटते, जरी कांहीं ठिकाणीं दोष आहेत तरी या ग्रंथास कमेटीनें उत्तेजन देणें हें फार योग्य आहे. ही कादंबरी कितीएक ठिकाणीं फारच वाचण्यासारखी आहे. या गोष्टींतील मुख्य मुख्य पात्रांचें वर्णन स्वाभाविक

रीतीनें व चांगली कर्मणूक होण्याजोगें आहे व कथा भागही चांगला आहे.

७ जून १८७४ ( सही ) कृष्णशास्त्री चिपळोकर*
१३ " " " केरो लक्ष्मण छत्रे.
१६ " " " एफ्. कील हार्न.
२५ " " " जी. ए. जेकब.
१२ आगष्ट १८७४. भास्कर दामोदर.
२६ सप्टंबर " " नारायण वासुदेव.

---

३. ग्रंथकर्त्याची ग्रंथ लिहिण्याची शक्ति कितीएक ठिकाणीं चांगली दिसून येते व ही कादंबरी वाचक लोकांस आवडण्याजोगी होण्यास पात्र आहे. लॉर्ड क्यानिंग साहेब यांचें वर्णन येथें केलें आहे तें योग्य रीतींच झालेलें नाहीं. नानासाहेब ( ज्यास गैरमाहितीनें पेशवा ह्मटलें आहे ) यांणीं दिल्लीचे संरक्षणार्थ मदत केल्याचें येथें लिहिलें आहे. तसें झालें किंवा नाहीं याचा संशय आहे. २४ आगष्ट १८७५.

( सही ) टामस क्यांडी.

---

या ग्रंथकर्त्याविषयीं कमेटीचे सेक्रेटरीनें जो अभिप्राय दिला आहे त्यापेक्षां माझे मतें ग्रंथकर्ता फारच चांगला आहे. ऐतिहासिक कादंबरी आहे अशा दृष्टीनें

---

* इतक्यांचें मत रा. चिपळोणकरांचे मताहून भिन्न नाहीं ह्मणून फक्त सह्या घेतल्या आहेत. ग्रं. क.

पाहिलें तर हा ग्रंथ मान्य करण्यास कदाचित् योग्य होणार नाहीं......परंतु अशा प्रकारचे अर्वाचीन ग्रंथ लिहिणारांकडून अद्यापि चांगले ग्रंथ रचिले गेले नाहींत, सबब या ग्रंथाचे दोषांकडे विशेष लक्ष देणें योग्य होत नाहीं. हंबीरराव नायक व पुतळाबाई नायिका यांचें वर्णन माझे मतें फार चांगलें साधलेलें आहे. त्या उभयतांचे दाखविलेले गुण राष्ट्रास भूषणदायक आहेत. एतद्देशीय ग्रंथकर्ते यांनीं बंडाचे वर्णनाचे अनुरोधानें आपले कल्पित कादंबरीची रचना करून पाहणें आहे, तर त्यास साधारण रीतीचींच पात्रें कल्पिलेलीं पाहिजे आहेत; कारण कीं, कुवरसिंग व कांहीं मुसलमान मोलवी याखेरीज दुसरे कोणी प्रख्यातीस आलेले मनुष्य घेण्यास जागाच नाहीं.

बंडाचे वेळेस जे जे लोक प्रगट झाले ते सर्व साधारणच होते, व त्यांची शक्ति वर्णनीय किंवा शूरत्वदर्शक होती असें नाहीं. हंबीररावाचें वर्णन बरेंच आहे. पण पुतळाबाईचें तर खचित फार उत्कृष्ट आहे व नानासाहेबाचें वर्णन यथायोग्य झालें आहे. १५।९।७४.

(सही) महादेव गोविंद रानडे.

## ग्रंथ छापणाराची सूचना.

प्रस्तुत ग्रंथ दक्षिणाप्राइज कमेटी यांजकडून पसंत होऊन ग्रंथकर्त्यास बक्षिस मिळालें. हें पाहून मित्रभावानें हा ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याविषयींचें साहाय्य ग्रंथकर्त्यास पाहिजे आहे असें त्याजकडून समजल्यावरून हा ग्रंथ वाचून पाहतां लोकांत छापून प्रसिद्ध झाल्यास राजकीय संबंधाची व नीतिमान आणि अनीतिमान मनुष्याचे वर्तनांपासून अज्ञजनांस होणारे लाभ या ग्रंथाचे वाचनापासून बरेच होतील असें समजून ग्रंथकर्त्याचा हेतु सिद्धीस नेण्याकरितां त्यांनीं ग्रंथस्वामित्व दिल्यावरून बहुत संतोषानें हा ग्रंथ तपासून व छापून प्रसिद्ध करण्याचें काम मान्य केलें आहे.

हा ग्रंथ शुद्धकरण्यांत व छापून प्रसिद्ध करण्यांत मित्र रा. रा. विष्णू शास्त्री पंडित यांणीं पुष्कळ मदत केल्याबद्दल त्यांचें आभार मानीत आहे.

परशराम अमृत नागपुरकर.

# सन १८५७ च्या बंडाची धामधूम

## किंवा

# हंबीरराव आणि पुतळाबाई

## यांचें चारित्र.

—0—

### भाग १.

सन १८५७ चे एप्रिल महिन्याचे आरंभींच फार लगबगीनें दिल्लीचे राजवाड्याचे दरवाजाजवळ ऐन दोन प्रहरीं भरधांव घोडा टाकीत कोणीएक स्वार आला; त्या वेळेस त्याचे घोड्याचे आंगाचा अगदीं घाम घाम होऊन गेलेला होता. तसेंच त्याचे सर्व पोषागावर रस्त्याची धूळ उडून तो भरगच्ची जरतारी पोषाग अगदीं मळीण दिसत होता, व त्याचे बरोबर हुजऱ्या व खिसमतगार वगैरे कोणीही चाकर मनुष्य नव्हता, व तो स्वतः उन्हानें अगदीं विव्हल झालेला पाहून त्याकडे पाहणाराच्या मनांत हा कांहीं तरी महत्त्वाचे कामासाठीं जलदीनें फार लांबीची मजल करून आला आहे, अशी कल्पना सहज येई. त्याचा चेहरा उन्हाळ्यांतील प्रखर उन्हानें अगदीं लाल होऊन गेला होता, तरी त्याचे मोठमोठे कल्ले, आणि पीळदार मिशा, तसेंच आंठ्या घातलेलें रुंदट कपाळ, आणि कमानदार भिवया, यांचे योगानें त्याचे तोंडाव-

र जी उग्रता आली होती, ती बिलकूल कमी झाली नव्हती; व डोकीवर पीळदार जरतारी भरगच्ची मंदील कांहींसा डावे कानावर अक्कडदार घातलेला, व तो पडूं नये ह्मणून उजवे बाजूस रुप्याच्या बारीक आंकड्यानें तोलून धरलेला, तशीच आंगांत जरीची बुट्टीदार पोकळ पैरण घालून, ती वाऱ्यानें इकडे तिकडे उडूं नये, ह्मणून वरून बिन बाह्यांची किनखापी हिरवे रंगाची आणि सोन्याच्या गुंड्या लावलेली कुडती घातली होती. एक बाजूस मखमाली म्यांनांत सोनेरी वेलबुट्टीमुठीची तरवार लटकलेली असून दुसरे बाजूस त्या सरदाराचे इतर पोषाखास आणि थाटास शोभे अशी लहानशी कडाबीन ( रुंद तोंडाची बंदूक ) लोंबत होती, व ती बंदूक ज्या पोलादी आंकड्यानें कंबरेचे पट्ट्यास अडकाविली होती, त्या कमरपट्ट्यासच एक पांचबारी पिस्तुल, लहानशी कट्यार, आणि दोन नकशीदार मुठीचे लहान लहान सुरे, बांधलेले आहेत व पाठीवर दारू गोळ्याचें तोस्तदान बांधलेलें असून खांद्यावरून जो एक शिलेदारी बाण्याचा मोठा रेशमी झुबकेदार गोंड्यासारखा पटका खालीं लोंबत होता, त्यावरून तो कोणी मोठा व शूर सरदार आहे असें दिसे. त्याचे तरवारीचे मुठीची आणि पटक्याचे गोंड्यांची कांहींशी गुंतागुंत झालेली पाहून व बंदूक ही अस्ताव्यस्त रीतीनें वांकडी झालेली दिसत होती त्याजवरून, व साशंकित चेहऱ्याचे मुद्रेवरून, आपले पोषाखाचे ऐटीकडे त्या सरदाराचें बिलकुल लक्ष नाहीं,

असें पाहणारांच्या लक्षांत येण्याजोगें होतें. असा तो सरदार राजवाड्याचे पहिले दरवाजांतून आपले घोड्यासहित आंत जाऊन दुसरे दरवाजांतून तसेंच पुढें जाण्याचा इलाज नाहीं असें पाहून, देवडीजवळ थबकला, आणि इकडे तिकडे पाहून आपले घोड्याखालीं ही उतरला. पुन्हा लक्ष लावून मागें पाहतो, तों घोडा धरण्यास आपला मनुष्य अद्यापि आला नाहीं, हें मनांत आणून अमळ घोड्याचा लगाम हातांत धरून उभा राहिला होता. इतक्यांत त्या देवडीवरील एका शिपायानें त्याचा तो डामडौल, आणि अक्कड पाहून हा कोणी मोठा सरदार बादशाहाकडे कांहीं कामासाठीं आला असेल; परंतु घोडा धरण्यास त्याचा मनुष्य येऊन पोंचला नाहीं, ह्मणून अडून उभा राहिला आहे असें मनांत आणून जलदीनें देवडीचे ओंट्याखालीं उडी टाकून, त्याचे पुढें जाऊन त्यांस सलाम करून जलदीचे कामासाठीं त्याचा घोडा त्याचा मनुष्य येई तों पावेतों धरण्यास आपण तयार आहों अशा मुद्रेनें त्याचे घोड्याचे तोंडाजवळ येऊन उभा राहिला; परंतु तो कांहीं बोलला नाहीं, तेव्हां हा घोडा धरण्यास आला आहे असें जरी प्रथम त्याचे मनांत आलें, तरी अभिमानयुक्त मनानें अशा हलक्या मनुष्यापासून मेहरबानी करून घेण्यापेक्षां, आपणच कांहीं वेळ उभें राहणें चांगलें आहे, असा त्याच्या मनाचा ओघ झाला; इतक्यांत देवडीवरील जमादारही आंत वर्दी नेण्याचे इराद्यानें खालीं उतरला, आणि

त्यास सलाम करून कोण आल्याची आंत जाऊन वर्दी द्यावी, तें ऐकण्यासाटीं आपण उत्कंठित आहों अशा भावानें येऊन, जवळ उभा राहिला, तोंच त्या सरदाराचे कांहीं चाकर अगदीं धांवतां धावतां बेदम होऊन गेले-ले येत आहेत, असें त्या सरदाराचे दृष्टीस पडलें; तेव्हां त्या जमादाराशीं ही न बोलतां आपल्या चाकराकडे अचल दृष्टी लावून तो कांहीं वेळ तसाच ऊभा राहिला. इतक्यांत आंतून एक दोन मुत्सद्दी फारच लगबगीनें त्याजपाशीं आले. त्यांची व त्या सरदाराची चांगली ओळख होती, ह्मणून त्यांनीं त्या प्रसंगास योग्य असें नमन करून त्याचे हातचा घोड्याचा लगाम देवडीवरील शिपाई धरण्यास उभा होता, त्याजपाशीं झटपट देऊन दोहों बाजूंनीं दोघांनीं त्याचे स्नेहभावानें हात धरून ते त्यास आंत घेऊन चालले, आणि जातां जातां देवडीवरील जमादारास " सरदार साहेबके घोडेका बहोत अच्छा तऱ्हेसे बंदोबस्त रखना " असा हुकूम करून ते तिघेही आंत गेले.

---

## भाग २.

दिल्ली हें मोंगल बादशहाचे राजधानीचें मुख्य शहर आहे. हें वाचणारांपैकीं कोणासहि ऐकून ठाऊक नसेल अशी कल्पना करणें हा अगदीं वेडेपणा आहे. दिल्लीचे बादशहांनीं किती पिढ्या व कशाप्रकारें या हिंदुस्थानांत राज्य केलें याचें सर्व वर्णन इतिहासांत सांपडण्याजोगें आहे, सबब येथें तें करण्याचें कारण

दिसत नाहीं. तथापि एवढ्या मोठ्या नामांकित राजघराण्याचा तो राजवाडा फारच थोडे लोकांनीं पाहिला असेल, सबब त्याचें थोडेसें वर्णन येथें केल्यावांचून राहवत नाहीं. तो बादशाही वाडा इतका मोटा होता कीं, त्यांत हजार बाराशें मनुष्यांची वस्ती बादशहाचे नौकरीचे संबंधानें, व नातलगपणाचे संबंधानें रात्रंदिवस सहज होत असे, तरी कोणतेही प्रसंगीं तेथें दाटी आहे, किंवा इतके दाटीमुळें कोणाच्या राहण्यास कांहीं गैर सोय झाली आहे, असेंही कोणास कधीं वाटलें नाहीं. केवळ इतके लोकांचे राहण्यासाठींच सोई त्या राजवाड्यांत केल्या होत्या असें नाहीं. जागोजाग हवा खाण्यासाठीं आणि दूरचे प्रदेशांतील देखावे पाहण्यासाठीं उंच उंच गच्चा केलेल्या असून कामाकाजाचे महत्वाप्रमाणें लहान किंवा मोठें दरबार भरण्यासाठीं त्याच बेताचे लहान मोठे दिवाणखानें, आणि मुसलमान धर्माप्रमाणें सांजसकाळ निमाज पढण्याच्या जागा केल्या होत्या. इतक्या समाजाचा समावेश होण्याजोग्या मोठ्या जागा एक दोनच होत्या असें नाहीं. त्याशिवाय बादशहाचे घरीं पाहुणें येत त्यांचे राहण्यासाठीं किती एक सोईच्या जागा केलेल्या होत्या. हा बादशाही वाडा आतांप्रमाणें प्रथम नकाशा वगैरे होऊन, किंवा अमुक कामाकरितां अमुक ठिकाणीं अमुक प्रकारची इमारत करण्याचा बेत ठरवून बांधला गेला होता असें नाहीं. ज्या वेळेस ज्या राज्यकर्त्या पुरुषांची त्या वाड्यांत कारकीर्द झाली, त्या वेळेस त्याला पसंत

पडेल तसें त्यानें नवें जुनें करून आपले मनांस वाटेल तशी सोय केलेली होती, व त्या एकंदर झालेले इमारतीस दरवाजेही पुष्कळ होते; परंतु कोणतें काम कोणतें बादशहाचे वेळेस झालें याचा लेख त्या सर्व इमारतभर फिरलें तरी कोठेंही सांपडत नाहीं, हें पाहून नवीन पद्धतीचे विद्वानांस अंमळ आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. जरी त्या वाड्याची बांधणी, अशा रीतीनें अस्ताव्यस्त झाल्याचें वाड्याच्या आकारावरून आणि आंत राहणारांपैकीं चाकर पेशा-च्या सुखोपभोगाचे अडचणीवरून दिसून येत असे, तरी राजवाड्यांत जो बंदोबस्त असणें अवश्य आहे तो येथें राहूं शकत नव्हता, अशी कल्पना बिलकूल करवत नाहीं. कोणे एके वेळेस एका अदमासानें आणि नकाशावरून त्या वाड्याचें बांधणें झालें नाहीं, तरी त्याची बांधणी करण्याचे कामांत ज्यांनीं ज्यांनीं लक्ष घातलें ते सर्व राजपुरुषच होते. त्यांत तोफा ठेवण्याचे मोर्चे व जागोजाग पहारे ठेवण्याच्या जागा, तसेंच मुसलमान लोकांच्या स्त्रिया गोषांत राहतात त्या रीतीस अनुसरून स्त्रियांचे जनानखानें वगैरे जीं ठिकाणें ज्या व्यवस्थेनें असावीं तीं सर्व यथायोग्य बंदोबस्त राही अशा रीतीनें केलेलीं होतीं असें लक्षांत आल्यावां-चून राहत नसे. त्या इमारतीचे बंदोबस्ताविषयीं फार तर काय सांगावें, सर्व दिवसभर त्या वाड्यांत फिरलें तरी स्त्रियांचे जनानखाने कोणीकडे आहेत, हें गैर माहीत मनुष्यास सहजावृत्त्या सांपडणें कठीण

पडेल. तसेंच अनोळखी गैर माहित मनुष्य पाहरे चुकवून आंत जाऊन वाड्याचा कांहीं भाग पाहून येईन ह्मणेल, किंवा कोणी बातमीदार संकेतांतील मनुष्याची भेट घेऊन येण्याचा हेतु दुसरे कोणास आढळल्यावांचून सिद्धीस नेण्याचें मनांत आणील तर तसें घडण्याचा संभव त्या वाड्यांतील रस्त्याचे आणि वाटेचे व्यवस्थेवरून बिलकुल दिसत नसे. ती सर्व इमारत उगीच भिकार अवस्थेंत अगर धर्मशाळेसारखी उदास दिसत होती असें नाहीं, तींत जरी सर्व ठिकाणीं सारखी रोषनाई आणि मनोरंजनार्थ सुरेखपणा करण्याकडे विशेष लक्ष दिल्याचें दिसत नव्हतें; तरी दरबारच्या जागा, जनानखान्यांतील कोठड्या, तशाच बादशहाचे बसण्या उठण्याच्या वगैरे जागा, फारच उत्तम सुशोभित केलेल्या होत्या; व कांहीं दिवाणखाने इतके विस्तीर्ण होते कीं, त्यांत दोन हजार मनुष्यांचा जमाव चांगल्या सोईनें सहज बसूं शकेल. त्या एकंदर इमारतीचे शोभेस कितीएक चौकांत आणि आंगणांत जागोजाग छोटीशी बागशाई, व सुवासिक किंवा शोभिवंत फुलांच्या आणि पानांच्या झाडांच्या कुंड्या ठेवून, आणि हिरव्या वेलींच्या भिंतीसारख्या दाट जाळ्या केलेल्या होत्या. त्यांचे योगानें त्या ठिकाणास फारच मनोरमपणा आला होता. तसेंच जागोजाग नेहमी बिछायती होण्यासाठीं केलेल्या जाग्यांतून मोठमोठीं बिलोरी झाडें, हंड्या, व लहान मोठीं झंबरें लावलेलीं असत, व उत्तम प्रकारचीं टेबलें, खुर्च्या, आणि मोठमोठाले आरसे,

तसेंच युरोपियन सामानाचा भरणाही तेथें पाहून पश्चिमेकडील लोकांच्या ऐषआरामाच्या वस्तुंची गोडी मुसलमान लोकांस नव्हती असें ह्मणवत नाहीं. केवळ सुखोपभोगाच्या जाग्याकडेच ह्या इमारतींत लक्ष दिलें होतें असें नाहीं. खजिन्याची जागा, तसेंच दारूगोळ्याची कोठी आणि अपराधी मनुष्यें कैदेंत ठेवण्यासाठीं केलेल्या जागाही, जशा असाव्या तशा बंदोबस्ताचे विचारानें यथायोग्य स्थळीं केलेल्या होत्या; परंतु बांधतांना जरी हा सर्व विचार केला गेला नव्हता व ऐषआरामाचे सर्व पदार्थ सुखोपभोगासाठीं तेथें जमविलेले दिसत असत, तरी मुसलमान लोकांस स्वच्छतेची संवय मूळची नसल्याकारणानें तेथें कितीएक ठिकाणीं मळकटपणाही स्पष्ट दृष्टीस पडत असे. अशा राजवड्यांत प्रथम भागांत लिहिलेले सरदारानें प्रवेश केल्याचें सांगितलेंच आहे. तेव्हां आंत गेल्यानंतर तेथें काय हकीकत झाली त्याचें विवेचन पुढील भागांत प्रदर्शित केलें जाईल.

---

## भाग ३.

पहिल्या भागांत सांगितलेला सरदार कोण व दिल्लीचे बादशहाकडे काय हेतूनें आला, हें समजण्याची उत्कंठा वाचणारांचे मनांत राहिली आहे ती दूर करण्यासाठीं त्याचें वर्णन प्रथम करणें योग्य आहे, सबब त्याची थोडीशी हकीकत कळवितों.

तो सरदार दक्षिण महाराष्ट्र देशांतील....गांव-चा मूळचा राहणारा असून त्याचें नांव हंबीरराव घाडगे होतें. सन १८१८ सालीं पेशव्यांचा आणि इंग्रजांचा तह होऊन, शेवटले पेशवे बाजीराव साहेब हे पेनशन घेण्याचा ठराव करून ब्रह्मावर्तास स्नान संध्या करण्यास गेले, त्यावेळेस त्यांचे पदरचे कितीएक सरदारही त्यांजबरोबर त्यांचे आश्रयानें तिकडे राहण्यास गेले. त्यांमध्यें सोनजीराव घाडगे ह्मणून नामांकित बडे लोकांपैकीं एकजण होता, तोही आपलीं मुलेंमाणसें घेऊन गेला, तेव्हां त्यास हंबीरराव ह्मणून एक सहा महिन्यांचा मुलगा होता. तो अर्थातच आपल्या आईबापांचे समागमानें लहानपणापासूनच आपला देश सोडून ब्रह्मावर्तास राहिला. हंबीररावाचे आईबाप मूळचे गरीब होते असें नाहीं, त्यांस वतनवाडीचें हजार बाराशें रुपयांचें सालीना उत्पन्न गांवीं असून पेशवाईंत त्यांचे पूर्वजांनीं मोठमोठीं कामकाजें केलीं असल्यामुळें जरी राज्यप्रकरणी पुष्कळ उलाढाली झाल्या तरी लाख दीडलाखाची अजबाब ब्रह्मावर्तास जाण्याचे वेळेस त्याचे बापापाशीं निवळ शिलक होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सोनजीराव अगोदर जातीचा मराठा, तशांतून पेशव्यांसारख्यांचे दरबारीं त्याचें चांगलें धोरण असल्याकारणानें त्यास खर्चाची बिलकुल तम्मा वाटत नसे. त्यास अगोदर पांच सात मुलगे झाले होते, तितके सर्व गेले यामुळें त्याचें मन फारच उदास झा-

लेलें होतें ह्मणून, व आतां इंग्रजी राज्यांत आपण पहिल्याप्रमाणें डामडौल चालणें कठीण असें मनांत आणून, तसेंच कांहीं तीर्थयात्रा वगैरे केल्यानें तरी हें सहा महिन्याचें मूल आहे तें वांचून आपणास वृद्धापर्यंत सुख होईल, अशा समजुतीनें तो बाजीरावाबरोबर गेला होता; परंतु संकटसमयीं खरे स्नेहाशिवाय कोणी बरोबर येण्यास राजी होत नाहीं, असा बाजीराव साहेबांचा समज असल्यावरून सोनजीराव आपले बरोबर आले आहेत त्या अर्थी त्यांची आपणावर पूर्ण भक्ति आहे, असें मनांत आणून तेथेंही त्यांणीं त्यास चांगली नेमणूक करून दिली होती. सोनजीराव वयानें वृद्धच होते; परंतु ते मोठे चाणक्ष असत. सबब त्यांणीं बाजीरावाची पूर्ण कृपा संपादून त्यांचा दत्तपुत्र जो धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब त्याचे समागमांत आपले मुलाचा अभ्यास न झाला तरी त्याचे सोबतीनें याचा वेळ जावा, अशा हेतूनें हंबीरराव यास नेहमीं नानासाहेबाचे सहवासांत ठेवण्याचा प्रयत्न चालू ठेवला होता, तेणेंकरून, व हंबीररावही नानासाहेबासारखा इंग्रजी, मराठी, फारशी वगैरे विद्येंत व तसाच घोड्यावर बसण्यांत, आणि दांडपट्टा बंदुकीचा नेम मारणें, वगैरे शिपायगिरीच्या कामांत चांगलाच तयार झाला होता.

हंबीरराव याचे बापानें त्यास पुष्कळ द्रव्य खर्चून लेखनवाचनादि विद्या पुष्कळ शिकविली होती, व त्यासही ती पुष्कळ अवगत असे; परंतु

त्याची मनापासून भक्ति पाहिली तर शिपाईगिरीचे कामाकडे फार असे. त्यानें बंदुका कशा कराव्या, तोफा कशा ओताव्या, कोणते लांबीचे नळीनें किती लांब गोळी जाते, चाप कसे तयार करितात व व्यापाचे-बंदुकींत काय सोई किंवा गैरसोई आहेत वगैरेची माहिती मिळविण्यांत आपला वेळ आणि पैसा बराच खर्चला होता. तो हंबीरराव इतका श्रीमंत होता तरी त्यास नेहमीं शिकारीचा नाद असल्या कारणानें त्यानें दिवसाचे दिवस रानांत घोड्यावर बसून शिकारीचे जनावरांमागें भटकत फिरावें. व जेथें जसें अन्न मिळेल तसेंच खाऊन नदी ओढ्याचे पाण्यानें आपली तहान भागवून संतोषित मनानें आपला उद्योग चालू ठेवावा. शिकारीचे जनावरांतून वाघ, लांडगे, तरस, रानडुकरें वगैरे जनावरें त्याचे हातून किती मेलीं असतील, त्याची तर संख्याच होणें कठीण. कांहीं कांहीं वेळ तर असें झालें कीं, अतिशय मेहनतीनें घोडें रानांतल्या रानांत तो उतरतांच पडून मरून जावें, व वाघ किंवा इतर हिंसक पशूनें त्याजवर चाल करून यावें, तेव्हां त्याणें अगदीं गडबडून जावें; परंतु पुन्हां रानांत जाण्याची भीति त्याचे मनांत कधींच आली नाहीं.

या गोष्टीचे आरंभाचे वेळीं दिल्लीस गेल्याचें वर्णन केलें आहे तेव्हां हंबीररावाचें वय पाहिलें तर सुमारें ४० वर्षांचें होतें; परंतु त्याचे शरीराचे धिप्पाडपणामुळें व साहजिक रीतीनें देखील त्याचा पुष्कळ व्यायाम

होत असल्या कारणानें त्याचे तोंडावरून त्यास तिसांपेक्षां अधिक वर्षें असतील, असें कोणास वाटत नसे. त्याचे शरीराचा बांधा मोठा, उंच, भव्य आणि सदृढ असून वर्ण उत्तम प्रकारचा गोरा होता; व नाक डोळेही सुरेख असत, तेणेंकरून त्याचे सारखा देखणा पुरुष फार विरळा सांपडेल, असें पुष्कळांचे मनांत येत असे. जरी त्याचे वयास ४० वर्षें झालीं होतीं, तरी भर तारुण्याची पूर्ण कळा त्याचे तोंडावर दिसत असे व स्वाभाविक रीतीनेंही त्याचें मन अल्पवयी मनुष्यासारखें मजा मारण्याचे किंवा तंटच्याबखेडच्याचे कामांत फार गुंतून जात असे. याशिवाय आपले बरोबरीचे लोकांत शूरत्वाविषयीं तसेंच धैर्याविषयीं आपलें नांव प्रथम निघावें, हा हुरूप त्याचे मनांत फार असल्या कारणानें तो नेहमीं तसे प्रसंग येत तेव्हां लौकिक मिळविण्याची संधी दवडीत नसे. तेणेंकरून बाजीराव साहेबांचे व त्यानंतर नानासाहेबांचे पदरीं जे कांहीं थोडे शूर सरदार नांवाजलेले असत, त्यांत त्याचें नांव श्रेष्ठपणाचे संबंधानें निघाल्यावांचून राहत नसे. तेणेंकरून नानासाहेब पेशव्यांचाही लोभ हंबीररावावर फारच जडलेला होता. तो इतका कीं, कांहीं जड जोखमीची मसलत करणें झाल्यास ती नानासाहेब त्याचा विचार घेतल्यावांचून करीत नसत. नानासाहेब पेशवे हे बहुतेक वाचणारांचे माहितींत आहेतच, सबब त्यांविषयीं विशेष लिहिण्याचें कारण दिसत नाहीं. त्या नानासाहेब पेशव्यांनीं थोडे दिवसापूर्वी लखनौचे राजाकडून

कांहीं खलिता आला होता, त्याचा जबाब इतक्या गुप्त व जरूरीच्या कारणाचा होता कीं, स्वतः आपण गेल्याशिवाय दिल्लीचे बादशहाकडून पाहिजे आहे तो खुलासा होऊं शकणार नाहीं, असें वाटून त्यांणीं स्वतः दिल्लीस जाण्याचा विचार केला होता. परंतु त्यांचें पत्नीची प्रकृति बरीच बिघडली असून परगांवीं न जाण्या विषयीं तिचा आग्रह पडल्यामुळें त्यांच्यानें तीस सोडून जाववेना. ही गोष्ट जेव्हां हंबीररावास समजली, तेव्हां त्यानें नानासाहेबास भेटून खुलासा काढतां गुप्तपणाचे कामासाठीं स्वतः स्वारी जाणार, हें पाहून त्यास अमळ वाईट वाटलेंसें दर्शवून, आपले सारखे सरदार लहान पणापासून पदरीं बाळगले आहेत, त्यांचा कांहींच उपयोग नाहीं; व आपण केवळ अन्नार्थी होऊन धन्याचे पदरीं नेमणूक खाऊन राहिलों आहों, ह्मणून आपली मनस्वी निर्भत्सना करून घेतली; व नानासाहेबांचें मनही त्याजवर भरंवसा ठेवण्यास बिलकूल शकत नव्हतें; परंतु अशा उन्हाळ्यांत इतके लांबचा हेलपाटा, आणि तोही फक्त पत्र पोंचविण्यासाठींच, अशा मोठ्या मनुष्यास द्यावा हें योग्य नाहीं, व आपण स्वतः गेलें असतां आपले मनांतून जे कांहीं आणखीं खुलासे करून घ्यावयाचे आहेत तेही सहजासहजीं होऊं शकतील, अशा समजूतीनें त्याजपाशीं ही गोष्ट पूर्वीं मुळींच काढली नव्हती; परंतु अन्य प्रकारानें त्याचे समजुतीस येऊन त्यानें जेव्हां आपणावर नानासाहेबांचा भरंवसा नाहीं ह्मणून मोठा विषाद दाखविला, तेव्हां घरचे

अडचणीस्तव त्यास पाठविलें तरीही आपलें कार्य होईल, असें समजून त्याजपाशीं खुलासेवार पत्रें देऊन त्यास दिल्लीस अमुक दिसांचे पूर्वीं जाऊन पोंचलेंच पाहिजे, व तिकडून मिळालेला जबाब लवकर समजला पाहिजे, असें सांगितलें, आणि अमुक सरदार आपले पूर्ण भरंशाचा व माहितगार पाठविला आहे, याजवळ सर्व हकीकतीचें पत्र आहे, त्याची भेट घेऊन त्यास लौकर परत येण्याची परवानगी व्हावी, ह्मणून दिल्लीचे बादशाहाचे वजीरास सांकेतिक रीतीनें तारेनें बातमी पाठविली त्याप्रमाणें हंबीरराव दिल्लीस येऊन दाखल झाला होता.

---

## भाग ४.

हंबीरराव ब्रह्मवर्ताहून फार जलदीनें मोठ्या गुप्तेच्या कामासाठीं आले आहेत, हें दिल्लीचे बादशाहाचे वजीरास पूर्वींच समजल्यावरून त्यानें त्याची व बादशाहाची लवकर भेट व्हावी ह्मणून हंबीरराव आल्यापासून त्याचे समजुतीस येई अशा रीतीनें एक दोन तजविजोंची योजना केली; परंतु बादशाहाची प्रकृति फार बेआराम आहे, सबब दोन तीन दिवसांत भेट होण्याचा अगदीं संभव नाहीं, असें दाखवून त्यानें त्या कारणासाठीं कांहीं दिवस राहणें जरूर आहे, असें हंबीररावास कळविलें. त्यावरून हंबीररावास फार खिन्नता वाटली; कारण वास्तविकच बादशाहाची प्रकृति इतकी बिघडली

आहे, किंवा मोंगलाई दरबारचे बेदादीचे वहिवाटीप्रमाणें वजीरसाहेब मधलेमध्येंच कांहीं बहाणा करताहेत, हें त्यास पक्कें समजलें नाहीं. परंतु काम झाल्याखेरीज जाणें योग्य नाहीं, सबब निरुपायास्तव कसें तरी त्यास तेथें राहणें प्राप्त झालें. दिल्लीचे लोकांची नानासाहेबाचे हेतु सिद्धीस जाण्यास कितपत मदत होईल हें पाहण्यासाठीं, व वजीरसाहेबांचे मनांतून या आपले भेटीचे कामास अडथळा आणण्याचा हेतु असेल तर कांहीं युक्ति करून त्यांचें मन प्रसन्न करून घेऊन अडचण दूर करावी अशा बेतानें त्यांशीं व इतर दरबारी लोकांशीं सलगी करण्याचें मनांत आणून दुसरे दिवशीं हंबीरराव कांहीं उत्तम उत्तम चिजा नजर नजराणा करण्यासाठीं तेथील बाजारांतून घेऊन, वजीरसाहेब घरीं आहेत अशी संधि पाहून त्याची मुलाखत घेण्यासाठीं गेले. तेव्हां वजीरसाहेब घरींच होते, सबब हंबीरराव आले असें समजून त्यांस आपले दिवाणखान्यांत घेऊन जाण्याची आलेल्या चाकरास सूचना करून आपण भेटीस योग्य असा पोषाख करण्यासाठीं आंत गेले.

**हंबीरराव.**–( दिवाणखान्यांत प्रवेश करून जिकडे पहावें तिकडे उत्कृष्ठ बिछाइत, व उत्तम प्रकारचें बिलोरी सामान असून, इंग्रजी थाटानें ठेविलेल्या खुर्च्याही मांडलेल्या होत्या, त्यांवर बसावें न बसावें अशा विचारांत आहे इतक्यांत वजीरसाहेब आलेले पाहून त्यांचे पदवीस योग्य असा लवून मुजरा करून

(हास्यमुखानें) अदाब अर्ज करताहूं. हुजूर आलिकि मिजाज षरीफ खैरियतसे है !

**वजीरसाहेब.**–आलेकुम सलाम अलहमदो लिल्लाह अफजाल इलाहीसे साथ खैरियत के है. जनाबकी तबियत किस्तरहसे है ?

**हंबीरराव.**–इनायत इलाहीसे और षफकत हुजूरके सब खैरियत है. हाम समजते है के हमारी किस्मत बहोत बेहत्तर है. क्यौंके कल्हहाके रोज जिल्लिल्लाहकी मुलाकातसे मुषार्रफ होते तो आपसरीके जातसामिशिफातके मुलाकातसे हाम महरूम रहजाते. लेकिन फिलहाल हमारे वख्तने यावरीकीई के जनाब जैसे वसीलेकी मुलाकात हुई. उमेद कवी हैके हम मंजिल मकूसूदको पहुंचेगे. हम षहर देहलीका सैर करनेका इरादा बहोत रोजसे रखतेथें लेकिन आजतक इतिफाक न हुवा. क्यौंके हरएक काम अपने वख्तपर मौकूफ होता है. चुनांचे सखरे आलमने फरमाया है "कुल्लो अमरिन् मरंहुनिन् अला औकातिहा" मगर नानासाहेब पेषवान इस आजिजके ऊपर निहायत मरहमत कीईके इस तरफको हमको भेजवाये.

**वजीरसाहेब.**–अजी साहेब, यह क्या बात है ! तुह्मारे नानासाहेब की, और हमारी इस हदतक इगानियत है के अगर बयान करूं तो इमकान तहरीरसे बाहर है. नानासाहेबके कामके लिये आधि रातको हमको कहीं जानेका जरूर पडेगा तो हम एक लम-

हुभी तवक्कुफ न करेंगे. लेकिन क्या करना ? हुजरत जहां पनाहकी तबियत पहिलेसे कदरे नासाजथी. उसमे कल यही वख्त लाट साहेबका खलीता लेकर यहांके बडेसाहेब मुलाकातके वास्ते आये. उसमे ऐसा कुछ जिकर अजकार दिल षेकनीका था के मुझसे बयान किया नही जाता. (असें ह्मणून मोटा सुस्कारा टाकून अमळ स्वस्थ बसून तो मनोवेग दबल्यासारखं करून ) खेर. यहभी दिन निकल जायंगे ! चुनांचे सादि षिराजी अल यहिर रहमाने फरमाया है के ‥ ‥के बरयक नमतमे नमानद जहान " यह दहेली षहरमे तुम लोगोंके इस्तिकामतके वास्ते चंदाहा उजेर हैं. लेकिन किसनाजीपंतनें तुमको मुनासिब जाय दिखाई होगी. दीन ओ आईनके जुदाईके सबबजे हमसे तुह्मारी सरबराई बखूबी हो नहीं सकती है इसलिये हमारे दिलकोभी बहोत आजुर्दगी मालूम होती है. और आपनेभी तबियत को मुकद्दीर नही रखना.

हंबीरराव.–( हात जोडून ) अल्लाह अल्लाह ! यहं क्या सुखन हैं ! के अगर हार सरेमोय मेरे जबान हो जावें और आपके एहसानका षुक्रबयान करूं तों तमाम न होसकेगा. ( स्वर बदलून ) लेकिन ऐसा क्या दिल षेकनीका पैगाम होगाके मेरीभी अकल नाकिस हैरान है. षायद जनाबको उसराज खुफिया की कुछ हकीकत मालूम हो तो इसबंदेको जाहिर करनेमें अंदेषा न करेंगे ऐसी उमेद करी है. क्यौंकि इसबंदेको नानासाहेब पषवा दिलसे अजीज रखतें है.

पुणे मराठी ग्रंथालय
१३७ ब नारायण
दा. नों. ९७६२



**वजीरसाहेब.**–( प्रौढीचे डौलानें ) अजी यह-कुछ बात है ! नानासाहेबके दोस्त और हमारे दोस्त इसमे कुछ तफावत है ? तोबा तोबा ! ! येह बात आपको जाहीर करनेकेलिये कुछ अंदेषा नहीं. मगर आपके मावाफिक दानिषमंद लोग हमारे पातशाहाके सलतनतमें दसपांच होते तो मैं बहोत खुषीसे उनकी सलाहमसूलेहत लीया करता, लेकिन इधर जितने अमीरउमरा और आरकाने दौलत है सब आपने ऐष ओ अरामसे मषगुल है. ओर हमारे जहां पनाहके सल-तनतका काम बखूबी चलना येह किसीको फिकर नही है. ( हंबीररावानें विचारलेले प्रश्नाचें उत्तर विस-राळी पाडण्याचे बेतानें ) लखनौकी तो सब खबर आपके सुनेमे आई होगी, ( आश्चर्य-युक्त मुद्रा करून ) खेर तकदिरे आजली ऐसी-हिथी !!! हमारी अकल नाकिसको बहोत दरेग मालूम होता हैं इसकु लहपोषने येह बहोतही बुरा काम किया. याके ऐसी मुआतबर रियासतके एकबयक तबाह हो जानेसे एक आलमतेहो बोला होगया.

**हंबीरराव.**–( आश्चर्ययुक्त मुद्रा करून ) हमारे ना-नासाहेबभी इसलिये बहोतही आफसोस करतें हैं. देखि-ये अजोध्याके राजासाहेब ओ अंग्रेजोकी निहायत दोस्ती थी. आलावा इसके उनका करजभी अंग्रेजो-के ऊपर बहोत था. इसवास्ते डालहौसी बडे लाटसा-हेब उनके रियासतको और इजत ओ हुरमतको बखू-बी सरंजाम देवेंगे. ऐसा हम और सबलोक समझतेंथे.

बावजुद इसके जनाब राजासाहेबकी आईन ओतरी कभी कुछ राज छीन लेनेके मवाफिक नहीं थी. लेकिन गर्दिष गर्दुंये दूने अंग्रेजोके दिलोमे ऐसा निफाक डाल दिया के उस सिलसिले इगानियत ओ येहनियतको तोडकर बेवफाई पे मुस्तेद करवाया. दूसरा क्या कहेना!!! (दु:खित मुद्रा करून स्तब्ध राहतो).

**वजीरसाहेब.**–( रागाचा आवेश आणून ) यह लोग बडे बेवफा है के जिस वख्त इस मुल्कमें तिजारत करनेको आये उस वख्त नफरोंके मवाफिक सभोंकी कदंबोसी और ऐजजूं इनकी सारी करके जाय पनांहकी मांगतेथे. और हमारे जहां पनाहके खिदमत षरीफमें जब हाजिर होतेथें. अब वह वख्त निकल गया! और इस मुल्कका अमल तसर्रूफमें आनेके सबबसे, हजरत जहां पनांहके सामनें बैठणेको कुर्सी मिलनेकी परवानगी बहोत हिकमत चलाकर लेलिई. और बाद वफात जहां पनांहके इस मेहलमे तख्त षाहनषाही न रखनेके इरादेसे करार लिया हैं के यहांसे पाछे कोसके फासिलेपर पादषहाके सैर गाहका एक आली षान मेहल है उधर तषरिफ फरमां होना देखो!!! किसतरह उनकी कदीम तख्तकी जायको खाली करनेकी यह बद जनीहे!!! जनाब, नानासाहेब पेषवाके पेनशनका तोभी कुछ अछा ठराव होके आयाहे क्या उन्होंनें कुछ अर्ज किईथी इसतरह हमारे समाआतमे आयाहे,

**हंबीरराव**–जि, हां कुछ जबाब तो आया है.

मगर कमायंबगी उसकी हकीकतसे वाकिफ नहीं हूं. लेकिन कुछ बेहतर जबाब आया होगा ऐसा मालूम नहीं होता. नानासाहेबकी और नये आये हुये लाटसाहेबकी कानपूरके छावनीमे दो तीन मरतबह मुलाकात हुई. चंदरोजके पेषतर नानासाहेबके वाडेमे २०० साहेब और मडमलोगोंकी बडी जियाफत हुई. हमेषा साहेब लोग बतरीके मुलाकातके वहां आते है. आट चार रोज जियाफते खा पीकर ऐष ओ आराम करके चलेजाते है. इस अंदाजसे दिलको यकिन मालूम होताहै के कुछ तोभी सालियाना नानासाहेबके हाल तहयांततक मिलेगा.

**वजीरसाहेब**–बाजीरावसाहेबकी ईतनी बडी रियासत ईन लोगोंके तसर्रूफमें आगई तोभी उनके फरजन्द दिलबंदके लिये कुछ सालियाना मुकरर करनेमें चंदाहां उंजरें दरपेष लाते हैं. यह इन लोगोकी क्या नीयत है!!! हमको तों यकिन होगया हैके ईस बदनी हातसे अगर कोई तुरुंतीसे[१] पेष आवे तो उसही की, ईतआत करेगा वरना अल्लाहीका नाम लेना चाहिये!! इन नसारोंकी राह और रसम हंमने बहोत देखी. लेकिन किसीसे वफादारी और नेक नियतसे पेष आकर उनके कामको बखबि सरंजाम दिया ऐसा हमारे देखनेमें नही आया. यह कैस उनका दीन ओ आईन है सो सिरिफ अल्लाही जानता होगा!! हम समझतें हैं के यह नासिपास[२] उस मुल्क

१ तरुन्ती–सखती, जबरदस्ती. २ नासिपास–कृतघ्न.

जिसके आगे आपनी बदचलनका और ओहद षेकनी-का और अपने नविष्तेसे खिलाफ करनेका कुछ अंदे-षा नही रखतें इनका मजहब तोभी कैसा समझना ? " नऊंजो बिल्लाहे मिन्जालिक् "

**हंबीरराव**–( आपला मूळचा हेतू एकीकडे राहून भलतीकडेच संभाषण गेलें हे मनांत आणून ) खुदाके अजब कारखाने हैं ! नेक इनसानको तकलीफमे डालकर उस्के इरादेके जरको इमते हानके कसोटीपर आ जामाता है ताकि साबिर और नासबरा मालूम हो जावें. और कम जरफोंको दौउत दुनयकी देकर सरफराज करता है के षुकरान न्यामतका करतें हैं याकुफरान न्यामतका ! खैर, अब आपके नमाजका वख्त हुवा इसलिये मुझको इजाजत फरमायिये और आपकी जात उतुफत सिफातकेसे उम्मेद कवी हैके इन्षाअलाह कल जहां पनांहके दीदार मुबारकसे इस बंदेके दिलको रोषनाई बकषेंगे.

**वजीरसाहेब**.–( त्याचा परत जाण्याचा हेतु लक्षून ) हमभी यही चाहते हैं. कल फजरको आपके तरफ पैगाम भेजदेंगे उसवख्त तषरीफ फरमाना.

**दोघेही उठून उभे राहतात.**

**हंबीरराव**.–( वजीर साहेबांचे हातांत हात देऊन ) अब इस आजिजको इजाजत दीजिये और षफक्कतकी नजर हमेषा रख्खा चाहिये और जनाब नानासाहेबके कुछ दुसरे कामके वास्ते आपसे अर्ज करनेका इरादा है. मगर अबब सबब वख्त नमाजके कहे नही

सकताहूं. इन्षा अलाह कल जनाबको फुरसद हो सब कैफियत गोषगुजार करूंगा. ( इतकें बोलून वजीरसाहेबांस मोठ्या अदबीनें झुकून सलाम करून ) अदाब अर्ज करताहूं.

**वजीरसाहेब.**–( त्याचप्रमाणें मोठ्या अदबीनें झुकून सलाम करून ) अलेकुम सलाम.

---

## भाग ५.

**हंबीररावांनीं** वजीर साहेबांची भेट घेतली, तशाच आणखीं मोठमोठे सरदार, मुत्सदी, दिल्लींचे दरबारांत होते, त्यांच्याही भेटी समारंभानें नजरनजराणे देऊन घेतल्या. तेव्हां अर्थातच बादशाहाचे वाड्यांत त्यांची बरीच वाखाणणी होऊं लागली. त्यामुळें बादशाहाची एक सून ताजबी ह्मणून ऐन उमेदींत असून तिचा नवरा काबूल कंदाहाराकडे गेला होता, त्यामुळें तिला हंबीररावाची भेट घेण्याची, व त्याशीं प्रीतियुक्त संभाषण करण्याची फारच उत्सुकता प्राप्त झाली होती. तिणें त्यास वाड्यांत येतां जातांना दोन चार वेळ पाहिलें होतें, या कारणानें तिचें मन अगदीं वेडावून गेल्यासारखें झालें होतें. परंतु मुसलमानी रिवाजाप्रमाणें आपलें राहणें गोषांत असतां, त्या हिंदु पुरुषास आपलेसाठीं एकांतांत आणण्याची गोष्ट घडते कशी? याच विचारांत ती पडली होती. तिणें हंबीररावाचे भेटीसाठीं केलेले प्रयत्नाचें वर्णन करण्यापूर्वीं

राजवाड्यांत बादशाहाचे कुटुंबांतील मनुष्यें आणि त्यांबरोबर जे लोक रहात होते, त्यांचे गुणांचें आणि स्थितीचें तसेंच शहाणपणाचें थोडें विवेचन केल्यावांचून तिचें मनांत ही गोष्ट कशी आली हें समजणें अवश्य आहे सबब थोडेंसें वर्णन करितों.

ज्या मोंगल लोकांनीं शेंकडों वर्षें दुर्घट लढाया करून आपले पराक्रमानें बहुतेक हिंदुस्थान देश काबीज केला, आणि दिल्ली येथें आपली गादी स्थापन करून केवळ बलिष्ठपणाचे जोरावर सार्वभौमत्वाचा पूर्ण मान कितीएक दिवस अनुभविला, त्या मोंगल बादशाहाचे वंशज निर्वैर स्थिति अवलंबून ऐषआरामांत अगदीं निमग्न होऊन गेले. त्याचा परिणाम असा झाला कीं, या गोष्टीचे आरंभाचे वेळेस जो बादशहा दिल्लीचे गादीवर होता तो सुमारें ५०।६० वर्षांपूर्वीं सिंहासनारूढ झालेला असून त्यास वार्धक्यदशेनें जर्जर केल्यामुळें, तो केवळ दुर्बल व पराधीन अवस्थेंत काळ काढीत असे. दैवानें बादशाही संपत्ति त्यास दिली होती; परंतु स्वतः कांहींच सामर्थ्य नसल्यामुळें जे कोणी धूर्त कार्यसाधु त्यास आपले ताब्यांत हिकमतीनें आणीत, त्यांचे जोरानें त्यास बऱ्या किंवा वाईट स्थितीचें अवलंबन करून राहणें प्राप्त होई. ज्या अबाढ्य राज्यानें त्याचे पूर्वजांस हिंदुस्थानांत अप्रतिम श्रेष्ठत्व आणलें होतें, तेंच राज्य या दुर्दैवी बादशहास त्याचे गैर कर्तबगारीमुळें महद्दुःखास कारण झालें होतें. कां कीं, त्या विस्तीर्ण राज्यावर राज्य करण्याची सत्ता

त्यास केवळ राजकुलांत जन्म झाल्यामुळें प्राप्त झाली, त्या राज्यापैकीं कितीएक भाग दुसरे राजे बलिष्ठ झाले त्यांनीं जिंकून घेतले इतकेंच नाहीं; परंतु अनेक कालची सांठविलेली राज्यलक्ष्मी चोरापोरी जाऊन नाहींशी झाली असून त्याचे घराण्यांतील स्त्रिया हलके लोकांचे नादीं लागून व्यभिचारादि दुष्कर्मांत शिरण्याची शंका घेनातशा झाल्या होत्या. अशा रीतीनें त्या घराण्याची आणि बादशहाची दुर्दशा होतां होतां त्याचा शेवट कळस असा झाला कीं, कोणी शिपायानें त्या बादशहाचे डोळे कटारीनें फोडून टाकून त्यानें पुनः चांगले दिवस पाहण्याची त्यास आशा देखील नको, अशी त्याची स्थिति करून टाकली; परंतु त्याचें नशीब सबळ होतें ह्मणून त्याचे दैवयोगानें इंग्रजी फौजचा सरदार·· ··साहेब हा त्याच संधींत मराठ्यांशीं लढत असतां दिल्लीचे नजीक त्याची छावणी पडली, तेव्हां सहज बादशहाचे भेटीस गेल्यावरही सर्व स्थिति पाहून त्यास अभयवचन देऊन पुन्हां बादशाही गादीवर त्याची स्थापना करिता झाला, तेव्हां त्याचे ते उपकार स्मरून बादशहानेंही जें राज्य आजपावेतों मोंगलांनीं तरवारीचे जोरानें मिळविलें व वाढविलें, आणि पुढें राखण्याचा इरादा ठेविला होता, तें सर्व इंग्रजी सरदारांचे स्वाधीन करून आपण स्वतः हल्लीं हिंदुस्थानांत जे राजे नामधारी आहेत त्यांचे मालिकेंत शिरोमणि होऊन राहिला होता. जरी त्या प्रसंगीं बादशहाची अशी दुरावस्था झाली होती

तरी त्यास सार्वभौम बादशाहास योग्य ते मानमरातब सरकार दरबारांत किंवा खासगी संबंधांत मिळण्याचा कांहीं प्रतिबंध नव्हता, व तोही आपली खरी स्थिति लक्षांत न आणितां एका इंग्रज गवर्नर जनरलानें बादशाहासमोर आपणास बसण्यास खुर्ची असण्याचा आग्रह धरिल्यामुळें, व थोडे दिवसांपूर्वीं आलीकडे कोणी एजंट साहेबानें रुमालानें हात बांधून बादशाहासमोर अर्जदाराप्रमाणें जाण्याचें नाकारल्यामुळें, इंग्रज सरकारावर आपली फार अवकृपा आहे, असें दाखविण्यास कमती करीत नसे. बादशाहाकडे कोणी लिहिणें झालें तर अर्जदाराचे नात्यानें लिहावें लागत असे. कारण कीं, त्याचे दरबारांत दुसरे रीतीचा पत्रव्यवहार मान्यच होत नसे.

ऐशी हजार रुपये दरमाहा पेनशन घेऊन सर्व राज्यकारभार इंग्रज लोकांचे हातीं दिला, ही एक इंग्रज लोकांवर मेहरबानी केली, अशी त्याची समज होती, व त्यास अनुसरून इंग्रज लोक या देशांत जें काय करतात तें सर्व आपण मान्य केल्याप्रमाणेंच आहे, असा भाव दाखवून इंग्रज सरकारचे जे शत्रु त्यांचा सर्व संबंध त्याणें सोडून दिला होता, आणि जेव्हां जेव्हां इंग्रजी फौजेचा जय होई तेव्हां तेव्हां आपलाच जय समजून आनंदप्रदर्शक तोफांची सरबत्ती करण्याची ही वहिवाट चालू ठेविली होती, तरी त्याचे एकंदर वर्तणूकीवरून त्या बादशाहाचे आणि इंग्रज सरकारचे दोस्तींत कधीं व्यत्यय येईल किंवा कोणतेहि

कारणानें दोघांचे दरम्यान झालेले करारनामे मोडले जातील, असें महान महान राजकारस्थानी पुरुषांचे स्वप्नांत देखील वाटलें नाहीं. व दिल्लीचे बादशाहाचें राज्य खालसा केल्यानें एक बिघाभर देखील जमीन इंग्रजी राज्यांत वाढण्याचा संभव नव्हता. सबब तसें करण्याचा प्रयत्नही करण्याचें कोणी मनांत आणिलें नाहीं; परंतु दिल्लीचे राजवाड्याबाहेर जरी बादशाहाची काडी इतकी सत्ता नव्हती, तरी त्या वाड्याचे आंतील संबंधानें बारा हजार मनुष्यें त्याचे ताब्यात असत, व त्या वाड्यांत बादशाहा करील ती पूर्वदिशा, असा प्रकार असल्या कारणानें जी अव्यवस्था होऊन गेली होती तिचें वर्णन करणें कठीण आहे. त्या वाड्यांतील बंदोबस्ताविषयीं लोकांची समजूत अशी असे कीं तेथें जे कांहीं मोठाले दोष घडून येत असत त्यांची कल्पना देखील साधारण मनुष्याच्यानें करवणार नाहीं. राजपुत्रास बादशाही मानमरातब असे; परंतु अब्रूची ह्मणून बिलकूल चाड नसे; तेणेंकरून तो मानमरातब केवळ थट्टेसारखा दिसे. तेथील राजघराण्यांतील व इतर संभावित ह्मणणारांच्या स्त्रिया इतकी निर्भिडपणाची व मर्यादारहित वर्तणूक करीत कीं, तेणेंकरून त्यांस संभावित ह्मणणारास लाज वाटत असे. अशा अवस्थेंत बादशाह असतां मराठ्यांचीं राज्यें इंग्रजांचें भक्ष्यस्था‑नीं पडल्यामुळें त्यास मराठ्यांकडून उपद्रव होण्याची भीति राहिली नाहीं, व राज्याचा पैसा वसूल करण्याचीही जोखीम व दगदग कांहीं एक न राहतां महिना

भरतांच पेनशनाच्या थैल्या चालून येत; तरी त्यास राजवाड्यांतील बंदोबस्ताचा बोजा सर्व जगाचें राज्य करण्यापेक्षांही अधिक इजा देण्याजोगा झाला होता. कारण कीं, लहान मोठे मिळून सुमारें बाराशें तरी त्याचे ताबेदार, सरदार, मुत्सद्दी, मानकरी, नातलग वगैरे असून त्यांचे वसतिस्थानाचे संबंधानें ते बहुतेक सर्व हिंदुस्थानभर पसरले होते. त्यांचें चालविण्याचें जोखीम बादशाहाचे विपत्तीस विशेष कारण असे. कां कीं त्यांतून बहुतेकांस फार झालें तर २५।३० रुपये दरमहाची नेमणूक असेल; परंतु आपण दिल्ली चे बादशाहाचे नातलग किंवा आश्रित वगैरे दांभिक-पणाचा प्रभाव पूर्णत्वें त्यांचे मनांत वास करीत असल्या-कारणानें लग्नकार्यांत मुसलमान लोकांचे रीतीप्रमाणें स्त्रियांस मेहेर देणें अवश्य, तेव्हां बादशाही लोकांकडून देणें तें अलबत कमींतकमी पन्नास हजारांची देणगी असल्याशिवाय गोड दिसत नसे. तितक्यांतून अशी देणगी देणार आणि घेणार मोठे अक्कलवान् व कमाव-ते किंवा सधन होते ह्मणावें, तर तेंही नाहीं. कारण, त्यांचा सर्वकाल उद्योग ह्मणला तर, सतार किंवा सारंगी वाजविण्यांत आणि बादशाहाची खुशामती स्तुति करण्यांत, तसेंच एकमेकाशीं गप्पा सांगण्यांत आणि हुक्का ओढण्यांत वेळ जात असे. त्यांचे हातून उद्योग तो काय होणार ? आणि अशा लोकांस विद्या कशी प्राप्त होईल !! तेव्हां अर्थांतच त्याची खरी स्थिति ह्मटली ह्मणजे त्यांस आपल्या मोठेपणाचे डौलानें स्वतः

मेहनत अगर धंदा होणें अशक्य झालें होतें. चांगलेंसें ज्ञान नाहीं तेव्हां दुसऱ्याचे धंद्यास आपल्या अक्कलेची मदत पोंहोचून निर्वाहाचा मार्ग नाहीं. मग अर्थातच जवळ कांहीं नाहीं. पैसा मिळविण्याचें ज्ञान नाहीं, हातानें मेहनत होत नाहीं, व डामडौलानें तर निर्वाह झाला पाहिजे; अशी स्थिति असल्या कारणानें जेणें करून पैसा मिळेल ती गोष्ट कितीही पापाची असो, कीं बेअब्रुची असो, द्रव्यप्राप्तीसाठीं करण्यास चुकायाचे नाहीं असा त्यांचा एकंदर वर्तनक्रमच पडून गेला होता, त्यास अनुसरून बादशाहाचे सुनेंने, हंबीररावजींनीं पुष्कळ लोकांस मोटमोठ्या देणग्या दिल्याचें समजल्यावरून, व कांहीं अंशीं त्याचे देखणेपणास भुलून त्याची आपली मुलाखत होण्याची खटपट केली ही गोष्ट मनांत आणिली तर त्यांत कोणास आश्चर्य वाटण्यास कांहीं कारण होईल असें वाटत नाहीं.

त्या "ताजबीचे" तैनातीस एक दासी मोठी चतुर होती, तिणें ती तिची फारच उत्सुकता पाहून राजवाड्यांतील एका सरदाराचे अनुकूलतेनें हंबीररावाची भेट आपल्या महालांत घेण्याची तजवीज केली. ती अशी कीं, बादशाहचा पुत्र शाहाजादा ह्मणजे ताजबीचा नवरा हा काबुलास गेला होता त्याजकडून नानासाहेब पेशवे यांचे नांवचा कांहीं गुप्त लखोटा आला आहे व तो त्यांचेच हातीं पावता होण्याची तजवीज त्या सरदारावर सोंपविली आहे, असा बाहणा करून

हिंदुधर्मास योग्य अशा रीतीचा मेजवानीचा थाट करून "ताजबी" हिचे महालाशीं लागून एक दिवाणखाना होता तेथें त्यास आणिलें, आणि रीतीप्रमाणें आगतस्वागत झाल्यानंतर एकांताची मसलत करण्याचे निमित्तानें ताजबीचे महालाचें दार उघडून ते दोघे आंत गेले, ताजबी ही उंची पोषाक करून संकेताप्रमाणें गुप्तरीतीनें एकीकडे बसली आहे असें पाहून तो सरदार कांहीं कागद आणण्याचे निमित्तानें इंबीररावास तेथेंच सोडून तिसरेच दारानें बाहेर पडला. ती खूण जाणून ताजबी ही मोठ्या डौलानें हास्यवदन करून त्याचे पुढें येऊन उभी राहून अति नम्रतेनें त्यास सलाम करून आपण प्रयत्न केल्याप्रमाणें अशा मदनमूर्तीची भेट एकांतांत झाली हें पाहून आपणास फार खुशी झाली आहे अशा रीतीचें भाषण करून त्यास एक सुंदर बिछाईत तयार केली होती ती बोटानें दाखवून तेथें बसण्यास चलण्याविषयीं विनंती करूं लागली.

इंबीररावास हा पूर्वसंकेत कांहींच माहीत नसल्या कारणानें, आपण एकाएकी बादशाहाचे वाड्यांत, एका तरुण सुंदर स्त्रीशीं एकांतांत बोलत आहों, हें मनांत येऊन फारच आश्चर्य, चमत्कार व भीति व तिचें तें स्वरूप व नखरेदार पोषाक, आणि भीतियुक्त भाषण, व मनोवेधक लीला पाहून हा सुखाचा किंवा दुःखाचा प्रसंग आहे, हें कांहींच समजेना, व त्याचा निश्चयही त्या वेळेस त्याचे मनानें कांहींच

होईना; परंतु अशा प्रसंगीं विरुद्ध वर्तणूक केल्यास आपली मोठी अप्रतिष्ठा होईल अशी शंका त्याचे मनांत उत्पन्न होऊन तो ओघानें आलेल्या प्रसंगास अनुसरून तिचें मन संतुष्ट करण्यासाठीं ती सांगेल तसें करण्यास प्रवृत्त झाला.

याप्रमाणें कांहीं दिवस दिल्लींत राहून नानासाहेबाचे मनोदयानुरूप सर्व बंदोबस्त करून व माहिती मिळवून तो हंबीरराव परत ब्रह्मावर्तास येण्यास निघाला.

---

## भाग ६.

इकडे नानासाहेबाची स्त्री "लक्ष्मीबाई" आजारी होती ह्मणून मागें सांगितलें आहे. तिचा आजार वास्तविक पाहिला तर शारीरिकव्यथेपेक्षां मानसिक व्यथेचे कारणानें विशेष होता. ती शाहणी समजूतदार बायको असून मोठी दूरदृष्टि पोंचविणारी, तशीच खोल विचाराची होती; याजमुळें नानासाहेबाचे कितीएक हूडपणाचे वर्तणुकीमुळें तिला बहुधा कधींच विश्रांति वाटत नसे. लखनौचे राजास विनाकारण पदच्युत करून त्याचा मुलूख इंग्रज सरकारांनीं खालसा केला, बाजीराव साहेबांचे मरणानंतर आपणांस कांहींच नेमणूक देण्याचा ठराव होत नाहीं, वगैरे गोष्टींचे विचारांत नानासाहेबांचा सर्व वेळ जातो हें चांगलें नाहीं, असें तिला वारंवार वाटे; परंतु तो नानासाहेबासारखा वीरश्रीमान पुरुष बायकांचे सांगण्याचा किती विचार करणार ! बहुधा या गोष्टी तिला समजू

नयेत ह्मणून तो फार बंदोबस्त ठेवी; परंतु नानासाहे-बाचा पराकाष्ठेचा हूड व लहरी स्वभाव तिला समजून आला होता; तसेंच राज्यप्रकरणाचे उलटापालटींत नानासाहेबासारख्या मनुष्यानें इंग्रज सरकारचे विरुद्ध वर्तणूक केल्यास तींत जय येणार नाहीं, अशीही तिलां खात्री वाटून ती त्याचें वरचेवर निवारण करीत असे. या कारणानें नानासाहेबाची तिजवर जरी फारशी प्रसन्नता नव्हती, तरी तिचे पोक्त विचारांचा त्यास एक दोन प्रसंगीं फार चांगला प्रत्यय आला असल्यामुळें तिचें मन मोडून कांहीं गोष्ट करण्याचें त्याच्यानें होत नसे. दिल्लीस जाण्याची तयारी झाली होती तिची बातमी तिला समजतांच तिणें आपल्या आजारीपणाचे निमित्तानें न जाण्याविषयीं अशी कांहीं गळ घातली कीं, तिचा शब्द मोडून जाणें त्यास मोठं संकट वाटलें. ह्मणून त्याणें हंबीररावास तिकडे पाठवून आपण किंचित उदासीनवृत्तीस अवलंबून बायकोचे मर्जीखातर घरीं राहिला होता; तरी नेहमीं पलटणी लोकांचें येणें जाणें, आणि मसलती पाहून लक्ष्मीबाईस कोणे वेळेस काय प्रसंग येईल आणि काय होईल, असें वाटून अतिशय भयभीतपणा उत्पन्न झाला होता.

हंबीरराव यांस दिल्लीस पाठविण्याची मसलत झाली तेव्हां त्यांस घरीं जाऊन आपले घरचा चांगला बंदोबस्त करण्यास अगदींच सवड मिळाली नाहीं. तिसरे प्रहरीं नानासाहेबांचें बोलणें झालें, आणि संध्याकाळीं जरूरीचे कारणामुळें निघून जाणें प्राप्त झालें, यामुळें

ते कोणीकडे व काय कारणासाठीं गेले, याचा कांहींच शोध त्यांची धाकटी आवडती बायको "पुतळाबाई" इजला लागेना. नानासाहेबांची व त्यांची मसलत होऊन ते एकाएकीं घोड्यावर स्वार होऊन अमुक वाटेनें सड स्वारीचे बेतानें गेले ह्मणून चाकर माणसांकडून तिला समजलें; परंतु अशा जरूरीचे कारणानें कां जाणें झालें व किती लांबचे पल्ल्यावर गेले आहेत, याविषयीं शोध लागावा ह्मणून तिनें पुष्कळ प्रयत्न केला; परंतु जी गोष्ट दोघांशिवाय तिसऱ्याला समजलेलीच नाहीं, ती तिला कशी कळते ? तेव्हां ज्याअर्थीं नानासाहेबांची मसलत होऊन हे तावडतोबीनें गेले आहेत, त्या अर्थीं वहिनीबाई ( लक्ष्मीबाई ) कडून तरी कांहीं सुगावा लागेल, व त्यांस बरें वाटत नाहीं तर समाचारासही गेल्यासारखें होईल, अशा विचारानें पुतळाबाई लक्ष्मीबाईकडे भेटीसाठीं ह्मणून आली होती, तेव्हां दोघींचें प्रथम प्रकृतीचे संबंधानें कांहींवेळ बोलणें झाले. नंतर जवळ कोणी मनुष्य नाहीं अशी संधि पाहून पुतळाबाईनें मनांतील गोष्टीचा खुलासा कळण्यासाठीं बोलणें काढलें.

**पुतळाबाई.**—आज आठ दिवस झाले घरांत ह्मणून अगदीं चैन पडत नाहीं. ह्मटलें तुमच्याकडे तरी कोठें जाणें झालें आहे त्याचा शोध लागेल, विचारून पाहावें. ह्मणून मोठा हिय्या करून आलें. पण,—

**लक्ष्मीबाई**.—(तिचा नवरा कोठें गेला हें जरी पक्कें ठाऊक नव्हतें तरी नानासाहेबांनीं त्यास आपणाबद्दल

दिल्लीकडे पाठविलें असेल अशा कल्पनेनें ) एकूण बन्यासाहेबांची (हंबीररावाची) स्वारी आतांशा घरीं नाहीं तर? तरीच मला वाटलें कीं, ( नानासाहेबांचें ) राहणें झालें आहे, तर दुसरे कोणास तरी दिल्लीस पाठविलें असेल; कां कीं, स्वतः जाण्याचा अगदीं बेत झाला होता; पण माझे जिवास बरें नव्हतें ह्मणून मी जाण्याचा मोडा घातला, तेव्हां मोठ्या जुलमानें राहण्याचें कबूल केलें; परंतु तिकडे कोणास पाठविलें किंवा नाहीं हें बिलकूल समजूं दिलें नाहीं. असो, तिकडे बन्यासाहेब गेले तर तुह्मांला कळवून देखील गेले नाहींत ! ही गोष्ट माझ्यानें तर खरी मानवत नाहीं बाई. कारण कीं, तुह्मां दोघांची प्रीति किती आहे हें मी बोलून दाखविलें पाहिजे असें नाहीं. बन्यासाहेबांचे तोंडांत गेलेला घांस त्यांचा आणि हातांतला पुतळाबाईचा असें सर्व लोक उगीच कांहीं कारण असल्यावांचून ह्मणत नाहींत.

**पुतळाबाई.**–तें सगळें खरें आहे, परंतु सरकारची चाकरी आपले जिवापेक्षांही प्यारी मानितात. त्यांना चाकरीपुढें बायकोची परवा राहील कीं काय, हें आपणच विचारानें पाहवें. खरेंच कां दिल्लीस जाणें झालें आहे ? मीं ह्मटलें शिकारीचे वगैरे नादानें कोठें आसपास जाणें झालें असेल.

**लक्ष्मीबाई**–मला तरी बाई पक्कीशी बातमी नाहीं. स्वारी खुद्द जाणार होती, तेव्हां बन्यासाहेबांस पाठविलें असेल असें मी तर्कानें ह्मणतें.

**पुतळाबाई**–तुह्मांला देखील ठाऊक नाहीं, असें कसें होईल? आमची दोघांची प्रीति आहे, त्यापेक्षां कांकणभर आपली अधिकच आहे; तर येथें मसलत झाल्यावांचून कां पाठविलें असेल ?

**लक्ष्मीबाई**–अहो बाई, इतकें बारकोचें अगत्य असतें, आणि विचारण्याची गरज राहती तर मग मी कशाला अशी हाका मारीत बसतें!! आतांशा राज्याचे उलाढालींत इतकें कांहीं मन गुंतून गेलें आहे, त्यापुढें जेवणखाण देखील सुचेनासें झालें आहे. तीन तीन दिवस झोंप कशीती देखील ठाऊक नाहीं. सगळा दिवस मसलती आणि विचार, सगळ्या पलटणीच्या गोष्टी, आणि त्याच लोकांमध्यें वेळ जातो आहे. ह्मणून एखादें लहान मुलासारखें दुसरें कोणी सलगींतलें जवळ असलें तर त्यास जाण्यास सांगून बुद्याजवळ जाऊन बसून आणा शपथा घालून, कांहीं इलाज केला आणि थोडी झोंप घेतली तर घेतली. घरांतलें मेलें काम काज राहो एके बाजूस; पण शरीर तर चाललें पाहिजेना ? याच काळजीनें आतांशा मला जेवणखाण देखील सुचेनासें झालें आहे. बन्यासाहेब येथें असतात तेव्हां ते कधीं कधीं अशा नादिष्टपणाचें निवारण करितात. पण तुह्मी आतां सांगतां कीं ते आठ दिवस येथें नाहींत. तरीच आतां मन मानेल तशीं कामें चाललीं आहेत वाटतें.

**पुतळाबाई**.–(आपले नवऱ्याचें वजन नानासाहेबांवर विशेष आहे हें ऐकून अमळ आनंदित झाली तरी तशी

मुद्रा न दाखवितां ) आह्मी काय पदरचीं माणसें. थोर मान्यता राखतात ह्मणून आमचा सगळा मोठेपणा लोकांत आहे. ( नवऱ्याविषयीं खुलासा करण्याचे हेतूनें ) दिल्लीकडे जाणें झालें असेल तर सरकारस्वारीची भेट झाली ह्मणजे कधीं येणें होईल तें सगळें अगत्य करून मजसाठीं विचारावें हो. कालपासून मजला फारच हुरहुर वाटत आहे, आणि कसेंसें अगदीं उदास भासतें. तिइकयांतून आमची मराठमोळ्याची चाल, त्यामुळें कोणाशीं बोलतां देखील येत नाहीं आणि विचारतां येत नाहीं. कांहीं झालें कीं येथें, येऊन या पायांजवळ बोलत बसायाचें. दुसरी कोठं बोलण्याला कीं जाण्याला जागा आहे कां ?

**लक्ष्मीबाई**.—( अमळ थट्टेचा प्रकार मनांत आणून ) हो, जसें कांहीं कोणी ह्मणेल खरेंच. बन्यासाहेबांची स्वारी येथें असली ह्मणजे महिन्या महिन्यांत तरी इकडे येणें होतें कां ? तीन तीन बोलावणीं पाठवावीं तरी येण्याला बनत नाहीं. कोठें शिकारीला वगैरे स्वारी गेली ह्मणजे मात्र कर्मणूक करायला मी हावें, नाहीं तर नको. इतकें काय मेलें अगदीं नवऱ्याला धरून बसावें ! फुका सुंदराबाई ( सवत ) पाण्यांत पाहतात त्या ? तुमचें आणि सासुबाईंचें भांडण होण्याला तरी दुसरें कांहीं कारण आहे कां ? बन्यासाहेब घरीं असले ह्मणजे पुतळाबाईला जशी कांहीं मोहनीच पडतेना ? सुंदराबाई का बायको नव्हे? पण तिची भेट देखील तुह्मीं होऊं देऊं नये कां ?

**पुतळाबाई.**–( अमळ लाजल्यासारखी होऊन ) तसें नव्हे हो. तुह्मीच पहा बरें, शिकारीमुळें घरीं राहण्याला अगोदर कधीं फुरसत तरी होत आहे का? आणि मी कशाला कोणाचे भेटीआड येऊं? हें पाहा काय तें! कदाचित येथें राहणें झालें तर बहुतेक वेळ वाड्यांत जातो, हें आपणच पाहतांना? तव्हां मध्यें कोठें घरीं येणें झालें आणि मी नसलें तर एखादें रागें भरावयाचें होईल ह्मणून आपली घरीं बसत्यें; दुसरें काय? ( बोलण्याचा ओघ दुसरीकडे नेण्याचे बेतानें, आपण ती मडम ठेवून कशिदा आणि जाळीकाम शिकत होतां तें झालें कां पुरें?

**लक्ष्मीबाई**.–मला होऊन कोठें त्याची गरज आहे? तें उगीच आपलें माझें बोकांडीस बसविलें ह्मणून शिकत होतें. तोफखान्यांत कोणी सोजीर आहे तो कानपुराहून वरचेवर येथें याया आणि आपले येथें बंदुका व तोफा करण्याचा कारखाना चालू केला आहे, त्यांतील कामास त्यानें मदत करावी, ह्मणून त्याचे बायकोला तीनशे रुपये पगार देऊन मला कशिदा काढण्याचें शिकविण्याचें उगीच मिस करून तिला येथें ठेवून घेतली आहे; ह्मणजे अर्थात तो वरचेवर तिचे साठीं येथें येऊन राहतो. कशिद्याचें कारण लोकांत दाखवावयाचें मात्र; पण आंतील हेतु निराळाच आहे.

**पुतळाबाई**.–( आश्चर्ययुक्त मुद्रा करून ) तरीच आतांशा घरीं तोफेचे आणि बंदुकीचे नमुने मेणाचे

वगैरे चाललेले असतात. मी ह्मटलें तें उगीच असेल, पण सरकारस्वारीचे मसलतीनेंच आहे वाटतें.

लक्ष्मीबाई.—उगीच कसें असेल? ( जवळ कोणी मनुष्य नाहीं पाहून ) तोफा आणि बंदुका पाडून फौज जमवावयाची आणि मामंजींचा जेवढा मुलूख इंग्रजाकडे गेला आहे तो परत घेऊन पुण्यास पेशवाईचा झेंडा लावावयाचा एवढा हेतु मनांत घोळतो आहेना? को-णाजवळ बोलूं नका हो. ही गोष्ट फारच गुप्त आहे. बन्यासाहेबांनीं तुह्मांस सांगितलें असेल असें समजून मी तुमचे जवळ विश्वासानें बोललें. समजलां का?

पुतळाबाई.—( बाहेर नानासाहेबांचे शब्द ऐकून अमळ गजबजल्यासारखी होऊन ) जातें आतां, स्वारी इकडे येत आहे वाटतें. मी सांगितलेलें काम तेवढें अगत्य करा हो. मी उद्यां सकाळींच येईन. नाहीं तर जमनाऊला पाठवीन ह्मणजे लौकर उठणें झालें नाहीं तरी ती दोन घटका बसेल. तिचे हातीं आपण दोन बोटें माझे नांवाची चिठी पाठविली तर चालेल. पण बंद करून यावी, नाहीं तर सासूबाईला कळलें ह्मणजे त्या रागें भरतील एखाद्या.

लक्ष्मीबाई.—मी सकाळींच उठून स्नान करून तुळशीची पूजा करीत असतें. तेव्हां माझी झोंप मो-डेल ह्मणून तुह्मीं येऊं नये असा माझा भाव नाहीं; पण जमनालाच पाठवा ह्मणजे बरें. ( असें ह्मणून आंतील खोलींत नानासाहेब आले असें समजून लगबगीनें तिकडे जाते; व पुतळाबाई निघून आपले घरीं जाते. )

# भाग ७.

नानासाहेब पेशवे एके दिवशीं मोठे सकाळींच उठून कांहीं जरूरीचीं पत्रें जासूद यांणीं आणलीं होतीं तीं त्यांजपासून घेऊन वाचतांना कोणाची गडबड होऊं नये ह्मणून, आपला नेहमीचा बसण्याचा दिवाणखाना टाकून एक दोन कारकून कधीं कधीं लिहित बसत असत, अशा एका लहानशा खोलींत बसले आहेत. परंतु ही गोष्ट कोणासही माहीत नसल्या कारणानें हंबीरराव दिल्लीहून परत आले ते प्रथम सरकारवड्यांत आले. आणि नानासाहेबांविषयीं शोध केला तेव्हां दिवाणखान्यांतील पाहरेकऱ्यानें सांगितलें कीं, सरकारस्वारी अद्यापि उठली नाहीं. मग महालाकडील कामगारांत विचारपूस करितां स्वारी सकाळींच उठून बाहेर आली असें समजलें; यावरून ते स्नानसंध्येकडे गेले असतील असें समजून तिकडे शोध केला. तरी तिकडेही नाहींत ह्मणून समजलें. बाहेर सहल करण्यासाठीं गेले ह्मणावें तर खासास्वारीचे सर्व घोडे पागेंत ठाणावरच आहेत, असें दृष्टीस पडलें. बागेंत गेले ह्मणावें तर सकाळचे वेळेस कधीं स्वारी बागेंत जाण्याची वहिवाट नाहीं, तथापि त्याणें तिकडे माणसें पाठवून शोध आणविला; परंतु तिकडेही नाहींत. तेव्हां मोठ्या अचंब्यांत पडून दोन घटकांनीं परतून यावें अशा बेतानें आपण परत आल्याची खबर एक दोन विश्वासू माणसांपाशीं सांगून ठेवून आपल्या घरीं आला, आणि आपण घरांत

कोणासही कळविल्यावांचून फार दिवस गेल्यामुळें घरचीं माणसें फार काळजींत असतील अशा समजुतीनें आपला वाटेचा पोषाग वगैरे अंगावर होता, त्यासहीत मोठ्या लगबगीनें माडीवर गेला व पोषाग काढण्यास दिवाणखाण्यांत चालला आहे, इतक्यांत स्वारी आल्याची खबर ऐकून पुतळाबाई आपणास फार दिवस टाकून गेल्याचा विषाद, आणि पुनः भेट झाल्यामुळें उत्पन्न झालेला आनंद, एकसमयावच्छेदेंकेंरूनच मनांत उत्पन्न झाला असल्या कारणानें भेट होण्याचे उत्कंठेनें, कोणी जवळ पास नाहीं अशी संधि पाहून झटकन् त्यांजकडे गेली; परंतु तिचे पूर्वींच सुभानजीरावांनीं भेट घेतली; आणि इकडील तिकडील गोष्टी काढून जेवणें होऊन हंबीरराव निजावयास जाई तोंपर्यंत मुद्दाम त्याशीं बोलत बसला. ह्मणून तिची भेट हंबीरराव निजून उठल्यावर झाली. तेव्हां त्या दोघांचीं मनें एकमेकांविषयीं कशीं होतीं त्याचें कथन पुढें केलें जाईल.

इकडे नानासाहेब पेशवे हे सर्व पत्रे वाचल्या नंतर बाहेर येऊन आतां नित्यक्रमास जाणार तोंच इतक्यांत कोणी मनुष्य शेजारचे माडींत एकांत पाहून हळूहळू कानगोष्टीसारखी मसलत करीत आहेत असें त्यांस वाटल्यावरून त्यांचें तें बोलणें कांहींसें ऐकून तेथेंच दबकून उभे राहून हे कोण आहेत, व कशाविषयीं बोलत आहेत तें समजण्याचें हेतूनें लक्ष देऊन ऐकूं लागले, तेव्हां पुढें लिहिल्या प्रमाणें बोलणें त्यांचे कानीं पडलें.

**एकजण**.–पण ही गोष्ट सिद्धीस कशी जाते? हंबीरराव तर परत आले, हें आपण मधां प्रत्यक्ष पाहिलेंच. आतां त्याच्यानें[1] जरी आपणास उघड रीतीनें साह्य करवलें नाहीं तरी तो आपणाविरुद्ध वर्तन करील, किंवा आपली मसलत फोडील, असें वाटत नाहीं, तथापि ही गोष्ट मोटया जोखमीची आहे, तितक्यांतून त्या बाईचा तरी भरंवसा! जर कारितां गोष्ट चांगल्या रीतीनें शेवटास गेली तर मग काळजी करणें नको! परंतु बोभाट होऊन मध्येंच कांहीं विघ्न आलें तर मग केवढी फजिती! लोकांत तोंड तरी दाखविण्यास जागा राहील कां?

**दुसरा**.–तोंड दाखविण्याची गोष्ट कशाला पाहिजे? जीव राहील किंवा नाहीं हाच विचार पहिल्यानें केला पाहिजे. या वाड्या पैकीं कोणाजवळही ही गोष्ट बोलण्यापूर्वीं तिकडील अगदीं चांगला बंदोबस्त करून घेऊन मग येथील प्रयत्नास लागावें हें बरें दिसतें.

इतकें बोलत बोलत ते दोघे जिना उतरून खालीं गेले, असा कानोसा लागल्यावर त्यांचें मागून नानासाहेबही जलदीच करून गेले; परंतु प्रथम मोघम आणि पुढें व्हावा तसा जलदीनें शोध झाला नाहीं सबब त्या माडींतील बोलणारे तर सांपडले नाहींतच; परंतु कोण होते तें देखील त्यांस समजलें नाहीं. जों जों थांग लागेना तों तों त्यांणीं अधिकाधिकच तपास केला, लोकांस देणगी देखील देऊं केली, जे कोणी बोलणारे

---

१ सुभानजीरावाच्यानें.

असतील त्यांणीं कशाविषयीं मसलत होती तें सगळें उघड करून सांगितलें असतां त्यांत, आपल्या घाताचा विचार नसेल तर शिक्षा न करितां माफी करण्याचीं वचनेंही प्रगट केलीं; परंतु कोणी कांहीं कबूल होईना. तेव्हां नानासाहेबांचें मन फारच विचारांत पडलें. कारण जे कोणी मसलत करणारे असतील, त्यांणीं आपला सुगावा ठेवून जे कांहीं "बेत" राज्याच्या उलटापालटीचे आपण केले आहेत, त्यांची बातमी कोणा टोपीवाल्यास देऊन आपणांस त्याचे स्वाधीन करण्याची मसलत केली असेल तर फारच वाईट परिणाम होईल. यास्तव त्या दोघांचा शोध लागल्यावांचून उगीच राहणें त्यास योग्य वाटेना. शिवाय हंबीररावाचें नांव त्या मसल ेत निघालें होतें, तेव्हां तो आपल्या विरुद्धतेचे मसलतींत कधीं शिरणार नाहीं असें वाटून त्यास अमळसा धीर वाटला. इतक्यांत मनांत कल्पना आली कीं, कोण जाणे, त्याचेंही मन बदललें नसेलसें कशावरून? व आपणाशीं प्रतरणा करून आंतून टोपीवाल्याकडे त्याचें लक्ष असेल तर आपला मोठाच घात होईल. हें मनांत येऊन तर त्याची अगदीं कंबरच खचल्यासारखी झाली. पुन्हा ती सर्व मसलत कदाचित कांहीं जार कर्माचे विचारानें असेल अशा समजुतीनें नानासाहेब आपले मनाची दिलगिरी दूर करूं पाहत होते; परंतु तसेंही होईना. ती बाई तरी कोण असावी? याच विचाराचे घोळांत त्यांचें मन पडलें होतें. पुढें मनांत आलें कीं, आपली स्त्री

लक्ष्मीबाई इचें बोलणें आपण कितीएक वेळ मोडून काढितों, व ती आपला वरचेवर निषेध करीत असते, याजवरून ती तर अशा मसलतींत नसेलना? कां कीं आपले बेत जितके तिला ठाऊक झाले आहेत तितके दुसऱ्या कोणासही नाहींत. यास्तव तर कोणी सर्व बातम्या फोडण्यासाठीं कांहीं युक्ति करून तिचेंच मन वळवून आपणास धरण्याचा इलाज केला असेल तरी ही वाईटच गोष्ट आहे? तेव्हां आतां काय करावें? ह्मणून नाना साहेबांचे मनाचा मोठाच घोंटाळा होऊन गेला.

आपण कारकुनांचे खोलींत असतां बाहेर कोण बोलत होतें ह्मणून त्यांनीं चौकशी केली; परंतु त्या बोलणारांचे शब्द काय व कशाविषयीं होते ते कोणास कळूं दिले नाहींत; तरी पदरचे कारकून, खिसमतगार, हुजरे, शास्त्री, पांडित वगैरे नानासाहेबांचे वाड्यांत त्यावेळेस एकंदर १५०।२०० मनुष्य होतें, तितक्यांत मोठा गलबा होऊन गेल्या कारणानें नानासाहेबांच्यानें जास्ती चौकशी करवेना. कारण जोंजों अधिक चौकशी करावी, तोंतों लोकांत गवगवा अधिक होणार आणि आपल्या मसलतीसही कदाचित् व्यत्यय येईल, अशा समजुतीनें बाह्यदृष्टीनें त्याचा अगदीं नाद सोडून दिल्यासारखें दाखविलें; परंतु आंतून त्यांचें सर्व लक्ष्य तिकडे लागलें असल्या कारणानें त्यांस त्या दिवशीं कांहींच सुचेनासें झालें होतें.

हंबीरराव परत आले असून आपणास भेटल्या-

वांचून आपल्या घरीं गेले हें जेव्हां त्यांस समजलें तेव्हां तर त्याजविषयीं त्याचें मन फारच बिघडल्यासारखें झालें. हंबीररावांनीं जी चौकशी आणि पुसतपास केली तिची खरी हकीकत त्या गुप्त मसलती करणाऱ्यांचे शोधाचे चौकशीचे गर्दीमुळें नाना साहेबांस कोणी योग्य वेळेस इत्थंभूत न कळविल्या कारणानें व हंबीररावही जेवणापूर्वीं पुन्हा आले नाहींत त्या कारणानें हंबीररावाविषयीं नानासाहेबांचा इतका विपरीत ग्रह होऊन गेला कीं, दुपारीं हंबीरराव आले तर त्यांशीं आपण मन मोकळें करून बोलावें, असें नानासाहेबांस वाटेना इतकेंच नाहीं, पण आतां त्यांची भेट कोणत्या रीतीन घ्यावी ह्मणजे एकांतांत घ्यावी किंवा तशी घेऊं नये व त्यांचे भेटीच्या वक्तींच आपणास कांहीं अपाय होईल कीं काय, अशा मनाचे कलानें नानासाहेब त्या वेळेपासून हंबीररावांस अगदीं आपल्या शत्रूप्रमाणें समजूं लागले.

हंबीरराव भोजनोत्तर नेहमीचे परिपाठाप्रमानें नानासाहेबांकडे येऊन दिल्लीहून आणलेले लखोटे त्यांस देऊन तिकडील सर्व हकीकत सांगून परत जाऊं लागले तरी नानासाहेबांची आपल्याविषयीं कांहीं आनंदवृत्ति दिसली नाहीं हें पाहून मनांत अंमळ खिन्नच झाले; परंतु बाह्यरंगांत ती खिन्नता न दाखवितां कांहीं कामाचें निमित्त सांगून उठून गेले.

---

# भाग ८.

हंबीरराव यांस त्यांचे घरांत नेऊन सोडलें त्याची पुढील हकीकत सांगण्यापूर्वीं त्यांचे घरांतील त्यावेळचे स्थितीचें थोडेसें वर्णन करणें या गोष्टीचे अनुसंधान-साठीं अवश्य आहे सबब तें थोडक्यांत सांगतों.

हंबीररावांची स्त्री पुतळाबाई ही द्वितीय संबंधाची बायको असून त्यांची प्रथम संबंधाची बायको सुंदरा-बाई ही जिवंत होती व सापत्नमातोश्री बायजाबाई हंबीर-रावापेक्षां वयानें फारशी वडील होती असें नाहीं, याजमुळें हंबीररावाचा बाप मेल्यापासून त्याचे घरांत त्या तिघींचीं नेहमीं भांडणें होत असत. त्यामुळें तो फारच त्रासलेला असे. त्या तिघींपैकीं पुतळाबाई मात्र लेखन वाचन, कशिदा काढणें, तसेंच लोकरीचें जाळी-काम करण्यास शिकलेली, स्वभावानें नम्र, सहनशील, कोणी विनाकारण अपमान केला तरी त्याचा एका-एकीं उपमर्द न करणारी, बोलण्यांत चतुर, घरसंसारास जपणारी आणि येणारा जाणाराचें अगत्य बाळगून मान मान्यता राखण्यास झटणारी अशी असे. या कारणानें जरी ती स्वरूपानें साधारण चार बायकांसारखी व वर्णानें कांहींशी काळसर होती तरी हंबीरराव तिचे शाहणपणाचे विचारांवरून जो तिला मान देणें योग्य होता त्यापेक्षां अधिक देत होते. याजमुळें घरांतील चाकर माणसें वगैरे बहुतेक कांहीं तिचे सद्गुण पाहून व कांहीं हंबीररावाचे मनाचा कल पाहून प्रसंगीं सुंदराबाई

किंवा बायजाबाई यांचें मन मोडून पुतळाबाईची मर्जी राखण्यास झटत असत. तेणें करून त्या दोघींस ती अगदीं नकोशी झाली होती पुतळाबाईविषयीं घातबुद्धि धरून सुंदराबाई साहेबांनीं एक दोन वेळ प्रयत्न केले. ले हंबीररावाचें कानावर आल्यामुळें जरी ती स्वरूपानें अति उत्कृष्ट व गायनादिकळांमध्यें पुरुषाचें मन आकर्षण करण्यांत पहिल्या प्रतीची, तशीच कपटबुद्धीनें आपलें वाईट कृत्य छपावून दुसऱ्याचा दोष दाखविण्यांत निपुण, आणि समयविशेषीं साहसकर्माचे प्रसंग उत्पन्न करून त्यांचे योगानें आपली छाप नवऱ्यावर व दुसरे लोकांवर ठेवण्याचे कामीं अगदीं निरलस अशी होती, तरी हंबीररावाचें मन खरोखर तिजवर प्रसन्न नसे.

बायजाबाई ह्मणजे आईसाहेब. ही अगदीं भाबडी असे; परंतु मनुष्य कितीही भाबडें असलें तरी परोत्कर्ष, स्वतःची हेळसांड, व ज्या मनुष्यांत आपण थोडे दिवसांपूर्वीं मोठेपणा आणि अधिकाराचें प्रमुखत्व मोठे तोऱ्यानें मिरविलें त्याच लोकांचें आर्जव करण्याचा प्रसंग आला असतां, प्रसंगानुसार वर्तन करणें योग्य तसें होण्यास फारच मोठा विचारीपणा आणि मनाचें गांभीर्य, तसें समयास शोभा देण्याजोगें उदासीनपणाचें अवलंबन करणें हीं अवश्य पडतात. तीं आईसाहेबांचें हातून तिचे हेकड स्वभावानें होणें अगदीं अशक्य होतीं, यामुळें तिचा एकही दिवस सुखानें जात नसे, ह्मणून हंबीरराव फारच दिलगीर झाले होते.

हंबीररावास स्वतः घरचें कामकाज पाहण्यास बहुधा क्वचितच फुरसद होई, ह्मणून घरांतील सर्व व्यवस्था पाहण्यासाठीं आपला मामा सुभानराव ( ह्मणजे सोनजीरावाचे पहिल्या कुटुंबाचा भाऊ ) सोनजीरावाचे वेळेपासून काम कारभार पाहत होता, त्यासच पांचशे रुपये साल करून ठेविलें होतें; तोच घरांतील आणणें नेणें वासुदेवपंत कारकुनाकडून करवून चाकर माणसें ठेवण्या काढण्याचें कामकाज व दागदागिनें व जामदारखान्याचा बंदोबस्त ठेवीत असे. सुंदराबाईसाहेब ही सुभानरावाचे चुलतभावाची मुलगी फार स्वरूपवती, गोरी, आपल्या देखणेपणास शोभण्याजोगी आहे हें पाहून व सुभानरावानें फार गळ घातल्यावरून हंबीररावांनीं केली होती. याजमुळें सुभानरावाचें मन तिचे बऱ्याकडे फार असे; परंतु तिचा उरमट स्वभाव, व नवऱ्याशीं देखील बेपरवाईची वागणूक, आणि ज्यांत त्यांत प्रतरणा करण्याची तिची खोडी हीं पाहून, बायजाबाईचे मसलतीनें हंबीरावजीनीं, बापाचे मरणानंतर इंदूरचे दाभाड्याची मुलगी पुतळाबाई ही तिच्या सद्गुणांची आख्या ऐकून केली याजमुळें सुभानरावाची मर्जी अंमळ दुखावलीच होती; परंतु इलाज नाहीं, यास्तव कालावर दृष्टि देऊन हंबीररावाचे येथें स्वार्थसाधनाचे हेतूनें वरपंगी उदासानवृत्ति दाखवून दिवस काढीत होता. ही त्याची दुर्वर्तणूक जरी हंबीररावाचे लक्षांत पूर्णपणें आली नव्हती, तरी पुतळाबाईचे दृष्टोपत्तीस आली असल्या

कारणानें जरी सुभानरावाचा उपहास करण्याचा तिचा हेतु नव्हता, तरी आपल्या नवऱ्याचें नुकसान होत आहे हें पाहून तिचें मन वारंवार दुःखी होई; परंतु जुने कारभाऱ्यांस काढण्याचा इलाज इंणे केला, हा दोष आपणावर येऊं नये, ह्मणून तिचे मनांतून कामकारभार सुभानरावाकडे नसावा असें होतें, तरी त्यास काढण्याचें हंबीररावास सांगणें तिच्यानें होईना.

पुतळाबाईचे मनांतील भाव सुभानरावास चांगला कळून आला होता, व तिनें प्रयत्न केला तर हंबीरराव तीस अनुकूल होतील, मग आपलें कांहीं चालणार नाहीं, असें त्यास वाटून तोही पुतळाबाईविरुद्ध चाललेल्या मसलतींस फार अनुकूलता दाखवून आत्मसाधनाचे लोभानें सुंदराबाईसाहेबांचा द्वेष पुतळाबाई विनाकारण करते वगैरेचा ठसा हंबीररावाचे मनावर उठविण्यांत पुतळाबाईचे पातिव्रत्याविषयींही कधीं कधीं संशययुक्त उद्गार काढून हंबीररावांचे मन दूषित करूं पाहत असे. यामुळें जरी तिचे सद्गुण त्याला चांगले आवडत असत, तरी ती तारुण्याचे भरांत असल्यामुळें कदाचित् तिचे हातून पातिव्रत्याचा भंग झाला नसला तरी तिचें मन परपुरुषाकडे जात असेल; अशा शंकेनें पुतळाबाईवर त्यांची असावी तशी प्रसन्नता पूर्णत्वें नेहमी राहत होती असें नाहीं. तथापि ही गोष्ट पुतळाबाईचे लक्षांत देखील बिलकूल नसल्या कारणानें ती हंबीररावांशीं मायाळूपणाचा किंवा अतिशय लोभाचा

पसारा न दाखवितां प्रीतियुक्त भाव ठेवून निःशंकपणानें सरळ रीतीनें वागत असे. त्यामुळेंच सुभानरावांनीं त्याचे मनांत कुकल्पना भराविल्या असत त्यांस कांहीं तरी आधार आहे, असें कधीं कधीं सुंदराबाईसाहेबांचा विशेष लोभ पाहून हंबीररावाचे मनांत आल्यावांचून राहत नसे; परंतु तिच्या व आपल्या वयांत फार अंतर आहे त्याअर्थीं तसें तिचे मनांत येणें जरी सदोष आहे असें ह्मणवत नाहीं, तरी तिचे वांकडें पाऊल पडल्यास तिचे आंगीं कितीही चांगले गुण असले तरी ते सर्व व्यर्थ जाऊन आपण बिलकून तिचें नांव देखील घेणार नाहीं. असा तिचे मनावर ठसा उठविण्याची कल्पना हंबीररावाचे मनांत वारंवार येई; पण वरचेवर कांहीं तरी घाईचे सबबेनें किंवा संकोचबुद्धीनें प्रसंग निघून जात असल्या कारणानें तो दिल्लीहून परत येऊन तिला आरसेमहालांत भेटे तोंपावेतों त्याजकडून तिजपाशीं त्या गोष्टीचा खुलासा करण्याची सवड झाली नाहीं, तेव्हां अर्थातच त्या शंकेनें मन अगदीं दूषित झालेलें असून हंबीरराव दिल्लीस जाण्यापूर्वीं पुतळाबाईचें व सुंदराबाईसाहेबांचें भांडण झालें होतें त्या कामीं पुतळाबाईचाच दोष आहे, असें हंबीररावास वाटून त्या दोघांचा कांहीं दिवस अबोलाच चालू होता. त्याची निवृत्ति होण्यापूर्वीं दिल्लीकडे जाणें झाल्यानें ती गोष्ट त्याचे मनांत वारंवार येत असे, ह्मणून कांहींसा रोषयुक्त व कांहींसा विनोदयुक्त अंतःकरणानें हंबीरराव पुतळाबाईस भेटला, तेव्हां त्यास राहावें तितकें देहभान न राहतां तो भावदा-

रविणाऱ्या शब्दांचा ओघ सहज त्याजकडून तिजशीं बोलण्यांत निघाला तो प्रकार पुढें सांगण्यांत येईल.

---

## भाग ९.

या गोष्टीचे आरंभाचे वेळेस या देशांत इंग्रजी राज्याची व्यवस्था कशी होती याजकडे वाचकजनांनीं थोडेंसें लक्ष फेकलें पाहिजे. सन १८५६ चे आक्टोबर महिन्यांत लार्ड डालहौसी साहेब गव्हरनर जनरलचें काम सोडून विलायतेस गेले. त्या कारणानें त्यांचे माग लार्ड क्यानिंग साहेब नुकतेच त्या कामावर येऊन दाखल झाले होते. डालहौसी साहेबांनीं या हिंदुस्थानचे लोकांवर जे उपकार केले आहेत त्यांचा विसर या लोकांस दहापांच पिढ्यांत ही पडेल असें वाटत नाहीं. अयोध्या, पंजाब, पेगू, नागपुर, सातारा आदिकरून मांडलिक राज्येंच त्यांनीं आपले बुद्धिकौशल्यानें इंग्रजी राज्यास सामील केलीं असें नाहीं; तर इनाम कमिशन, वतनें, हक्कदार यांच्या चौकशा वगैरेची स्थापना करून, या हिंदुस्थानांतील लोक जे जमिनीच्या वीतभर तुकड्यासाठीं प्राण जाई तोंपावेतों भांडणारे ह्मणून आख्या आहे, त्यांची बहुतेक सत्ता जमिनीवरून उडवून टाकली, आणि आपल्या मागेंही तसाच क्रम चालावा ह्मणून त्या अभिप्रायास अनुमोदन देणारे असे कितीएक कामगार यांच्या मोटमोठे हुद्यांचे जाग्यांवर नेमणुका करून चालते झाले. तेव्हां अर्थातच कितीएक संस्थानें व इनामदार नाहींसे झाले.

अशा रीतीनें इंग्रजी मुलखाची विस्तीर्णता बरीच वाढविली गेली, तरी या देशांतील लोकांचे मनाची स्वस्थता राखण्याकडे सरकाराचें लक्ष जितकें असलें पाहिजे होतें त्यांतून कांहीं थोडें जरी असतें, तरी लोकांस इतकी उदासीनता आणि दिलगिरी प्राप्त झाली नसती. फार तर काय सांगावें, मृत्युपत्र अगर वारसपत्र करून आपली स्थावर जंगम इष्टेट कोणी संस्थानिक किंवा बडेलोक यांनीं महारपोरासारखे योग्यतेचे मनुष्यास दिल्यानें देखील इंग्लंडचा कायदा किंवा अधिकारी तिकडे ढुंकून पाहणार नाहींत, अशी विलायतची स्थिति लार्ड डालडौसी साहेबांस माहीत असतां लोभानें किंवा हिंदुस्थानचे लोकांच्या कमनशीबाचा ओंध आल्यावरून त्यांस या देशांत तद्विपरीत नीति व न्याय उत्पन्न करण्याची बुद्धि झाली ! ! हिंदुधर्माप्रमाणें मरणानंतर स्वतांचीं श्राद्धपक्षादि कर्मे होणें आवश्यक असून वंशवृद्धीची काळजी हरएक मनुष्यानें राखिलीच पाहिजे ; औरस पुत्र नसेल तर दत्तकादिप्रकारानें दार मोकळें ठेविल्यावांचून सद्गति नाहीं. म्हणून दत्तक घेण्याची चाल या देशांत अनादिकालापासून चालत आली. ती डालहौसी साहेबांनीं या देशांतील जमिनीशीं ज्यांचा संबंध असेल त्यांचें बाबतींत अगदीं बंद करून या देशांतील मांडलिक राजेरजवाड्यांस व इनामदार वगैरे लोकांस दत्तक घेण्याची मनाई करून त्यांचे मुलूख व जमिनी एका मागून एक कायद्याचे आधराच्या सबबी आपल्या इच्छेप्रमाणें

तयार करून खालसा केल्या! कितीएकांस दत्तक घेऊं दिले ते इतर सर्व कामांस मात्र औरस पुत्राप्रमाणें आपणास दत्तक घेणाराच्या घराण्यांतील अधिकारांस योग्य झाले, पण त्यांस त्यांचे वडिलार्जित संस्थानावर व स्थावर मालमत्तांवर सत्ता करण्याचा प्रतिबंध केला. तेव्हां अर्थातच "सब घोडे बारा टक्के" या म्हणीप्रमाणें रावापासून रंकापर्यंत सर्वांची योग्यता कांहीं दिवसांनीं सारखी होणार असा रंग पाहून संस्थानी, बडे लोक व इनामदार लोक अगदीं भयभीत होऊन गेले. कोणते वेळेस काय कायदा होऊन कोणते प्रकारचा रयतेवर कायदेशीर जुलूम होईल याविषयींही बिलकुल भरंवसा पटेनासा झाला.

बरें अशा रीतीचे अन्यायानें मुलूख वाढविला तरी त्याचा बंदोबस्त राहण्यासाटीं योग्य अशी यूरोपियन किंवा नेटिव फौज वाढविण्याची तरी कांहीं तजवीज करावयाची. होती तीही केली नाहीं. व एकंदर असलेल्या नेटिव फौजेची तरी व्यवस्था चांगली ठेवावयाची होती. तीही ठेविली नाहीं; यामुळें अयोध्या प्रांतांतील पूरभये शिपायांचा भरणा बंगाली फौजेंत विशेष होता, त्या कारणानें व अयोध्या प्रांत खालसा केल्यामुळें, त्यांच्या जमिनीवरील सत्तेस इंग्रजी कायद्यानें व्यत्यय येण्याची भीति उत्पन्न झाली, या कारणास्तव ते बिथरले गेले होते, व पूरभये वगैरे उत्तर हिंदुस्थानचे लोकांशिवाय बाकी मुंबई व मद्रास येथील फौजेच्यानें पूरभयांचा समुदाय मोठा सबब सर्व देशाचें रक्षण

व बंदोबस्त यथायोग्य राखवेल अशी कल्पना करणें देखील बिलकुल योग्य नव्हतें. पूरभये लोक बदलले तर त्यांचे भीतीस्तव किंवा मसलतीनें दुसरे लोक सरकाराशीं सलोख्यानें खचित राहतील असें समजणें-ही मोठें भयंकरच होतें. तेव्हां उत्तर हिंदुस्थानांतच पाहिलें तर पेशावर पासून पेगूदेश पावेतों सोळा हजार मैल लांबीचा आणि ७।८ कोटि लोकांचे वस्ती-चा प्रदेश, केवळ १८ गोऱ्या पलटणी, परंतु त्यांतही लढाऊ सुमारें पंधरा हजार सोजीर लोक मात्र, यांचे संरक्षणांत असणें मोठी विचाराची गोष्ट होती असें कोणाच्यानेंही ह्मणवणार नाहीं. कां कीं, ही स्थिति पाहून त्या विस्तीर्ण प्रदेशांत नुकतेच खालसा केलेले अयोध्या, पंजाब, व पेगू हे तीन मुलूख असल्या कारणानें ज्यांचे मनांतून बंडावा करण्याचा हेतु नसेल त्यांस देखील तशी बुद्धि न होईल तर आश्चर्य समजलें पाहिजे.

राज्यें, संस्थानें व इनामें वगैरे खालसा केलीं तेव्हां शिपाई लोकांचीं मनें न बिघडण्याचा कांहीं बंदोबस्त ठेविला असेल असें कदाचित् कोणास वाटेल; परंतु त्या कामींही जी अतोनात बेपरवाई दाखविली होती त्यांचें आश्चर्य वाटल्यावांचून राहत नाहीं. ती बेपरवाई अशी कीं, बहुतेक पलटणींत जुन्या जुन्या व प्रौढ प्रौढ आफिसर लोकांस स्टाफ ड्युटीवर नेमून त्यांस या देशांतून पैशाचा फायदा करून देण्याकडे वरिष्ठांनीं लक्ष पुरविलें. या कारणानें व कितीएक तसे अंमलदार रजेवर असल्याकारणानें बहुतेक पलटणींतील मोठमोठे अधिका-

र अल्पवयी, गैरमाहित व अडाणी अशा साहेबलोकांचे स्वाधीन ठेवणें प्राप्त झालें; तेव्हां अर्थातच त्यांचेकडून पलटणींतील नेकीनें काम करणारे जे सुभेदार, जमादार वगैरे नेटिव आफिसर होते त्यांचा मानमरातब रहावा तसा राहीनासा झाला, या कारणानें ते अंतःकरणांत वारंवार दुखावले जात आणि तितक्यांत चरबी लाविलेल्या तोटद्यांचाही उपयोग करून पाहण्याची संधि तेव्हांच आली असून, नेटिव शिपायांकडून तें काम करविण्यांत योग्य समजूत न देतां बेफिकीरपणानें अमळ विशेष सक्ति केली गेली. या कारणानें आपणास आतां बाटविण्यासाठीं हे तोटे सरकारांनीं काढले आहेत, असें बहुतेक शिपायांचे मनास वाटूं लागलें; तेव्हां जों जों त्यांची समजूत काढण्यासाठीं भलभलतेच रीतीनें उपाय होऊं लागले तों तों ही सर्व फसवणूक आहे, आपण एकदां बाटलों ह्मणजे रशिया वगैरे बाहेरील देशांत आपणास लढण्यासाठीं नेण्याची सोई करण्याकरितां सरकारांनीं ही युक्ति काढली आहे, असा शिपायांचे मनांतील भाव बळकटीस येऊं लागला. त्याच संधीस धर्माभिमानी लोकांनीं आपलें हित साधण्याचे हेतूनें शिपाई लोकांस फारच चढीं दिलें, या कारणानें प्राण गेला तरी जाओ; परंतु गाईची चरबी लावून तोटे केले आहेत ते आपण दांतानें तोडणार नाहीं, असा हिंदु शिपायांनीं निर्धार ठरविला, व डुकराची चरबी आहे असें समजून ते दांतांनीं न तोडण्याचा मुसलमान शिपायांनीं निश्चय केला;

तेव्हां ह्या धर्माचे बाबतींत कट विशेष लौकर होतो हें पूर्वापार इतिहासावरून सर्व देशांत दिसून आलेलेच आहे. याप्रमाणें सर्व हिंदु व मुसलमान या शिपायांचा कट सहजच त्या संधीस बनून आला होता. हें सर्व ठाऊक असतां किंवा समजण्याजोगीं चिन्हें दिसत असतां डालहौसी साहेबांनंतर कोणी पोक्त विचारी, दूरदर्शी, राजकारस्थानांत हुशार व स्वतः मोठा उद्योगी असा मनुष्य गव्हरनर जनरलचे कामावर आला असतां, तर कदाचित त्यानें या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून ठिकाठिकाणचे बंदोबस्तांत कमताई असलेली पाहून जिकडे तिकडे व्यवस्था केली असती; परंतु तसें न होतां लार्ड क्यानिंग साहेब हे त्यांचे स्थानावर नेमले गेले, या कारणानें ज्यांचे लक्षांत ह्या सर्व अव्यवस्थेचें चिन्ह येऊन चुकलें होतें, त्या लोकांस सहजच वाटूं लागलें कीं, त्यांची नेमणूक करणारांस या देशांतील या वेळेची खरी स्थिती चांगलीशी माहीत नाहीं. ह्मणून साधारण कोणास तरी अशा महत्वाचे स्थानावर नेमून त्या जाग्याचा पगार दिल्यानें किंवा एखादा विशेष योग्य मनुष्य पाठविल्यानें कांहीं भेद अगर तफावत होईल असें वाटलें नसावें. कारण कीं, हे लार्ड क्यानिंग साहेब २० वर्षें पार्लमेंट सभेंत बडे लोकांचे मंडळींत होते तरी त्यांजकडून कोणतेही कारणानें प्रख्यातीस येण्याजोगी कांहीं गोष्ट झाल्याचें कोठें आढळलें नाहीं, तेव्हां या उष्ण हवेचे कारणानें युरोपियन लोकांनीं नेहमीं ऐषआरामांत राहिलें

पाहिजे असा सिद्धांत होऊन गेला असून व सर्व युरोपियन लोक थाटानें सुखोपभोगांत दिवस ढकलीत आहेत, असें प्रत्यक्ष उदाहरण डोळ्यापुढें असून त्यांचें हातून आपलें जोखमीचें काम मेहनत घेऊन होऊं सकेल अशी आशा ठेवणें अगदींच अयुक्तिक होतें. बरें, जरी लार्ड क्यानिंग साहेब यांचें हातून विशेष व्हावी तशी वर्तणूक होण्याचा संभव नव्हता ही गोष्ट एकीकडे ठेविली, तरी त्यांचें कौंसिलदार व इलाख्यांचे गव्हरनर यांजकडून तरी राहवा तसा बंदोबस्त राहण्याची तजवीज झाली असती, तर देखील बरेच अंशीं लोकांचें व सरकारचें हित झालें असतें; परंतु तसेंही घडून आलें नाहीं. कारण कीं, क्यानिंग साहेबांचे राज्यकारकीर्दीतील कौंसिलांत डारीन साहेब पैशाचे व्यवस्थेकडील कौंसिलदार होते; त्यांनीं कोणते तरी रीतीनें जमाखर्चाची खटपट करून पुष्कळ शिलक राहते असें दाखविलें ह्मणजे राज्याची समृद्धि चांगली आहे, असें सहजच लक्षांत आल्यावांचून राहत नसे. दुसरे कौंसिलदार जनरल लसाहेब हे ५२ वर्षें या देशांत चाकरी करीत असल्यामुळें त्यांचे हातून व्हावें तितकें साह्य होण्यास त्यांचें प्रकृतीचे मानानें शक्य नव्हतें. एरवीं नागपूर खालसा न करण्याचे कामांत त्यानीं आग्रह धरला होता. तशीच अयोध्याप्रांत घेण्याचे वेळेसही आपली नाखुषी दाखविल्यामुळें ते न्यायी, व या देशांतील लोकांविषयीं कनवाळु असल्याची बरीच प्रख्याति झाली होती; परंतु आपले इच्छेप्रमाणें गोष्टी घडून आणण्याचें

सामर्थ्य त्याच्यांत नसल्या कारणानें त्यांपासून फारसें हित होत नसे.

तिसरे कौंसिलदार ग्रांटसाहेब. हे सिव्हिलियन असून कोणतेही कामांत हरकत घेणें हा त्यांचा पिढीजात बाणा असे, व चाल, वहिवाट किंवा ठरलेल्या रीतीभाती न मोडण्याविषयीं जपण्याकडे त्यांचें लक्ष विशेष असे. या कारणानें लार्ड क्यानिंग साहेबांचा स्वभाव दुसरे कोणाचे धोरणानें आपण चालतों, असें लोकांस वाटूं नये अशा समजुतीचा होता, ह्मणून भलतेच कामांत, ते कानाचे हलके असत ह्यामुळें, पाहिजे तशा गोष्टी घडून येत अशी लोकवार्ता असे; वास्तव ग्रांटसाहेबांचें तेज त्यांचे कारकीर्दीत बिलकुल राहिलें नव्हतें.

याशिवाय लॉ मेंबर–हिंदुस्थानांतील सर्व सैन्याचे अधिपति जेव्हां कलकत्यास असत, तेव्हां आपले हुद्याचे नात्यानें राज्यकारभारांतील विचार करण्यासाठीं कौंसिलांत बसत; परंतु त्यांचें तेथें नेहमीं राहणें होत नसे, व राज्याचे व्यवस्थेत त्यांचें लागावें तसें मनही लागत नसे, या कारणानें अर्थातच राज्यव्यवस्थेचे कौंसिलाची, व कायदे करण्याचे कौंसिलाची सर्व खटपट सर बार्नेस पीकाक हे मोठे उद्योगी असले कारणानें त्यांच्यांवर बहुतेक अवलंबून राही. हे पीकॉक साहेब ब्यारिस्टरीचें काम करीत असतां त्यांनीं मोठे युक्तीनें मिस्तर ओकानिल यांस सोडविलें या कारणानें त्यांच शाहणपणाची फारच वाखाणणी झाली होती, व सर्व कामें त्यांचे

धोरणानें चालत, यासाठीं पीकाक साहेबांनीं या देशांत कायदे करण्यांतीलच चांगुलपणाकडे लक्ष ठेवण्यापेक्षां त्यांची संख्या वाढविण्याचा अधिक अभिमान धरला असें वाटतें. कारण कीं, कांहींना कांहीं तरी कायद्याचा मसुदा आणल्याखेरीज पीकाक साहेब बहुधा शनवार जाऊं देत नसत, व ते मसुदे पसंत होऊन त्यांस कायदा ह्मणविलें जाण्यास एक तासाचाही अवकाश लागत नसे असा बोभाटा आहे. कारण कीं, कायदे करणारे मंडळीपैकीं बाकी कोणीही तिकडे विशेष लक्ष देण्याचे खटपटींत पडत नसत.

याशिवाय हल्लीं डे साहेब हे त्या वेळेस बंगालचे लेफ्टेनेंट गव्हरनरचे जाग्यावर असून हारिस साहेब मद्रासचे गव्हरनर, आणि एलफिन्स्टन साहेब मुंबईचे गव्हरनर होते, व कॉलविन साहेब वायव्य प्रांताचे लेफ्टेनेंट गव्हनर होते. हे चौघेही आपआपले स्वभावाप्रमाणें गव्हरनर जनरलच्या कारकीर्दीचा कल पाहून वर्तन करण्याकडे विशेष लक्ष्य लावीत असल्या कारणानें राजेरजवाडे, संस्थानी, इनामदार वगैरे लोकांचीं तशींच पलटणीलोकांचीं मनें अमुक अमुक जुलमी वहिवाटीचे कारणानें फारच बदलून गेलीं आहेत असें कोणाच्या लक्षांत आलें असलें तरी आपणावर त्याची कांहीं विशेष जोखीम नाहीं, असें समजून ते सर्व काळ घालवीत होते असें वाटतें. वास्तव ज्या ज्या बाबतींत लोकांचीं मनें दुःखविलीं गेलीं होतीं त्या त्या बाबतीं तशाच चालू राहिल्यामुळें लोकांनींही वैतागल्या-

सारखें होऊन जेणंकरून इंग्रजलोकांविरुद्ध जमाव जमेल तसे प्रयत्न चालू केले. त्याचाच परिणाम सन १८५७ सालचें बंड हा आहे असें समजलें पाहिजे.

आतां लार्ड क्यानिंग साहेबांचे स्वभावाप्रमाणें उला-ढालीचीं व गडबडीचीं कामें होण्याचा संभव नव्हता ह्मणून त्यांच्यांत कांहीं चांगुलपणा नव्हता असें नाहीं. बडे लोकांचे खानदानीचे घराण्यांस भूषण जी भूतदया ती त्यांचे अंतःकरणांत चांगलेच प्रकारें वास करीत असे; परंतु डालहौसी साहेबांचे पूर्वीं किंवा त्यांचे वक्ती लार्ड क्यानिंग साहेब हिंदुस्थानांत गव्हरनर जनरल होऊन आले असते तर त्यांचे सौजन्याची आणि दयाळूपणाची लोकांत फारच वाहवा झाली असती; परंतु डालहौसी साहेबांनीं सर्वस्वी घोटाळा होण्याजोगीं कृत्यें केल्यानंतर हे आले. या कारणानें यांचें चांगुलप-णाचा अम्मल बसण्यास जागाच नाहींशी झाली होती. परंतु शेवटीं बंडाचा कहर उसळल्या नंतर क्यानिंग साहेबांचे क्षमाशीलपणानें राणीसाहेबांचा जाहिरनामा व बंडवाल्यांस साधारण क्षमा देण्यात यांचे चांगुलपणानें किती हित झालें त्यांचें वर्णन या स्थळीं केलें पाहिजे असें नाहीं.

---

## भाग ५.

मागील एका भागांत सांगितल्याप्रमाणें हंबीरराव निजून उठण्याचे संधींत पुतळाबाई गेली, आणि ते जागे झाले आहेत असें पाहून तिनें त्यांचा हात विनोदयुक्त

हावभावानें धरिला; परंतु दोघेंही एकमेकांशीं कांहीं न बोलतां कांहीं वेळ तशींच एकमेकांकडे पाहात राहिलीं. कारण कीं, आपणास कळविल्यावांचून इतके लांबाचे प्रवासास गेल्या कारणानें मनास वाईट वाटल्याचें दुःख, आणि फार दिवसांनीं भेट झाल्यामुळें उत्पन्न झालेला आनंद, यांचे मिश्रणानें पुतळाबाईचे मनाचा फारच घोटाळा होऊन गेला होता, ह्मणून तिचे तोंडांतून बरा किंवा वाईट कांहींच शब्द निघेना; आणि हंबीररावांसही तिला एकांतस्थळीं पाहतांच दिल्लींत ताजबीचे महालांत आपण असतां काय काय झालें त्याची एकदम आठवण होऊन ती गोष्ट इला कळली तर ही काय ह्मणेल या अचंब्यानें, आणि आपण गेलां तेव्हां इचा व आपला अबोला होता; तर आतां आपण होऊन जर रहस्याचें बोलणें सुरू केलें तर ती गोष्ट आपण विसरलों असें होईल; तसें होऊं द्यावयाचें नाहीं वगैरे कितीएक ब-या वाईट कल्पना एकदम त्याचे मनांत उभ्या राहिल्या, या कारणानें त्यांजकडून बोलण्याचा आरंभ झाला नाहीं. तेव्हां अशा स्थितींत दहा पांच पळें गेल्यावर पुतळाबाईस ती मुग्ध अवस्था कंटाळवाणी वाटल्यावरून तिणेंच बोलण्यास आरंभ केला.

पुतळाबाई.—अझून देखील अबोलाच ठेवावयाचा कां? असा मजकडून अपराध कोणता तरी झाला आहे, तो सांगावा ह्मणजे क्षमा मागतें. मला कळविल्यावांचून इतकें लांब जाणें होईल असें मला कधींही वाटलें नव्हतें पण....

**हंबीरराव.**–शहाणे बायकोला नवऱ्याची गरजच नाहीं. तर मग लांब जातांना तिला कळविण्याची तरी काय गरज आहे? कोणीकडून तरी बायका सुखांत असल्या ह्मणजे झालें.

**पुतळाबाई.**–(अमळ चपापल्यासारखी होऊन) नवऱ्याचे समागमावांचून बायकांस सुख तें कोठून लागेल? आईबापांनीं एकदां नवऱ्याचे स्वाधीन केलें ह्मणजे नवऱ्याची सुप्रसन्नता तेंच बायकांचें सुख. नवरा जवळ नसतां कोणत्या बायका सुख मानीत असतील त्या मानोत. मला तर कधीं सुख वाटत नाहीं. (असें ह्मणून बळेंच त्यांचे आंगाशीं आंग लागे अशी बसते.)

**हंबीरराव.**–(किंचित उदासवृत्तीचा भाव दाखवून) ह्मणूनच इतके दिवस अबोला ठेविला आहे वाटतें? आपणच होऊन त्यांच्याशीं (सुंदराबाईशीं) प्रथम भांडण काढलें तर काढलें. बरें, (सुभानराव) मामाजींनीं दोघींस समजून सांगितल्यावर तर उगीच रहावें? पण तुह्मी पडलां शहाण्या, लाडक्या; मग कशाला दुसऱ्या कोणाचीं परवा कराल! तुह्मी पाहिजे तशा नाचलां तरी नवऱ्यानें रागें भरूं नये, किंवा कांहीं शिकविण्याची गोष्ट सांगूं नये, ह्मणजे नवरा चांगला, नाहीं तर वाईट असेंच ना?

**पुतळाबाई.**–(मागील भांडण काढण्याचें बिलकुल मनांत नव्हतें तरी तिजवर केलेल्या खोट्या आरोपाची सफाई करण्याचे हेतूनें) रागें भरण्याची किंवा शिक-

विण्याची गोष्ट सांगण्याचें तर काय; पण या जिवाचे आपण सर्वस्वी मालक आहां, यांत कांहीं संशय नाहीं. आतां मागील गोष्ट काढली ह्मणून बोलणें प्राप्त आहे. मी वाईट तर खरीच, पण ज्या मनुष्याची मला बिलकुल माहिती देखील नाहीं, तो मनुष्य मजकडे अवेळीं आणि एकांतांत येतांना पाहिल्याचें दोघांनीं होऊन स्थापित केलें तर मला बोलल्यावांचून कसें रहावेल याचा आपणच विचार करावा ? मामाजींनीं होऊन तंटा कसा काढला हें मी सांगूं लागलें तेव्हां आपण मजवरच रागावलां, तेव्हां मलाही वाईट वाटलें. ह्मणून मी तें सर्व गिळून स्तब्ध राहिलें. त्या दोघांचे मनांतून मी नसावें असें आहे, हें मीं कितीएक उदाहरणावरून दाखविलें तरी आपली खात्री होत नाहीं, तेव्हां दैवच वाईट ह्मणून "भांडण्यापेक्षां अबोला बरा". असें समजून त्या दिवशीं मलाही वैराग आला होता सबब बोललें नाहीं; आणि दुसरे दिवशीं एकाएकीं जाणें झालें तेव्हां माझे जिवाला किती वाईट वाटलें असेल तें माझें मलाच ठाऊक. बरें आतां हात जोडून क्षमा मागतें ह्मणजे तर झालें ना ?

**हंबीरराव.**—माझी क्षमा मागून काय उपयोग? मामांची आणि आपल्या सवतीची क्षमा मागितली पाहिजे. ती कशी झाली तरी माझी बायको तर खरीना ? तितक्यांतून तुझेपेक्षां वडील आहे, तर तिला त्वां असें टाकून बोलावें आणि मामा रागें भरले तर ते पक्षपात करितात ह्मणून दोष लावावा ! ! आज इतके

दिवस ते आमचे येथें आहेत. बाबांचे वेळेपासून सर्व कामकाज मुखत्यारीनें करतात. मी देखील त्यांस वडिलांप्रमाणें मान देतों. त्यांस त्वां असें टाकून बोलावें कां ? मामांचा आणि तिचे माहेरचा नातलगपणा आहे, ह्मणून त्यांनीं वाजवी गोष्ट सांगितली तरी ती पक्षपाताचीच झाली कां ? तें कांहीं नाहीं. तुझांला आपले शहाणपणाचा गर्व झाला आहे, ह्मणून कोणासच मानीनाशां झालां आहां. नवऱ्यास देखील आपल्या हुकुमांत वागविण्याचा तुमचा बेत दिसतो; पण आह्मीं शिपाई भाई. वेळेस प्रत्यक्ष बापाला देखील मोजायाचे नाहीं, ते का बायकोचें आर्जव करणार? आणि तितक्यांतून जी बायको आपले आढ्यतेनें दुसऱ्यास छळिते तिचे स्वाधीन राहणें तर आमचे कडून कधींही होणार नाहीं. तुला वाटत असेल कीं, मी शाहणी, तेंव्हां पाहिजे तशी वागलें तरी नवरा काय करणार आहे? पण शहाणपणा हाच बायकांचा मुख्य गुण आहे असें नाहीं. आतां आपल्या वयाची फार तफावत आहे, त्याकारणानें अल्पवयी मनुष्याच्यानें पोक्तपणाची वर्तणूक होणें अशक्य आहे, तरी समंजसपणा आहे तर असलेल्या स्थितींतही सुख लावून घेण्याचा मार्ग नाहीं असें नाहीं. सारांश असलेले शहाणपणाचा योग्य उपयोग करून आपणास आणि दुसऱ्यास सुख दिलें पाहिजे. नाहीं तर तेंच शहाणपण नाशास कारण होऊन विपत्तींत पाडतें तें मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं.

**पुतळाबाई.**–(अमळ क्रोधयुक्त वाणीनें) मी तरी

कोठें शहाणपणाचा डौल दाखवितें आहें? आणि शहाणपणा तरी काय हाका मारितो आहे ? नुस्तें लिहितां वाचतां आलें ह्मणजे मोठें शहाणपण झालें असें नाहीं. ( डोळ्यांत पाणी आणून ) मजवर कसलींही तुफानें घेतलीं तरी मी कांहीं बोलूं नये असाच आपला हुकूम असेल तर आजपासून पाहिजे तर तसें करीन. पण तेणेंकरून माझा घात होणार नाहीं असा तरी काय भरंवसा आहे ? बायकांचें जिणें ह्मणजे कांचेचें भांडें. पुरुषाचे मनांत एकदां भलतासा संशय कोणी दुष्टपणानें आणून दिला तर पुढें काय गति होईल, या भीतीनें मला बोलणें प्राप्त होतें. दुसरें कांहीं नाहीं. तेंही आपणास आवडत नसेल तर आजपासून कानाला खडा लावून घेतें, मग तर झालेंना!

**हंबीरराव**.–( तिचें ह्मणणें काय आहे तें तिला सांगण्यास एकदां सवड द्यावी अशा हेतूनें ) एकुण ते तुझ्यावर खोटाच आरोप घेतात तर. बरें, तो खोटा कसा हें दाखविण्याची इच्छा आहे तर दाखीव पाहूं, हा मी ऐकण्यास तयार आहें.

**पुतळाबाई**.–( अमळ हर्षित होऊन ) अशी आपण बारीक रीतीनें दोघांचेही ह्मणण्याची चौकशी कराल तर मग दोषी कोण आहे हें सहजच दिसून येईल. सांगण्याचें ह्मणजे फार आहे असें नाहीं. मी त्या दिवशीं . . . . ( इतक्यांत दाराजवळ कोणी आलें हें पाहून उगीच राहते. )

**हंबीरराव**.–( नाना साहेबांकडील बोलावणें आलेलें

पाहून ) आतां मला गेलें पाहिजे. रात्रीं ऐकून घेईन (असें ह्मणून निघून गेले.) पुन्हा रात्रीं आल्यानंतर तिनें आपले तर्फेचें जें काय सांगावयाचें होतें तें सांगितलें; परंतु हंबीररावाचें मन सुभानरावाचें कपट व मायावी भाषण यांनीं अगदीं मोहून टाकलें असले कारणानें तिचे बोलण्यापासून कांहीं विशेष फायदा झाला असें नाहीं; परंतु तिचे तर्फेचा मजकूर ऐकला गेल्यानें तिचें ह्मणणें काय आहे हें समजल्यापासूनच तिचें हित कसें झालें तो प्रकार पुढें दाखविण्यांत येईल.

---

## भाग ११.

सुभानराव एके दिवशीं आपले उधळेपणामुळें जमाखर्चांत तूट आली ती कशी भरवावी याचे विचारांत निमग्न असतां सुंदराबाईसाहेब फार लगबगीनें त्याजकडे आल्या आणि हास्यमुद्रेनें आपलें कार्य सिद्धीस गेल्याचे कृतकृत्यतेचा भाव दाखवून ह्मणतात.

**सुंदराबाई.**—मामा आतां आपलें काम झालें असें समजा. तुह्मी भीत होतां त्याबद्दल आतां कांहीं काळजी करण्यास नको. ठरविलेले बेताप्रमाणें तिची एक नवीच शिवलेली चोळी बाळासाहेब ( पेशवे ) यांचे उशीखालीं ह्मटले वेळेस निघावी असा बंदोबस्त सटवाजीचे द्वारें सिद्धीस जावा तसा गेला आहे. बाळासाहेबांचा तिजकडे डोळा असल्याचा बोभाटही आतां पुष्कळ लोकांचे तोंडून ज्याचे त्याचे ऐकण्यांत येई असें केलें आहे, तर त्यांचे ( नवऱ्याचे ) ही समजुतीस ह्मणजे आ-

तां आला नसेल असें वाटत नाहीं. नानासाहेबांचे तर कानावर गेलाच. त्यांत कांहीं भ्रांति नाहीं. आतां तुह्मी स्वस्थ असा, आणि काय काय मजा होते ती पाहा.

**सुभानराव.**–( अमळ आनंदवृत्ति दाखवून ) तुमी ह्मनूतां ती गोष्ट खरी, पन सटव्यासारखे मनुक्षाचा काय भरोसा धरतां येतोया ? पुतळाबाई नेहमीं ( पेशव्यांचे ) सरकारवाड्यांत जात्यात आन् चार चार घडी तिथ राहत्यात ह्यें वाईट हाय्ये असें मी पाहिजेल तसं बन्यासाबांचे मनांत भरवून दिलं हाय्ये, व तिला तकड जान्याची बंदी करन्याचं त्यांनीं बोलूनबी दावलया, अन समद्या गोष्टी जशा जमान्या तशा जमल्या हायता, तवा आतां दुसरा इचार मनामंदी व्हातो पन् ती खटपट करन्याचं कारन राहिलं न्हाई.

**सुंदराबाई.**–छे छे, हें तुम्ही अमळ वाईट केलें. ( अमळ विचार करून ) असो, झाली ती गोष्ट येत नाहीं. पण ( बन्या साहेबाची ) स्वारी ( पेशव्याचे ) वाड्यांत असतां इणें तिथें जावें आणि तिथें सर्वांदेखत फजिती झाली ह्मणजे ती या घराचा उंबरा चढली तर मला विचारा. अहो कानाडोळा करतात तो कोठपावेतों ? हा सूर्य आणि हा जयद्रथ दाखविला नाहीं तों पावेतों. इतकीं आपण पांचसात जण आज वर्षभर सारखीं झटतों आहों, तरी ही इतकीशी गोष्ट सिद्धीस जाईना मग काय उपयोग ?

**सुभानराव.**–( अमळ विचाराचा भाव दाखवून ) त्यं समदं खरं, पन भीति कायती गुप्त गोष्ट उगाडीस

येथाची. ती मोठी चतुर, धुरत, आनि खोलबुद्दीची हाय्ये. तुमां अमांसारकी भावडी न्हाई. कवाच आपली मसलत उघाडीस आनील त्येचा बगा नियमबी लागणार न्हाई. तुमी बायजाबाईचं मन आपलीकड ठेवायची मात्र चांगली तजईज ठिवा. बाळासाबांचा बाहेरखेलीचा बोभाटा व्हवून नानासाब त्यांला परवांबी उपदेस करीत व्हते, तवा ही गोठ्ठ बरीच जुळण्याजोगी हाय्ये; पन बाळासाबांकरितां नानासाबांनीं जराकूशी दाबादाबी केली तर मग (बन्यासाब) जरी तिचे इरुद्द झाल तरी कदाचित् त्येच्यान तिला शिक्षा करवनार न्हाई. बरं, पन त्ये गोष्टी झोरल्या हायेता पन.....

**सुंदराबाई.**—नानासाहेबांच्यानें अशा कामांत पडवत नाहीं, आणि तशांतून आतां ते बहुधा दिल्लीकडे जातील असें वाटतें. कारण त्यांचे बेताप्रमाणें मिरत वगैरे ठिकाणीं बंडें होऊन तिकडले पलटणी लोक दिल्लीस जाऊन पोंचल्याची मी नुकतीच बातमी ऐकिली आहे. त्याचें मन कोठें या अशा गोष्टींकडे लागतें आहे. ते नेहेमीं पलटणी आणि राज्याचे घालमेलींत आहेत, तेव्हां त्यांची भीति धरणें नको. सटवाजी आणि मल्हारराव ह्मणजे बाळासाहेबांचा खिसमतगार हे दोघे कोठें वाड्यांत बोलत होते, तें नानासाहेबांनीं ऐकिलें तेव्हां त्यांनीं पुष्कळ चौकशी केली, कोण व काय बोलत होते तें समजावें ह्मणून बक्षिसेंही देऊं केलीं, पण त्या दोघांनीं मोठे शिताफीनें गोष्ट अगदीं

फुटूं दिली नाहीं. याजवरून ते विश्वासु आहेत, हें खचित मान्य करण्यास कांहीं हरकत नाहीं. फक्त त्यांस वरचेवर पैसा मात्र दिला पाहिजे, ह्मणजे ते कधींही फुटावयाचे नाहींत, हें तुह्मी खचित समजा. ( इतक्यांत नानासाहेब पेशवे फार लगबगीनें मोठे दरवाजांत आलेसे पाहून दोघे दोहींकडे होऊन सुभानराव त्यांस सामोरा गेला. आतां नानासाहेब पेशवे त्यावेळेस कां आले याचा प्रकार पुढें प्रदर्शित केला आहे त्यावरून कळून येईल. )

---

## भाग १२.

तारीख २० माहे मे सन १८५७ रोजीं सकाळींच कानपूरचे छावणींत कांहीं जरूरीचे कामासाठीं नानासाहेब गेले होते. तेथें त्यांस त्यांचे साहेब लोकांपैकीं एका विश्वासु मित्राकडून बातमी लागली कीं, वायव्याप्रांताचे लेफटेनेंट गवर्नर कालविनसाहेब यांचे कडची खबर आली आहे कीं, दिल्लीस मोठेंच बंड होऊन सुमारें तीस युरोपिनांस बंडवाल्यांनीं ठार मारलें, आणि पलटणीचे सर्व शिपायांनीं एकदम होऊन दिल्लीचे बादशाहाचे मुलास राजा करून आपण स्थापित केलेले राज्याचा अंमल आसपासचे प्रांतावर चालू केला, आणि राज्यस्थापनेचे व्यवस्थेंत बंडवाले गुंतले आहेत, त्याअर्थीं ते सध्यां दिल्ली सोडून जातील असें वाटत नाहीं. इतकेंच नाहीं, तेथेंच आपली सामानसुमानाची आणि दारूगोळ्याची बेगमी करून तेंच ठिकाण बचावासाठीं

मजबूत करण्याचा त्यांचा रंग दिसत आहे, आणि लूट वगैरे करून सुमारें पन्नास लक्ष रुपये त्यांनीं मिळविले असावे असें वाटतें, व दिल्लीचे बादशहाचें ह्मणणें कीं, बंडवाल्यांपुढें आपला कांहीं इलाज चालत नाहीं, सबब आपणास बंडवाल्यांचे स्वाधीन व्हावें लागलें आहे, व ते सांगतील तसें वागणें भाग पडलें आहे, अशी बातमी ऐकून नानासाहेब घाई घाईनें परत ब्रह्मवर्तास आले, आणि खरी हकीकत कळावी ह्मणून पत्र लिहिण्याची तयारी करीत आहेत इतक्यांत नानासाहेबांचा परम मित्र.... दिल्लींत होता त्याजकडून पत्र घेऊन एक जासूद मोठे लगबगीनें आला. तें पत्र वाचून पाहतात तों त्यांत असें लिहिलें होतें कीं, "छ १६ रमजान आदितवार रोजीं बयावलरीपैकीं सुमारें ८५ स्वारांस चरबीचे तोटांचे बाबतींत (धर्मसंबंधानें) कैदेची शिक्षा मिरत तेथें होतांच त्या वीरश्रीनें सगळी पलटण उलटून पडून जाऊन त्यांनीं बंड करून त्या कैद्यांस सोडविलें, आणि युरोपियन व नेटिव मिळून सुमारें २०० लोकांस ठार मारून बंडवाले लोक दिल्लीस आले तेव्हां मिस्तर फ्रेजर वगैरे साहेब लोक कांहीं स्वार बरोबर घेऊन त्या बंडवाल्यांशीं सामाना करण्यास गेले; परंतु त्यांस जय न येतां बंडवाल्यांची सरशी होऊन त्यांणीं साहेबलोकांचा फडशा उडविला, लष्करचे छावणीकडे वळून तेथील सर्व इमारती जाळल्या, छावणींतील दुकानांची लुटालूट करून तेथील वस्ती उठवून दिली, आणि, राजवाड्यांत

प्रवेश करून बादशहास मुजरा करून त्याणें आपले ताब्यांत असलेल्या तोफा आणि दारूगोळा वगैरे आपणास द्यावा ह्मणजे आपण त्याचे गादीचें महत्व वाढविण्यास तयार आहों, असें सांगून बादशाहापासून सर्व कांहीं पाहिजे होतें तें घेऊन बादशाहानें आपले मुलास राजा करावा ह्मणून सांगितलें तें मान्य करून बंडवाले इंग्रज सरकारचे दारूखान्यावर (म्यागजिनीवर) हल्ला करण्याकडे वळले. तेथेंही शेंकडो इंग्रज लोकांची कत्तल झाली, बातमीची तार तोडली आणि गाडीचे रूळ काढून टाकले. सारांश जे कोणी लपून राहिले तेवढे मात्र युरोपियन कांहीं वेळ बचले आहेत. बाकी सर्व नाहींसे होऊन गेले, व मीर नबाब यांस शहरचे बंदोबस्तासाठीं नवीन केलेले बादशहानें कोतवाल नेमिलें आहे. जिकडे तिकडे धामधूम आणि गडबड इतकी होऊन राहिली आहे कीं, कोणासही आपले मालमत्तेचा किंवा जिवाचा बिलकूल भरंवसा वाटत नाहींसा झाला आहे. वृद्ध बादशाहा गांवाबाहेर छावणी करून राहिला आहे, जहागीरदार वगैरे यांस इंग्लिश सरकारचें भय वाटत असले कारणानें ते अद्यापि बंडांत सामील झाले नाहींत; परंतु बंडाचा फैलावा अधिक होईल तर ते तसेच भीति धरून राहतील असें वाटत नाहीं. वरचेवर लपलेले आणि छपलेले ठिकाणचे युरोपियन लोकांस हुडकून काढून मारून टाकण्याचा बंडवाल्यांचा सपाटा सारखा चालूच आहे. बादशाहा स्वतः घोड्यावर स्वार होऊन लोकांची स्वस्थता राखण्यासाठीं रस्त्या-

तून फिरत आहे, व दुकानदारांनीं आपलीं दुकानें खुशाल उघडावीं ह्मणून त्यांस धीर देत आहे; परंतु जिकडे तिकडे गडबड चालली आहे हें पाहून कोणी-ही तसें करण्यास धजत नाहीं इतकेंच नाहीं, पण शेंकडो लोक दुकानें आणि मालमत्ता टाकून जिवाचे बचावासाठीं निघून गेले आहेत. फार काय सांगावें. नादिरशाहीसारखी कारकीर्द सुरू झाल्यानें ५० वर्षांची व्यवस्था, बंदोबस्त, आणि सुधारणा एका प्रह-रांत अगदीं नाहींशी होऊन गेली आहे. तरी एकंदर लोक इंग्रज सरकाराविरुद्ध आहेत असें नाहीं; परंतु ईश्वरेच्छेपुढें इलाज नाहीं ह्मणून देवावर भरंवसा ठेवून दिवस काढीत आहेत.

याचप्रमाणें त्यावेळीं आणखीही चोहोंकडून बंडाच्या हकीकतीच्या खबरा आल्या कारणानें नानासाहेबांचें मन आनंदानें अगदीं गडबडून गेलें. त्यांस वाटलें कीं, पेशव्यांची गादी स्थापन करण्यास आतां ही संधि फारच उत्तम आहे, ह्मणून कानपूरचे छावणींतील शिपायांमध्यें बंड करण्याची मसलत केली पाहिजे, आणि ज्यांत फितु-राचे विचार चालले आहेत त्या लोकांस चांगला आश्रय देऊन लौकर आपलेंसें करून घेतलें पाहिजे आणि आपण सांगूं तेव्हां अलहाबादच्या आणि कानपूरच्या छावणींतही गोरेलोकांची कत्तल उडवून टाकण्याची मसलत लौकरच घडून आली पाहिजे, अशा विचारांत नानासाहेब पडले आहेत तों त्यांचे बंधु बाळासाहेब कांहीं घरगुती कामासाठीं आले. त्यांस पाहून ही

सर्व हकीकत सांगणार तों बाळासाहेबांनींच बोलण्यास आरंभ केला.

**बाळासाहेब.**–कानपूरचे छावणींत कांहीं गडबड आहे ह्मणून लोकांनीं बातमी आणली आहे. आपली स्वारी तेथें गेली होती तेव्हां कांहीं विशेष वर्तमान समजलें कां ?

**नानासाहेब.**–वर्तमान तर फारच हितावह आहे; पण आतां उपायांची योजना कशी करावी हें सुचत नाहीं. दिल्लीस टोपीवाल्यांना अगदीं खणून काढलें, बादशाही अंमल सुरू झाला, दहावीस पलटणींचे लोक बंड करून छावणींतील साहेब लोकांस मारून निघून गेल्याचें वर्तमान ऐकिलें, तें खोटें नाहीं. ( हातांतील पत्र दाखवून ) हें पहा प्रत्यक्ष पत्र••••• पाजकडून तेथील इत्थंभूत हकीकतीचें आलें आहे. आतां कानपूर व अलाहाबाद येथील लोकांविषयीं अगदीं भीति बाळगणें नको. कारण या महिन्याचे आरंभीं आलेले बातमीवरून इतकें खचित समजलें आहे कीं, कलकत्त्यापासून आग्रापर्यंत ४००।५०० कोस रुंदीचे टप्यांत गोऱ्या पलटणी काय त्या तीन आहेत, आणि काळ्या पलटणी पाहिल्या तर दुसरी गरेडल पलटण व त्रेचाळिसावी आणि सतरावी नेटिव इनफंट्री, शिवाय कलकत्त्यांतील मले शिपायांचे १००० लोक, आणि ३४ वे पलटणचे कांहीं लोक मिळून कलकत्याचे आसपासच ४००० आहेत. शिवाय बऱ्हाणपूर येथें आपले सुभेदार जयसिंगजीची ६३

पुणे मराठी ग्रंथालय
१३७ ब नारायण
ग्रं. नं. ९७६२



वी पलटण, दिनापुरास सातवी, आठवी, आणि ४० सावी, अशा तीन, त्याखेरीज एक सगळा रिसाला, व काशींत सदतिसावी, आणि लुधिआना प्रांतांत शीक पलटण तीही काळे लोकांचीच. इकडे अलहाबादेस एक सहावी, आणि गाजीपुरास ५५ वी, व आपले कानपूरचे छावणींतल्या तीन. दुसरे नंबराचा स्वारांचा रिसाला. पहिली आणि ५३ वी काळी पलटण मिळून एकंदर पाहिलें तर सहज १४।१५००० लोकांस तर खोट नाहीं; व इतक्याशीं तोंड देण्यास गोरे लोकांची संख्या २००० फार फार झालें तर २५०० पेक्षां जास्ती निघण्याचें नांव नको. तेव्हां आतां आपला बेत सिद्धीस जाण्यास हरकत ती कोणती आहे? या सर्व लोकांचें दील गोरे लोकांविषयीं अगदीं बदलून गेले आहेत याविषयीं अझून संशय धरण्याची कल्पना मनांत आणणें योग्य आहे कां?

**बाळासाहेब.**—पण उतावळीनें काम करण्यापेक्षां बन्यासाहेबांची मसलत मला बरी दिसते. कां कीं इतकेही लोक इंग्रजांविरुद्ध उठले तरी मुंबई, मद्रास, चीन, जपान, वगैरेकडून त्यांस कुमक येण्यास फार दिवस लागतील असें नाहीं. आणि मग उगीच कुत्र्याचे मोवतीनें मरावें त्यापेक्षां पहिल्यानेंच चांगला विचार पाहून अशा राज्यकारस्थानाचे कामांत शिरावें हें मला बरें वाटतें. बरें पण ती गोष्ट अमळ एकीकडे असूंद्या. आपण बन्यासाहेबांवर आ-

लीकडे पूर्वीप्रमाणें प्रीति दाखवीत नाहीं, तर इतका राग करण्याचें कारण काय तें मला समजलें नाहीं. ते आपले पदरचे उत्तम खानदानींतले व विश्वासु आणि आपले मनाप्रमाणें चालण्याविषयीं सदोदित तत्पर, असे असतां त्यांच्याशीं आलीकडे मन मोकळें करून अगदीं बोलत नाहीं, व जें करणें तें त्यांचे विचारावांचून चाललें आहे हें काय ? त्यांजकडून कांहीं चूक झाली आहे कीं काय ? हें अगोदर समजलें पाहिजे, व तसें असेल तर ते आतां क्षमा मागण्यास तयार आहेत.

**नानासाहेब**–( या गोष्टीनें हुरुपाचा विसर झाल्यानें अंमळ उदासीनसे होऊन ) मी तरी बन्यासाहेबांवर कमी ममता करीत होतों कीं काय, तुह्मीच सांगा बरें ? तुमच्यावर लोभ कमी आणि त्यांच्यावर जास्ती आहे, असें लोक ह्मणतात, तें तुह्मीच मला सांगितलेंना ? परंतु आलीकडे त्यांची वृत्ति बदलल्यासारखी दिसते. हल्लीं मी मनांत आणलेल्या कामांत ते पाय मागें घेऊं पाहतात. ज्या हुरुपानें दिल्लीस गेले तो त्यांचे वर्तनावरून आतां अगदीं दिसत नाहीं. बोलण्याची गोष्ट नाहीं; पण त्यांनीं आपल्या धाकट्या बायकोची आपले वाड्यांत येण्याची बंदी केल्याचें ऐकतों. यावरून त्यांचे मनाचा ओघ कसा असावा हें तुह्मीच पाहा बरें, असो, त्याविषयीं विचार करण्यास आतां फुरसद नाहीं, पण. . .

**बाळासाहेब**–तो गृहस्थ आपणाशीं कपट कर-

त्याजोगा मला तर वाटत नाहीं. आतां त्याणें आपले बायकोस इकडे येण्याजाण्याची बंदी केल्याचें मला ठाऊक नाहीं, सबब मी त्या विषयीं कांहीं सांगू शकत नाहीं; पण या मुलखांत त्याला आपण व आपल्याला तो, अशा भावानें आजपर्यंत त्यास लहानपणापासून भेद न ठेवितां वागवून घेतलें आहे. तर अशा गडबडीचे आणि अणीबाणीचे प्रसंगीं त्यास सोडून चालणें मला बरें वाटत नाहीं.

**नानासाहेब**—( जवळ कोणी नाहीं असें पाहून ) ते आपले विरुद्ध कांहीं तरी मसलतींत आहेत असा अंदेशा मला चांगल्या दाखल्यावरून आला आहे ह्मणून मी त्यांशीं अशा रीतीनें वागतों.

**बाळासाहेब.**—( आश्चर्याची मुद्रा करून ) छीःछीः अशी गोष्ट कधींही त्यांजकडून होणार नाहीं हें मी खचित सांगतों. आतां आपले सारखा त्याचा स्वभाव उतावळा नाहीं ह्मणून कदाचित तो आपले मसलतीस नाकारीत असेल, ही गोष्ट खरी आहे; परंतु त्याचे वडिलांचे अंतकालसमयीं आपण वचन दिलें आहे कीं, त्यास अंतर देणार नाहीं. तर आतां त्यास सोडून देणें योग्य नाहीं, आपणास मी आणि तो सारखा आहे तर त्यास पूर्वीप्रमाणें येण्याजाण्याची आणि त्यास समजत असलेल्या गोष्टी कळविण्याची मोकळीक असावी. मग आपले हेतु सिद्धीस नेण्याच्या मसलतींत त्यास घेणें नसेल तर घेऊं नये.

**नानासाहेब**—( तो विचार बरा वाटून ) बरें तर

तसें कां होईना. आज संध्याकाळीं तुह्मी आपणाबरोबर त्यास घेऊन या म्हणजे मागील वांकडें काढून टाकूं.

**बाळासाहेब.**–बरें आहे. ही गोष्ट त्यास सांगतों. ( असें ह्मणून निघून जातात. )

बाळासाहेब निघून जातांच नानासाहेबांसही हंबीररावांशीं आपण योग्य रीतीनें वर्तन केलें नाहीं, असें वाटून व आपण त्यांचे घरीं गेल्यानें त्यांस अधिक समाधान वाटेल अशा समजुतीनें त्यांचे भेटीसाठीं नानासाहेब आले होते, त्याप्रमाणें सुभानरावानें कळवितांच हंबीरराव सामोरे येऊन त्यांस आंत आपले घरांतील बसण्याचे दिवाणखान्यांत घेऊन, गेले तेव्हां तेथें दोघांचेही मनांतील खुलासे होऊन नानासाहेबांनीं ज्या कोणाचें बोलणें ऐकल्यावरून त्यांस हा सर्व संशय उत्पन्न झाला त्याचा शोध लावण्याविषयीं हंबीररावही मोठ्या तत्परतेनें सिद्ध झाले; परंतु आपले घरांतील बखेड्याचीं कारणें त्या संधीस हंबीररावांचे मनांत घोळत होतींच. यास्तव त्या कामीं त्यांचे हातून त्याच दिवशीं झालेल्या वर्तनाचें थोडेंसें कथन करणें जरूर आहे. तो प्रकार पुढील भागांत दाखविण्यांत येईल.

---

## भाग १३.

**हंबीरराव**–( पुतळाबाईस ) तें कांहीं नाहीं. एकदां सांगितलें तसें केलें पाहिजे. माहेरीं जाणें नसेल तर

मजपासून निघून जावें, आणि पाहिजे त्या ठिकाणीं राहून मनास येईल तसें करावें. "एकां लज्जां परित्यज्य सर्वत्र विजयी भवेत्" अशी ह्मण आहे ती खोटी नाहीं.

पुतळाबाई.—( डोळ्यांत पाणी भरून येऊन त्याकडे पाहून ) मजकडून असा अपराध तरी कोणता झाला, हें सांगावयाचें कीं नाहीं? आज्ञा झाली तेव्हांपासून ( पेशव्याचे ) वाड्यांत पाऊल टेविलें नाहीं. आईस पाठविलेलीं पत्रें सांगितल्याप्रमाणें दाखवून पाठविलीं, भाऊ भेटीकरितां आला त्याची भेट आपले समक्ष घेतली पाहिजे ह्मटलें तर तसेंही न करण्याविषयीं कांहीं बोललें नाहीं. गांवांतले गावांत बहीण असून तिला मजकडे येण्याची बंदी केली, तरी आपण असें कां करितां ह्मणून चकारशब्द तरी काढला कां? सुभानराव मामाजींनीं माझे तैनातींतील माणसें बदलून आपले बगीचीं ठेविलीं, तरी मी ह्मणून कांहीं गाऱ्हाणें सांगितलें का? आपणच होऊन गिरजाऊला कां काढलें ह्मणून विचारलें, तेव्हां मीं काढलें नाहीं ह्मणून ओघानें सांगणें प्राप्त झालें; तर त्याबद्दल का मला एवढी मोठी शिक्षा व्हावी? प्रत्यक्ष भाऊ मेला तेव्हां आईस भेटण्यास जाऊं दिलें नाहीं, आणि आतां बोलावण्यावांचून मी अशी माहेरच्यांचे दारांत जाऊन उभी राहिलें तर तीं मला काय ह्मणतील याचा कांहीं तरी विचार करावा ! ! मजकडून गैरवाजवी वर्तन झालें असेल तर या जिवाचे आपण मालक आहां. पाहिजे तें करून

टाकण्याची सत्ता आहे. मलाही हे पाय सोडून अन्य ठिकाणीं जाणें योग्य होत नाहीं. तर मी होऊन दुसरीकडे जाऊन धर्मशास्त्रमर्यादेचें उल्लंघन कसें करूं ? लोक मला काय ह्मणतील ? देवाचा कोप मजवर मग कां होणार नाहीं ? हल्लीं आपला राग मजवर झाला आहे तर तोच माझ्यानें सहन होत नाहीं, तर मग देव आणि आपण या दोघांचीही गैरमर्जी होईल, असें माझ्यानें कसें करवेल ?

हंबीरराव.—अहाहा! केवढें देवाचें भय ? आणि काय माझे रागाची परवा!!! कोणी ह्मणेल कीं, जशी कांहीं अनीति हिच्या स्वभावास ठाऊकच नाहीं. चट्टीपट्टीचा बोभाटा आणि झिपरी मारी • • • • त्यांचें ( सुंदराबाई-साहेबांचें ) पुरुषांपाशीं हंसणें, खेळणें देखील बरें; परंतु हा मानभावीपणाचा आव आतां मला समजून आला: "स्त्रियांचें चरित्र कोणाला समजावयाचें नाहीं." ह्मणून लोकांत समज आहे, तीच प्रत्यक्ष आतां माझे अनुभवास आली. ( अमळ शांत होऊन ) एकदां मीं सांगतलें आहे कीं, कोळसा उगाळला तितका काळा. काय झालें आणि काय नाहीं हें ज्याचे त्याचे मनाला ठाऊक. पुराव्यानें अशा गोष्टी सिद्ध करून देतां येतात असें नाहीं. तितक्यांतून शहाणे मनुष्यानें आपले बुद्धिकौशल्यानें केलेलें काम उघाडीस येणें फारच मुष्कील आहे. तेव्हां त्याविषयीं तुह्मी भरंवसा मानून प्रतिपादन करतां तें मी समजलों. परंतु खात्रीलायक मुद्दा दृष्टीस पडल्यावांचून मी दोष ठे-

दिला आहे असें नाहीं. आतां इतकेंच कीं, आपल्या हातानें आपली मांडी उघडी करून दाखविणें चांगलें नाहीं. तुमचेविषयीं चाकरमाणसांत तपास आणि कानोसा घेऊन ऐकण्याचे प्रकार केले तर ह्मणजे केलेली गोष्ट पदरीं घालणें होणार नाहीं असें नाहीं; परंतु त्यांत तरी अब्रू माझीच जाणारना! मग तसें करण्यांत काय अर्थ आहे? मजकडे पत्र आलें ह्मणून मी माहेरीं पाठवितों, असें लोकांस सांगून उद्यां सकाळींच निघून आपलें चालतें व्हावें, यासारखें दोघांसही सुख नाहीं.

**पुतळाबाई.**–( स्फुंदत स्फुंदत ) आ–आ–आपण पाही–ही–ही–जे–जे तें तें ह्म ह्मणा; पण मज क कडून वाईट गो गोष्ट झा झा झाली असेल तर दे दे देवच साक्ष. ( संतापाचा आवेश आणून ) तो मला आतांच येथें भस्म करून टाकील. नाहीं तर ज्या रांडामेल्यांनीं मजवर विनाकारण ही आग पाखडून खोटें खोटें आपले मनांत भरविलें आहे त्यांचा तरी देव सत्यनास करो आन....

**हंबीरराव.**–( रागांतच ) हं येथें उगीच लोकांला शिव्या शाप देण्याचें कारण नाहीं. माझे ह्मणण्याप्रमाणें उद्यां माहेरीं जाणें नसेल तर मग आपला विचार पहा. मग कोणते थरास गोष्ट जाईल तें आतां माझ्यानें सांगवत नाहीं. अगोदरच नाना साहेबांचे वैमनस्यामुळें माझें मन उद्विग्न झालें आहे, तशांतून तुह्मी मला त्रास देऊं ह्मणाल तर ( मोठे

आवेशानें ) तुह्मांस तर आतां मी अधिक बोलत नाहीं पण ( कमरेची कट्यार उपसून ) पाहा, हिला मी आपले पोटांत जागा देतों, ह्मणजे अर्थातच तुमचे डोळे निवतील कीं नाहीं.

**पुतळाबाई.**–( बोलण्याप्रमाणें होईल अशा भयानें कंपायमान होऊन मोठ्यानें हंबरडा फोडून ) अग आई, आतां मीं काय करूं. नका हो तसें करूं नका. तुह्मी सांगाल तसें मी ऐकतें. अहो, मी माहेरीं जातें. देवा शपत तुमचे गळ्या शपत मी तुमचें ऐकेन ! पाहिजे तर माझे पोटांत कट्यार घाला, पण असें करूं नका. ( असें ह्मणून त्याचे हातची कट्यार घेण्यास पुढें होते. )

**हंबीरराव.**–( तिचे दीनवाणी व मायायुक्त शब्द ऐकून अंमळ शांत होऊन ) बरें तर व्हा चालत्या कशा, उद्यां सकाळीं गेलें पाहिजे. पुन्हां मला हें निलाजरें तोंड दाखविलें तर खबरदार. असली चांडाळीण बायको जवळ बाळगणें यासारखें लाजिरवाणें काम मला कोणतेंही वाटत नाहीं समजलां !

**पुतळाबाई.**–( आतां आपण जास्ती बोललों तर काय ह्मणतील आणि काय नाहीं अशा भीतीनें मोठा सुस्कारा टाकून ) मी तर आज्ञा होईल तसें करीत आहें, पण इतकेंच शेवटचें मागणें आहे कीं, आपले नांवलौकिकाप्रमाणें माणसें बरोबर देऊन माझी रवानगी उज्जनीस करून द्यावी, आणि बरोबर दोन जिनसा घेण्याची परवानगी असावी.

**हंबीरराव.**–( जाण्यास तयार झाली आहे तर दोन जिनसा देण्याचें नाहीं ह्मणणें तिची पूर्ववर्तणुक स्मरून अनुचित मानून ) बरें आहे, पण त्या जिनसा तरी कोणत्या त्या समजल्या पाहिजेत. आंगावर आहे त्याशिवाय अधिक डागडागिना साफ कांहीं एक मिळणार नाहीं. दुसरें काय असेल तें कळूं द्या ह्मणजे नेणें किंवा नाहीं तें सांगतों.

**पुतळाबाई.**–( हंबीररावाचे बोलण्यांत शांतता पाहून किंचित् मनांत स्वस्थता पावून ) मलाही आतां डागिन्याचे भूषणाची गोडी राहिली नाहीं, तेंव्हां त्यांचें मागणें मी बिलकूल करीत नाहीं. पहिलें मागणें असें आहे कीं, आपली व माझी एके ठिकाणीं बसून साहेबांकडून फोटोग्राफाची तसबीर काढून ती कांच आंगठीचे खड्याचे ठिकाणीं बसवून आपण ती आंगठी गेल्या दसऱ्याचे दिवशीं मला दिली आहे, ती नेण्याची परवानगी व्हावी हें एक मागणें आहे.

**हंबीरराव.**–( त्यांत कांहीं अर्थ नाहीं अशा समजुतीनें ) बरें आहे, चिंता नाहीं. ती आंगठी घेऊन जावी, दुसरें काय मागणें आहे तें लौकर कळूं द्या.

**पुतळाबाई.**–दुसरें मागणें असें आहे कीं, माझ्या निरपराधीपणाविषयीं आपली खात्री माझे सुदैवानें कधींना कधीं तरी झाली, आणि माझी पुन्हा भेट झाली तर दुसरे जिनस मागण्याची परवानगी असावी. ते मी आज मागूं इच्छीत नाहीं.

**हंबीरराव,**–( असें होण्याची बिलकुल शक्यता

नाहीं. समजून ) तसें होईल तर तुमचें मागणें एक, आणि शिवाय मी होऊन, तुह्मी मागाल त्या शिवाय एक, अशा दोन गोष्टी देईन. मग तर झालें-ना ? आतां उद्यां निघून जाण्यास कांहीं हरकत आहे कां ?

**पुतळाबाई.**—आतां कांहीं ह्मणणें नाहीं. ( असें ह्मणून त्याचे पायांवर डोकें ठेवून, पाण्यानें भरलेले डोळयांनीं त्याचे मुखाकडे पाहून, कंठ दाटून आल्या कारणानें बोलवत नाहीं सबब मुकाट्यानें चालती होते. ) ती गेल्यावर हंबीरराव तिचे वाईट चालीविषयीं सुभानरावांनीं वगैरे आपले मनांत भरविलेल्या गोष्टी खऱ्याच आहेत किंवा त्यांत कांहीं कापट्य झालें आहे, याचे विचारांत असतां नानासाहेब त्यांजकडे येऊन दोघांची भेट झाली, तो प्रकार मागील भागांत सांगितलाच आहे.

---

## भाग १४.

**सुभानराव.**—( पुतळाबाईस आपल्या बुद्धिकौशल्यानें घालवून दिल्याचा मनांत पूर्ण हर्ष झाला आहे तरी विषादयुक्त वाणीनें ) बन्याबापू, तुमांला काय सांगू, त्ये पोरटीचे जान्यानं या घरांमंदीं चाकर मानसांसनी दिखित आनंद झालाया बगा. अशी वंगळ पोर आपलं बाचं आन आईचं नांव पान्यामंदी घालनारी करून घेऊं नये म्हून मी पहिल्यापून लइदां सांगितलं, पन होनार तशी गोष्ट झालिया. इथून घालवून

दिली हें फार चांगलें झालं. आतां रोजचाही रिद-रोग व्हाइला न्हाई.

**हंबीरराव.**–( पुतळाबाईस लोकांच्या सांगणीवरून आपण घालविलें या कारणानें पश्चातापयुक्त दुःखित मनानें ) मामा तुह्मी कांहीं ह्मणा, इतके दिवस कांहीं तिची वर्तणूक गैरवाजवी ह्मणून कोणास दिसली नाहीं. अझून तरी तिनें वाईट काम केलें असेल असं माझ्यानें ह्मणवत नाहीं.

**सुभानराव.**–( अद्याप त्यांचे मनांतील संशय गेला नाहीं पाहून चपापल्यासारखा होऊन ) तिन शेवटपोत संमद लई गुपत रीतीन केलया, हें तर खरंच. पन तुमांला जसं वाटतया तसंच मलायबी वाटत व्हतं. पन जवा का बातमी ठिवूनशानी मी बाळासाब पेशव्यांचे भेटीसाटीं ह्मनून गेलों तवा बगा त्ये मागल गच्चीवर व्हत असं समजलं, तवा सडक जाऊं लागलों इकरत्यांत ती जिना उतरून गेली. तिच जातांना पाय दिखित वाजल ते मी ऐकल, पन तिथून परतनं चांगलं व्हब म्हून बाळासाबांकड गेलों तों ते धोतर सांवरीत उभ व्हत व तुमी संक्रां-तीला पुतळास अमदाबाजी भरजरीची बाळपटीची चोळी शिवली न्हाइ का, ती जवळच कोचावर अशी कांहीं नुकतीच काढून टाकल्यावानी पडलेली म्यां पाहिली ती तव्हांच म्यां वळखली, मग तर आपले मनाची खात्रीच झाली बुवा असो पन.

**हंबीरराव.**–बाळासाहेबांचे निजण्याचे खोलींत

ती चोळी तुमचे सांगण्यावरून शोध करितां सांपडली ही गोष्ट खरी आहे, व त्याप्रमाणें तुमचे दृष्टीस पड-ल्याचें तुह्मीं सांगतां ही गोष्ट मी खोटी ह्मणतों असें नाहीं; परंतु नानासाहेब व बाळासाहेब यांचा माझा स्नेह तसा नाहीं. आह्मी तिघे एकमे-कांच्या प्राणासाठीं प्राण देणारे, तर त्यांजकडून ही गोष्ट कशी होईल. याविषयीं माझे मनाची खात्री होत नाहीं.

**सुभानराव.**–( किंचित हास्यमुद्रा करून ) पुरु-साचं मन त्ये कुट पावेतों राहतं ? एकांतांत अस्तरी-ची गाठ पडली न्हाई आन तिन नेतरकटाक्षान पाहिलं न्हाई त्यो पावेतोंच सारं. ( अमळ संकोचित स्वरानें ) दिल्लीची गमत तुह्मी होऊन सांगिलेली माझे कानावर आली हाय्ये. तर मग तस परसंगीं एखादी गोष्ट घडून येईल तवा त्यें पुरुसाकड तरी दोस ठिवने कसं योग होईल ?

**हंबीरराव.**–( अमळ लाजल्यासारखा होऊन ) स्त्रि-यांनीं होऊन प्रसंग आणला तरी पुरुषास कांहीं देह-भान रहात नाहीं असें नाहीं. असो, पण तसें असल तर बाळासाहेबांचाही दोष ह्मणतां येत नाहीं. ( उदास वाणीनें ) कसेंही असलें तरी आपलें प्रारब्ध ह्मटलें पाहिजे, दुसरें काय ? ( मोठा सुस्कारा टाकून ) शिव शिव ! !

**सुभानराव.**–( त्याचे मनाचा निग्रह फिरलासा पाहून ) बन्याबापू, तिचा एक एक हुन्नर मी तुमासनी

सांगितला तर तुम्हीबी थक्क होऊन जाल. तुम्ही मां· गिलदी दिल्लीला गेलां व्हतां, तवा वहिनीबाईकड म्हून इथून सकाळीं दहा अकरा वाजतां गेली ती सं- ध्याकाळीं बगा पाच सहा वाजून गेल्या तरी परत ठिकाणा न्हाई. म्यान्याचे भोईराज न्याहरी केल्यावां- चून गेल व्हत तेवी बसबसून अगदीं कंटाळून गेल, मग बगा दिवा लागल्यावर दोन घटकेन परत आ- ली, म्हून मी इचारलं मात्र; तो तिन तुमचे मा· तोशिरी देखत जो तान झाडलया त्यो तुमांला काय सांगू ? पन म्यां बारिक रितीनें सोद घेतला तों वाहिनीबाईकड जान्याचं निमित मातर. नानासाब त्या दिवशीं शिकारीस गेल व्हत. आपन तर दि- ल्हीसच गेलां व्हतां तवा बाळासाब एकटच व्हत. मग मनास यइल तशा मौजा केल्या, असें लोक सांग· त्यात. खरं खोटं देवाला ठावं.

**सुंदराबाईसाहेब.**–( त्या दोघांचे बोलण्याचा ओ- घ पाहून ही सवतमत्सर साधण्याची संधि बरी आहे. असें समजून दाराआड उभी राहून कांहींशी सलगी व कांहीं मर्यादेचा भाव दाखवून तेथूनच ) आवडत्या आणि शहाण्या बायकोनें कांहीं केलें तरी इतके दिवस तिकडे लक्ष जात असेल तर ना ? उलटें मलाच राग भरणें होत होतें. आतां आपल्याच अनुभवास आलें ह्मणून ठीक आहे. ( बायजाबाई आलीसें पाहून स्तब्ध रहाते. )

**बायजाबाई.**–( हंबीररावाची उदास मुद्रा पाहून )

कां आज करमत नाहीं वाटतें. ( सुभानरावास पाहून ) लग्नापासून सुभानभाऊची तिजविषयीं कुरकूर होती, त्याचा शेवट झाला ! ! ! तिचें दैवच वाईट तेथें कोणाला काय बोल लावावा ?

**सुंदराबाईसाहेब.**–( थोडा रागाचा भाव दाखवून ) हो, मामंजींनीं असा भ्रष्टाकार पाहूनही कांहीं बोलूं नये म्हणजे चांगलं झालं असतं. आपला .... आपल्याला कां घाणूं नये. ? "शिंदळ धरावी खाटीं आणि चोर धरावा हाटीं" म्हणून म्हण आहे तसें केलें, तरी दुसऱ्यावर टपका आहेच ! त्यांणीं ( सुभानरावांनीं ) सांगितलें नसतें आणि बंदोबस्त केला नसता तर अमक्याचे हो घरीं अशी अशी बलबलपुरी आहे. प्रतिष्ठितपणाचा आणि शहाणपणाचा डौल मात्र दाखवितात, पण आंतून हें असें असें, असा सगळ्या गावांत बभ्रा झाला असतां, व ज्याजकडे कांहीं दोष नाहीं त्याची एका बरोबर अब्रु गेली असती, म्हणजे चांगलें झालें असतें वाटतें ?

**बायजाबाई.**–बन्यावापु, मलाही तिजविषयीं यापूर्वीं कांहींसा संशय वाटत होता. तें मी इतके दिवस बोललें नाहीं, पण तुम्हीं काय पाहिजे तें म्हणा. तिजकडून हल्लीं समजली आहे अशी गोष्ट झाली असेल असें मी कधीं खरें मानणार नाहीं. समयीं तिची चोळी तिजपासून हरवली असेल आणि कोणीं दुष्टावा साधण्यासाठीं अमुक ठिकाणीं निघाली म्हणून बोभाटा केला असेल तर मग कशावरून समजेल. ( उदास-

वार्णीनें ) काय असेल तें देव जाणे ! आतां ती तर मेले-लीच आहे, पण ईश्वराला करणें असेल तर खरी गोष्ट उघाडीस आल्यावांचून राहील असें नाहीं.

**सुभानराव.**–( रागाचा आवेश दाखवून ) अशी दुसमानगिरी करून माझे ल्येकीचं थोडंच मला लगीन करून दयायचं हाय्ये, मग तरी बुवा तिचा दावा केला ह्मटलं तर असो. आपण राहतों त्ये घरांत येडं वाकडं कांहीं दिसून आलं तर बोलूं नये कीं काय ? येशींत मारलं आनू गांवामंदीं सांगूं नका ह्मटलं तर कसं चालल ? आन तशामंदीं बन्याबापू, तिला लावून देन्याचं मी तुमाला सांगितलं का ? खरच सांगा, ज्याचं पाप त्येलाच भोवतं. मी कशाला कोनाचा अभिशिराप घियाला जाऊं ! ( बायजाबाईकडे पाहिल्यासारखें करून ) बन्याबापू कांहीं लहान पोर सोर न्हवता. आपन व्हऊन त्यांनीं अन्नुसाटी तिला घालविलया, म्हुन बर हाय्ये. आमासारख्यांनीं पुष्कळ सांगितलं म्हून त्यांना दोस दिसला नसता तर त्यांनीं असं कलं असतं असं न्हाई. आन याच दाखले अदुगरबी मायंदळ आल हाइता. कांइ तरी करूनशेनीं आपलं बोलनं खरं करायाच इतकाच बायजाआकाचा हेतु दिसतुया. दुसरं काय ‥

**सुंदराबाई**–पण जरी त्या ‥‥‥‥‥‥

**बन्याबापू.**–चुप बोलूं नको. आतां झाल्या गोष्टीचा वाद करावा यांत कांहीं अर्थ नाहीं. ( बायजाबाईकडे पाहिलेंसें करून ) हा दोष दुसरे कोणाकडे देतां

येत नाहीं. मी दुसरें लग्न केलें ही माझीच चूक ह्मटली पाहिजे. वरकड बायकांचे भांडणांत खोटे-पणा नसतो असें मीही ह्मणत नाहीं; परंतु सर्वच खोटेपणा असें ह्मणणें मला पसंत वाटलें नाहीं. ह्म-णून एकापायीं सगळ्यांना दुःख नको असें समजून ही गोष्ट करणें प्राप्त झालें. तिचा आतां पुनः वि-चार करण्याचें मला आवडत नाहीं. यासाठीं त्या-बद्दल आतां कोणी कांहीं बोलूं नये. ( इतक्यांत बा-हेर कोणी आलें असें पाहून बाहेर जातो. )

हंबीरराव उठून जातांच बायजाबाईही गेली. ( मग सुंदराबाई साहेब आणि सुभानराव एकमेकाकडे नेत्रसं-केतानें ) संशय राहिला आहे, हें चांगलें नाहीं. हा संशय युक्तिचे मार्गानें काढून टाकला पाहिजे. अशा विचारानें एकमेकास सुचवून तींही निरनिराळे वाटेनें गेलीं.

---

## भाग १५.

बराकपूर, मीरत वगैरे ठिकाणच्या पलटणचे शिपा-ई लोकांनीं धामधूम करून दिल्लीकडे रोख धरून सग-ळे बंडवाले तेथें जमल्याचें वर्णन मागें केलेंच आहे. तिकडे तशी झालेली स्थिती कलकत्त्यास समजली, ते-व्हां इंग्रज सरकारचे कामगार अगदीं गलबलून गेले; कारण भडाभड पलटणीमागून पलटण बंडावा करून निघून जाण्यास लागली तेव्हां आतां आपलें राज्यांतील प्रदेशांत बंदोबस्त राखून बंड मोडण्या-

जोगी फौज कोठून आवावी, हें कांहीं कोणास सुचेना. अशा प्रसंगीं धीरानें व नेटानें बंदोबस्त करणारही कोणी दिसून येईना. कर्नेल ओनील ह्मणून फुजिलियर लोकांचा मुख्य सरदार मद्रासेहून कांहीं लोक घेऊन काशीस मदतीस जाण्यासाठीं कलकत्त्याचे आगगाडीचे स्टेशनाजवळ आला, तों बोटींतून लोक उतरणें असून काशीकडे जाण्याची आगगाडीची ट्रेन निघण्याची सर्व तयारी झाली होती, इतक्यांत ओनील साहेब स्टेशनावर दृष्टी पडतांच रेलवेकडील कोणी कामगारानें येऊन त्यास सांगितलें कीं, तुह्मी आपले पलटणीचे लोक दोन तीन मिनिटांत आगगाडीवर चढविण्याची तजवीज केली नाहीं तर तुमचे लोकांवांचून आगगाडी चालती होईल. हें ऐकतांच ओनील साहेबास जो राग आला, आणि त्याणें एकदम त्या निरोप सांगणारास आपले शिपायांकडून कैद करविलें. त्याणें आपणास सोडावें ह्मणून पुष्कळ आरडाओरड केली व शेंकडो लोक त्याचा गलबा ऐकून भोंवताले जमले; परंतु त्याला कोणी सोडविलें नाहीं. इकडे ओनील साहेबानें आगगाडीचें यंत्र काढून तें आपले स्वाधीन घेतलें, आणि आपले पलटणचे सर्व लोक गाडींत चढल्यानंतर आपले सोईप्रमाणें आगगाडी चालू दिली. हें धैर्याचें आणि समयसूचकपणाचें काम ओनील साहेबानें केलें त्याबद्दल पुष्कळ लोकांनीं त्याची स्तुति केली, व सेनापति असावा तर असाच असावा. याचेच हातून पुष्कळ चांगलीं कामें होतील, असें त्यावेळीं

कितीएकांस वाटलें! असो, तो करनल ओनील साहेब तारीख ४ जून रोजीं काशीस आपले लोक घेऊन येऊन पोंचला नाहीं तों त्याच दिवशीं काशीस बंड झालें. त्या प्रसंगीं काशींत ३७ वी काळी नेटिव पलटण (१००० ), लुधियाना येथील शीक पलटण (१०००) व स्वारांचे रिसाल्याची १३ वी पलटण ( १००० ) अशा असून त्यांस सामना करण्यासाटीं म्हटलें म्हणजे काय ते गोरे तोफखान्याचे १५० लोक, तीन तोफा, आणि करनल ओनील साहेबाबरोबर आलेले मद्रास फुजिलियरचे १५० लोक मिळून ३०० लोक मात्र होते.

त्या दिवशीं ३७ वे पलटणीचा बंड करण्याचा बेत आहे अशा संशयावरून त्या लोकांचीं हत्यारें घेण्याची परेड करण्याचा हुकूम झाला होता. तेव्हां कांहीं लोक हुकुमाप्रमाणें बिनहत्यारी कवायतीचे जागीं जमले. त्या समयीं इतक्यांतच कांहीं गडबड होईल असें बिलकुल दिसलें नाहीं; परंतु कांहीं लोक आपलीं हत्यारें रचून ठेवूं लागले तेव्हां त्यांच्यांतून थोडे लोकांनीं आपले पलटणचे साहेब लोकांवर गोळ्या टाकल्या, तें पाहून सगळेच लोकांनीं त्यांचा कित्ता घेऊन भडिमार चालविला. तेव्हां अर्थातच जिकडे तिकडे हाणामारी चालू झाली. शीक लोक कधींही बदलणार नाहींत अशी सर्वांची खात्री होती; परंतु वेळेचा गुण असा झाला कीं, त्यांणींही युरोपियन लोकांवर हल्ला केला. शिबंदी

ह्मणून पलटण होती तीही बंडवाल्यांकडे सामील झाली, तेव्हां बंडवाल्यांचे इतक्या मोठ्या जमावापुढें एवढ्याशा इंग्रजी टोळीचा तो टिकाव किती लागणार? परंतु धन्य त्यांची कीं, अशा कठीण प्रसंगीं न गडबडतां एवढ्या मोठ्या शत्रूशीं तिनें सामना केला. २७ वे पलटणचे कर्नल स्पाटीस उट साहेब यांणीं तितक्यांत जलदी करून काळ्या पलटणीचे शिपाईलोकांच्या लायनीस एक दोन टिकाणीं आगी लाविल्या तेव्हां अर्थातच वाऱ्याचे जोरानें सर्व लायनी पेटून आगीचा एकच भडका उसळला, आणि बंडवाल्यांचीं ठिकाणें एकदम नाहींशीं झालीं. तेव्हां तीनही पलटणीच्या लोकांचे थव्याचे थवे किल्यांतून बाहेर पडले. त्या गर्दींत १३ वे इरेग्युलर पलटणीचा मेजर गाईस यास त्याचे लोकांनीं ठार करून टाकलें, व एनसाइन चापमेन आणि हेटर यांस जखमी करून टाकलें.

जिकडे तिकडे अशी उठलेली गर्दी स्थिरस्थावर झाली तरी त्या दिवशीं समेट होण्याचा कांहीं इलाज झाला नाहीं; परंतु दुसरे दिवशीं इरेग्युलर रिसाल्याचे कितीएक लोक आणि सुमारें २५० शीक लोक, झालें तें काम गैर समजुतीनें झालें सबब माफी करावी, असें ह्मणून शरण येऊन पुन्हा चाकरींत घेण्याची विनंती करूं लागले; व आपले जिवाचें भय पडून बंडांत सामील झालों होतों, वास्तविक बंड करण्यांचा किंवा हुकूम तोडण्याचा आमचा हेतु नाहीं, ह्मणून त्यांणीं

कांहीं सयुक्तिक कारणें दाखविलीं, तेव्हां त्यांचें तें ह्मणणें कबूल करून त्यांस पुन्हा चाकरीवर ठेविलें. ते लोक पुढें फारच उपयोगीं पडले. त्या प्रसंगीं करनल ओनील साहेब यांणीं आपले समयसूचकतेचा फार चांगला उपयोग करून शेंकडो बंडवाल्यांस झाडाशीं टांगून फाशीं दिलें, व जे चांगलेसे वाटले त्या लोकांत दहा हजार रुपये बक्षीस ह्मणून वांटले. येणेंकरून दोन तीन दिवसांत काशी येथील बंड अगदीं नाहींसें होऊन पूर्ववत शांतता सुरू झाली.

काशी येथील बंडाप्रमाणेंच जोनपूर येथें बंडाचा उद्भव होऊन युरोपियन लोकांची नासाडी झाली होती. ती अशी कीं, काशी येथें तोफखान्याचे तोफांचे भाडिमारांनीं बंडवाल्यांस जेर केलें, तेव्हां त्यांतून एक दोघेजण जोनपूर येथें येऊन तेथील पलटणीपैकीं लोक पाहऱ्यावर होते त्यांस ती खबर दिली. त्याच संधीस रिसाल्याचेही पुष्कळ लोक येऊन त्यांची उठावणी करीत होतेच, तेव्हां अर्थातच त्यांचें मन फिरून त्यांनीं युरोपियन लोकांची कत्तल उडविली. लेफ्टनेंट प्यारा हा आपले बंगल्यांत उभा होता त्यास अकस्मात गोळी लागतांच तो घायाळ होऊन पडला, व मिस्तर कयेन माजिस्त्रेट हा तुरुंगाची देखरेख करून परत येत होता तो तर गोळी लागून ठारच झाला. मिस्तर .... साहेब व त्याची मडम यांस स्वार लोकांनीं हालहाल करून मारून टाकलें. जिकडे तिकडे हत्यारें चमकूं

लागलीं. अशी स्थिति झाली तेव्हां जे कांहीं थोडे युरोपियन लोक राहिले होते ते आपला बचाव होण्यासाठीं लेफ्टेनेंट म्यारा याचे घरांत जमून बंदोबस्त करूं लागले; परंतु कोणते मार्गानें केव्हां आपल्यावर मरणाचा घाला येईल कोण जाणे असा धाक प्रतिक्षणीं त्यांचे मनांत सारखा जागृत असे, यामुळें त्यांस बिलकुल चैन पडलें नाहीं. परंतु काशी येथील बंड मोडून स्वस्थता झाल्याची बातमी येतांच जोनपूर येथील बंडवाल्यांचे हातपाय गळाल्यासारखे झाले, व काशीहून कुमकेसाठीं लोक येतांच बंडवाल्यांचा जो मुख्य होता तो येऊन इंग्रजांचे स्वाधीन झाला; त्यांबरोबर दुसरेही लोक शरण आले. परंतु शीक व ३७ वे पलटणचे लोक यांनीं खजिना लुटून नेला होता तो परत आणला नाहीं.

इकडे अलाहाबाद ह्मणजे प्रयाग येथील छावणींतही त्याच संधीस बंड उद्भवलें, त्याचा प्रकार असा कीं, तारीख ६ माहे जून ( -५७ ) रोजीं सहावी काळी पलटण, फार भरंवशाची असून दिल्लीचे बंडवाल्यांशीं लढण्यास ती तयार असल्या कारण्यानें गव्हरनर जनरल साहेबांचें आभारपत्र आलें होतें, तें तीस वाचून दाखविण्यासाठीं कवाइतीचे जाग्यावर आणली होती. तेव्हां तें आभारपत्र वाचून दोन तीन तास देखील गेले नसतील तों त्यांतील लोकांनीं सुमारें १७ आफिसर लोक मारले, आणि जेथें मडमा किंवा गोरे लोकांचीं मुलें सांपडली तेथेंच त्यांची

कत्तल उडवून "God save the Queen." (गॉड सेव्ह धि कीन) हें गाणें ब्यांडबाजांत वाजवीत निघून दिल्लीकडे चालते झाले.

बंड झाल्यापासून दोन तीन दिवस पावेतों प्रयागाचे सर्व घाटांवर कितीएक मैलपर्यंत जिकडे पाहावें तिकडे प्रेतेंच प्रेतें, आणि घरादारांची पडापडी, व बागबगीचांची नासाडी, आणि घायाळ व निराश्रित मुलांचा आरडाओरडा वगैरे उद्ध्वस्तपणाशिवाय कांहीं दिसत नसे. इंग्रज लोकांचे ह्मणून जेवढे बंगले होते तेवढे सर्व जाळून किंवा मोडून टाकले होते. आंतील माल चोरापोरीं गेला. त्याचा असा चमत्कार कीं, बंडवाले आणि दरवडेखोर यांनीं नेऊन जो राहिला तो त्या गर्दींत उचलून नेण्याकविषयीं भटकत फिरणारे युरोपियन व शीक लोक यांणीं कांही देखील शंका बाळगिली नाहीं. नेण्याजोगा माल होता तो उपयोगीं पडण्यासाठीं नेला, याचें कांहींच आश्चर्य नाहीं; परंतु उत्कृष्ट जातीचीं कपाटें, खुर्चा, मेजें वगैरे कांतीव कोरीव सामान, तसेंच हांड्या गलासें वगैरेंचा, कांहीं कारण नसतां, फक्त नास करण्यांतच आनंद मानून फोडाफोडी आणि मोडामोडी करून टाकली. यांत त्या उपद्रवी लोकांस काय फायदा झाला असेल त्याची कल्पनाच करवत नाहीं. याच प्रकारचें नुकसान करून बंडवाले तृप्त झाले असें नाहीं. त्यांनीं शेंकडों मैल पावेतों आगगाडी आणि तारायंत्र यांचा अगदीं उच्छेद करून टाकला, स्टेशनें

जाळून टाकलीं, व यंत्रापासून आपला कांहीं नाश होईल अशा भीतीनें त्याजजवळ न जातां गोळ्या घालून त्याच्या चिंधड्या चिंधड्या उडविल्या. असा प्रकार तारीख ११ जून पावेतों सारखा चालू होता. त्या तारिखेस कर्नल ओनील साहेब काशीहून फ्युजिलि-यरचे लोक घेऊन आला तेव्हां त्याणें प्रथम जिकडे तिकडे व्यवस्था करण्याकडे अधिक लक्ष्य दिलें. वाखयाचे उपद्रवानें त्या ठिकाणीं रोज पन्नास माणसें मरत असत, ह्मणून अतोनात घाण पडलेली होती ती काढवून अगोदर स्वस्छता करविली, आणि मग ज्याजवळ कांहीं लुटीचा माल सांपडेल, त्याला एक-दम झाडास टांगून फांशी देण्याचा सपाटा चालविला. तेव्हां लागलीच जिकडे तिकडे दरारा बसून स्वस्थ-ता झाल्यासारखें दिसूं लागलें. नंतर दुसरे दिवशीं सकाळींच कर्नल ओनील साहेबांनीं प्रयागाचे शहरावर तोफा चालू केल्या, आणि शीक व कांहीं रिसाल्याचे लोक पाठवून तेथील ग्यारिसनचे लोकांस मोलवी याणें अडकावून ठेविलें होतें, त्या-वरही हल्ला केला, तेव्हां एकदोन वेळ त्यांची याची चकमक होतांच बंडवाले मोलवीचे लोकांवर गेलेल्या टोळीचा दारूगोळा सांपडला तेव्हां अर्थातच त्यांस जय मिळाल्यावांचून परत यावें लागलें. असे चार दिवस चालत होतें. तेव्हां मोलवीही जेरीस येऊन वेढा सोडून चालता झाला. परंतु त्या गर्दींत त्याचा पुतण्या सांपडला

त्याला इंग्रजी अमलदारांसमोर आणीत असतांच त्यानें जवळचे एका शिपायाचे तलवारीस हात घालून ती घेण्याचा यत्न केल्याचें सोजीर लोकांनीं पाहातांच पलटणीचे कायद्याची परवा न करितां त्याचा तुडवून त्याच ठिकाणीं प्राण घेतला.

## भाग १६.

इकडे कानपुरास तारीख ६ जून रोजीं लुटालूट होण्यापूर्वीं बंड होण्याचा कांहीं संभव इंग्रजी अमदारांस दिसत नव्हता असें नाहीं. शिपाई लोकांचीं मनें अगदीं बदलून गेलेलीं उघड रीतीनें दिसून येत असत. मधून मधून साहेब लोकांचे बंगल्यास आगी लागल्या जात, व बाजारांत बंडाव्याविषयीं इतक्या उघड रीतीनें बोलणें चाले कीं, कितीएक यूरोपियन लोक त्या धाकानें कानपूर सोडून पूर्वींच चालते झाले होते. परंतु व्यापारी व दुकानदार लोकांस आपले मालाची आस्था सोडून जाववेना. तसेंच लखनौ प्रांतांतील सोजीर व सरदार लोक यांची बायकामुलें तेथें वरीं पुष्कळच असत तेव्हां त्यांच्यानेंही जाववेलसा संभव नव्हता. त्या भयंकर स्थितीविषयीं जनरल हुइलर साहेबास पुष्कळ लोकांनीं सांगितलें तरी बचावाचा ह्मणून मार्ग दिसेना सबब होईल तितका बचावाचा बंदोबस्त करून तेथें राहणें त्यास प्राप्त झालें.

कानपुरचे छावणीपासून नानासाहेब पेशव्याचा

ब्रह्मावर्त येथील राजवाडा ज्यास किल्ला ह्मणत तो फार झालें तर कोस दोन कोसांवर असेल. आपले बापाचें नेमणूकी पेनशन आपणाकडे न चालू केल्याबद्दल इंग्रज लोकांचें वैर नानासाहेबाचे मनांत घोळतच होतें. त्यास ही संधि सापडतांच त्यानें आपला मनोरथ सिद्धीस नेण्यास बिलकूल मागें पुढें पाहिलें नाहीं; तथापि नानासाहेबानें आपला बेत प्रथम बिलकूल समजूं दिला नाहीं. तो इतका कीं, जनरल हुइलर साहेबास जेव्हां बंडाचें भय वाटलें तेव्हां त्यानें खजिन्याचें रक्षण करण्यासाठीं नानासाहेबाजवळ लोक मागतांच दोन तोफा व २०० लोक पाठवून दिले. तेव्हां ही आस्थेवाईक वर्तणूक पाहून हुइलर साहेबास वाटलें कीं, याचे सारखा विश्वासु मनुष्य नाहीं. हुइलर साहेब तरी काय करतो. घाबरलेले स्थितींत पोहणार वाहतें काडीचा देखील आश्रय समजून आधार करूं पाहतो. हुइलर साहेबाजवळ काय ते २०० गोरे लोक होते. दारूगोळा वगैरे बेताबाताचा आणि चोंहींकडून बंडाच्या तर बातम्या घटको घटकीं येत. तेव्हां होईल त्या रीतीनें बचावाचा बंदोबस्त करून केव्हां कसा प्रसंग येतो त्याची वाट पाहत तो बसला होता. हुइलर साहेबास तसें फार दिवस वाट पाहत बसावें लागलें असें नाहीं. कारण कीं, तारीख ५ जून रोजीं सकाळीं नेटिव पलटणीचे सर्व लोक उघड रीतीनें बंडवाल्यांसारखीं

करूं करूं लागले. त्यांनीं प्रथम आपल्या लायनीं जाळून टाकल्या आणि कचेरींत खजिना होता तिकडे चाल केली व कांहीं लोकांनीं सर ह्यु ह्वीलर साहेब यांजकडून कचेरींतील पहारेकरी लोकांस खजिना बचावण्यासाठीं मदतीस जातां येऊं नये अशा बंदोबस्तासाठीं एक टोळी करून आडवें जाण्याचा बेत केला व जे लोक खजिन्यावर हल्ला करण्यास गेले त्यांनीं सुमारें २० लक्षांचा खजिना हातीं लागतांच हत्ती, उंट वगैरेंवर भरून नेण्याची तयारी केली. इतक्यांत त्यांस दुसऱ्या टोळयाही येऊन मिळाल्या, तेव्हां त्या सर्वांनीं नानासाहेबाच्या दोन तोफा व नजिबी ह्मणून पलटण होती तींतील लोकांसहित दिल्लीकडे जाण्याचा मार्ग धरला. तेव्हां इंग्रजाचे छावणींतील लोकांस प्रथम त्यांचे चालचलणुकीवरून स्पष्टरीतीनें दिसून आलें कीं, बंडवाल्यांचा हेतु कोणास इजा करण्याचा नाहीं. फक्त गर्दी करून मिळविलेला खजिना कोठें तरी जपून नेऊन ठेवण्याचा आहे, असें वाटलें ह्मणून तशा कठीण प्रसंगींही तीं त्यांचे वर्तनक्रमापासून सुख मानून आपलें दैव इतर ठिकाणचे गोरे लोकांपेक्षां चांगलें आहे अशा समजुतीनें आनंदाच्या गोष्टी करूं लागले. परंतु थोडक्याच वेळांत नानासाहेबांच्या वर्तणुकीवरून ती कल्पना खरी नाहीं असें उघड रीतीनें त्यांस दिसून आलें, कारण कीं दुसरे दिवशीं नानासाहेब आपले लोकांसहित परत येऊन त्यांणीं कानपुरापासून

सुमारें २ मैलांवर आपले फौजेचा तळ दिला. त्या वेळेस त्याचे ह्मणून सारे सहाशें पायदळचे लोक आणि ४ तोफा यापेक्षां जास्त बळ होतें असें नाहीं. परंतु हां हां ह्मणतां पलटणचे बहुतेक बंडवाले सरदार त्याला येऊन मिळत सुटले, तेव्हां मोठाच जमाव झाला. मग काय विचारावें ! कितीएक दिवसांचा दुष्ट द्वेष मनांत घोळत होता तेव्हां ज्या इच्छा मनांत धरून कांहीं उद्योग चालू केले होते त्यांचें इच्छित फल प्राप्त होतांच नानासाहेब केवळ आनंदानें अगदीं वेडावून गेले. मी आहें कोठें, करतों काय, इंग्रजाची फौज किती, शक्ति केवढी, ते लोक नेटानें उद्योग करून आपला हेतु सिद्धीस नेण्याचे कामांत किती धिमेपणानें वागतात, यंत्रज्ञान व कलाकौशल्याची मदत त्यांस किती आहे, हल्लीं आपले भोंवतालीं जमलेले बंडवाल्यांत एकोपा कितीवेळ टिकणार व आपले मनांतलि द्वाडवेगाचा आविर्भाव जमलेल्या बंडवाल्यांपैकीं प्रत्येकाचे अंतःकरणांत आहे किंवा नाहीं याचे विचाराकडे त्यांचें मन बिलकुल न राहतां संधि सांपडली आहे तर सूड उगवून घ्यावा अशा बेतानें नानासाहेबांनीं एक स्वारांचे टोळीस हुकूम केला कीं, युरोपियन लोक जेथें जेथें लपून राहिले असतील, किंवा कोणीं त्यांस छपवून ठेविलें असेल ते सर्व शोधून काढून मारावे. तसेंच त्यांचेपासून उत्पन्न झालेली प्रजा आणि ख्रिस्तिधर्मानुयायी वगैरे तत्पक्षाचे लोक असतील त्यांचीही कत्तल उडवावी आणि त्यांचे

घरादारांत आग लावून द्यावी. असा हुकूम होतांच मग काय पाहावयाचें आहे! ! जिकडे तिकडे आगीचे भडके "अगोदर उल्हास त्यांत आला फाल्गुनमास" असा प्रकार बंडवाल्यांच्या सहज यत्नानें थोडक्याच वेळांत दिसूं लागला, तेव्हां वाराही बराच जोरानें वाहात होता तेणेंकरून अग्नीची मोटी गर्जना, बंडवाल्यांची दारूगोळा, हात्यारें पात्यारें, सामानसुमान वगैरेच्या कारणानें आनंदाची गडबड व गोरे लोक वगैरे शोधून काढण्याचे कामीं गोंगाट, व सांपडलेल्या दुर्दैवी लोकांची आरडा ओरड, काकुलत्या, आणि संतापाचीं आवेशयुक्त बोलणीं, इत्यादिकेंकरून एकच हालकल्लोळ होऊन गेला त्याचें वर्णनच होणें कठीण आहे. तो प्रसंग पाहून मनुष्य कसाही पाषाणहृदयी असता तरी त्याचे डोळ्यांतून टिपें आल्यावांचून राहिलीं नसतीं. असो, त्या प्रसंगीं नानासाहेब यांणीं आपणास मराठ्यांचा राजा बनवून एकदम हनुमानाचें चित्र रेखलेला ध्वजाचा बाहुटा उभारला, आणि आपले नांवाची द्वाही चोंहीकडे फिरविली, व चोंहीकडे पत्रव्यवहार चालू केला. व दुसराही एक महंमदी धर्माचा बाहुटा उभा केला. अशी व्यवस्था झाल्यावर जरूर तेवढा बंदोबस्त करून नेमलेले फौजेची एक टोळी घेऊन कानपूरचे नबाबाचे राजवाड्यावर हल्ला केला. त्याचे दरवाजे तोफा लावून उडविले, आणि त्यास कैद केलें. मग हुइलर साहेब बंदोबस्तानें जमाव करून राहिले होते त्या जाग्याला वेढा दिला, आणि त्यांजवर तोफा चालू केल्या;

तेव्हां वेढ्यांतील लोकही त्या प्रसंगाची अणीबाणी मनांत आणून कितीएक दिवस मोठे नेटानें लढले. वेढ्यांत असलेले लोकांचा पाडाव करण्याचा प्रयत्न चालू होता तरी नानासाहेबाचे मनांत युरोपियन लोकांविरुद्ध सूड उगवण्याचा अतोनात आविर्भाव उत्पन्न झाला होता, त्याचे शमनार्थ वरचेवर शोधांत सांपडलेले गोरे लोक त्याचे समोर आणले जात, तेव्हां बायका पुरुष हा भेद मनांत न आणितां, किंवा त्यांचे वयाकडे न पाहतां हालहाल करून त्यांस मारण्याचा क्रम सुरूच होता. एके मडमेचा नवरा बंडवाल्यांनीं रस्त्यांत मारला आणि तिला धरून लहान लहान मुलांसहित नानासाहेबाकडे आणलें; तेव्हां ती त्याचा मोठेपणा पाहून आपणास मुलांसह जीवदान द्यावें ह्मणून अति दीनवाणीनें गयावया करूं लागली; परंतु त्या दुरात्म्यानें कांहीं दया मनांत न आणितां त्या सर्वांस मैदानांत नेऊन मृत्यु लोकींची वाट मोकळी करून द्यावी ह्मणून हुकूम केला, तेव्हां दोन प्रहरचें प्रखर ऊन लागत होतें तेणेंकरून त्या लहान लहान बालकांचा प्राण कासावीस होत होता, ह्मणून त्या मडमेनें आपले मुलांस एखादे झाडाचे सावलींत अमळ विसावा देण्याविषयीं बंडवाल्यांची काकळूत केली; परंतु त्या खाटकांनीं तिकडे बिलकुल लक्ष न देतां आई देखत एक एक मुलास भोसभोसकून त्यांचीं शरीरें छिन्नभिन्न करून टाकून शेवटीं मडमेचा शिरच्छेद केला. त्या गर्दींत

वर्ष दीडवर्षांचें एक धाकटें मूल राहून गेलें होतें. तें बंडवाले निघून गेल्यावर आपले आईचे आणि भावंडांचे प्रेतावर रांगत फिरून आई व भावंडें कांहींच हालत चालत किंवा बोलत नाहींत असें पाहून मधून मधून मोठ्यानें रडे आणि फिरून फिरून येऊन आईचे स्तनास लागे, तें पाहून कोणाही मनुष्याचें अंतःकरण वितळेल यांत काय संशय, व अशा वाईट रीतीचें वर्तन करणारावर ईश्वराचा क्षोभ झाल्यावांचून कसा राहील? नाक, कान, थान, वगैरे कापून किंवा डोळे फोडून युरोपियन लोकांपैकीं कोणावर दया करणें तर त्यास सोडून देणें ह्मटलें ह्मणजे त्या दुष्टांची पराकाष्टेचीच दया समजली पाहिजे. असाच क्रम कांहीं दिवस चालू असता तर मोंगलाई अमलांतील क्रूर शिक्षेचे बहुतेक प्रकार पुन्हा उदयास आले असते. बंडवाल्यांचा जिकडे तिकडे मोड होण्यास हें त्यांचें अघोर पापच जसें कांहीं इंग्रजी फौजेस साह्य होऊन थोडे दिवसांत त्यांचा समूळ नाश करण्यास कारण झालें अशी उत्प्रेक्षा घेण्यास कांहीं चिंता नाहीं.

साहेब लोकांचे दुर्दैवाचे योगानें व नानासाहेबाचें पापाचा घडा पूर्ण होण्यासाठीं त्याच संधीस फतेगडाहून सुमारें १२५ गोरे लोकांची टोळी भागीरथींतील होड्यांतून जीवरक्षणासाठीं पळून चालली होती, ती नानासाहेबांचे हातीं लागली तेव्हां त्यानें त्यांस मी तुमचें सर्वस्वी रक्षण करितों, असें खात्रीनें

सांगून गंगोदकाची शपथ वाहून त्या सर्वांस कांठावर उतरविलें, आणि ते सर्व एके ठिकाणीं जमले तेव्हां आपले कसाबी क्रियेस आरंभ करण्याचा हुकूम केला. त्यांत बायका मुलें होतीं त्यांचे तरवारी व भाला बरच्यांनीं जसें कांहीं कंदनच उडविलें. मग त्यांपैकीं राहिलेल्या सर्व पुरुषांच्या मुसक्या बांधून एके ओळीनें त्या सर्वांस उभे करून त्यांचे बांधलेले हातांतून एक लांब कळक घुसवून दिला, तेव्हां ते गुरांप्रमाणें दांवणींत उभे राहिलेले आणि त्यांच्या त्या दीनवाण्या मुद्रा अशी स्थिति पाहून अंतःकरण कळवळल्यावांचून राहणारा मनुष्य त्या बंडवाल्या दुष्टांशिवाय सांपडणें विरळा. असो, मग एक एक तिस्मारखानी बंडवाला घोड्यावर बसून त्यांचे भोंवताला फिरून मनास येईल तसें त्यांस लावून बोले, अचकट विचकट शिव्या देई, आणि मनास येईल तसे त्यांचे हाल करी. असें करितां करितांही बंडवाल्यांस कंटाळा आला ह्मणजे एकानें त्या दुरवस्थेंत असलेले इंग्रजांपैकीं कोणाचे तरी तोंडावर पिस्तुल झाडावें ह्मणजे त्या योगानें त्याचें तोंड छिन्नभिन्न होऊन रक्त, मांस, आणि मेंदू, दुसऱ्या कैद्याचे आंगावर पडावा, आणि मानेचा कल एकीकडे जाऊन तशाच स्थितींत त्याचा प्राण जावा. मग घटका अर्धघटका गेल्यावर दुसऱ्याचाही प्राण तसाच घ्यावा. अशा रीतीनें सर्वांचा जीव घेण्यांत बराच वेळ त्या दुष्टांनीं आपले मनास करमणूक करून घेतली.

कानपूरचे छावणींतील वेढ्यांत सांपडलेले युरोपियन लोकांनीं आतां कुमक येईल, घटकाभरानें येईल अशा आशेवर बेवीस दिवस नेट धरला; परंतु त्यांचे जवळचें खाण्यापिण्याचें सामान नाहींसें झालें, बाहेरून मिळण्याला किंवा आणविण्याला तर मार्गच नाहीं, व सोडवणूक होण्यासाठीं कुमक तर कोठूनच येईना, असें पाहून कर्नल व्हीलर याची अगदीं निराशा झाली. कानपुरापासून लखनौ पाहिलें तर ५० मैल लांब, तेथून लारेन्स साहेब कमिशनर याजकडून कुमक येईल असें वाटत होतें; परंतु अयोध्या प्रांताची स्वस्थता राखून कानपूरचे लोकांचे मदतीसाठीं त्याजकडून लोक येणें अशक्यच दिसलें. बंडवाल्यांचे हातून दिल्ली हिसकावून घेऊन तीच फौज इकडे मदतीस येईल असेंही कांहीं दिवस पावेतो वाटत होतें; परंतु दिल्लीचा पाडाव झाल्याची बातमी देखील येईना तेव्हां तिकडचीही निराशा झाली. अलहाबाद पाहिली तर तेथून १२० मैल लांब; परंतु अवकाशानें कां होईना, पण तिकडून तरी कांहीं लोक मदतीस येतील ह्मणून त्यांचे घोड्यांचें खिंकाळणें किंवा पाय वाजलेले ऐकण्याकडे वेढयांतील लोक चातकाप्रममाणें लक्ष लावून बसले होते; परंतू तीही अशा पुर्ण झाली नाहीं, इतक्यांत कर्नल व्हीलर साहेब निकरानें लढत असतां गोळी लागून मरण पावला तेव्हां वेढ्यांतील बाकीचे लोक कांहींच

मार्ग राहिला नाहीं असें समजून दीन होऊन नानासाहेबास प्राणरक्षणार्थ शरण गेले; परंतु त्या दयाशून्य पुरुषानें त्यांपैकीं एक देखील बातमी सांगण्यासांठीं जिवंत राहूं दिला नाहीं.

इकडे कर्नल हावलॉक मुख्य अधिकारी असावा किंवा कर्नल ओनील साहेबाकडे तो अधिकार असावा याचा प्रयाग मुक्कामीं कांहीं दिवस तंटा पडून शेवटीं दोघांसही सारखे अधिकार दिल्यावर तारीख दोन जुलई रोजीं कर्नल ओनील साहेब कानपूरचे छावणींतील लोकांची मोकळीक करण्यासाठीं ह्मणून जवळ जवळ आला तों त्यास व्हीलर साहेब मारला गेल्याचें व वेढा असलेले छावणींत कोणीही जिवंत न राहिल्याचें दुःखकारक वर्तमान समजलें, तेव्हां त्याचें अंतःकरणास किती दुःख झालें असेल त्यांचेंही वर्णन करणं दुर्घटच आहे.

---

## भाग. १७

मागिल भागांत सांगितल्याप्रमाणें जिकडे तिकडे बंडाची गर्दी उसळली तेव्हां नानासाहेब पेशवे यास तर वाटलेंच कीं, आतां पेशवाई अंमल सुरू केलेला कायम राहण्यास कांहींच हरकत राहिली नाहीं व त्याप्रमाणें सर्व बंदोबस्त करण्याकडे त्याचं विशेष लक्ष लागलें आहे हें पाहून हंबीररावांस ती स्थिति निभावण्याची नाहीं असें दिसून आल्यावरून त्यांनीं नानासाहेबास एकांतांत गांठून त्या विषयावर संभाष

णाचा ओघ आणला, त्याचें थोडेंसें वर्णन येथें करणें अवश्य दिसतें.

**हंबीरराव**.–नानासाहेब, आपण चालविलेला उद्योग शेवटास जाणार नाहीं असें माझें ह्मणणें नाहीं; परंतु इंग्रज लोकांची फौज पुष्कळ ठिकाणीं आहे. लोकही मोठे हिकमती आणि वीरश्रीमान आहेत. तेव्हां ते अगदीं बलहीन होत तों पावेतों या हिंदुस्थानांतील राज्याची आशा भित्र्या हिंदु लोकांप्रमाणें सोडतील असें नाहीं; व जरी त्यांचे सर्व मुलखांतून हवी तितकी फौज या वेळेस येईल असें न मानलें तरी त्यांस फ्रेंच, अमेरिकिन, प्रसियन, वगैरे युरोपियन देशांकडून फौजेची कुमक मिळण्याचा संभव आहे, तेव्हां जर करतां पुन्हां त्यांनीं आपला अंमल स्थापन केला, तर मग आपण चालू केलेले बेताचा काय परिणाम होईल, याविषयीं आपलें मत कसें काय आहे तें जाणण्याची माझी फार इच्छा आहे.

**नानासाहेब**.–परिणाम तो काय व्हावयाचा आहे! अमीरी नाहीं, तर फकीरी पतकरूनच या कामास मुळापसून मी प्रवृत्त झालों आहे. हें तुह्मांला ठाऊक आहेच. "अर्थं वा साधयेत् देहं वा पातयेत्." वडिलांनीं कोटयावधि रुपयांच्या प्राप्तीचा मुलूख इंग्रज हे आपले विश्वासु मित्र समजून व आपले मुलाबाळांचें हे चांगले रीतीनें रक्षण करतील ह्मणून यांच्या वचनावर भरंवसा ठेवून पेनशनाला कबूल होऊन राज्याची आस्था सोडली. त्या पेशव्यांचे

राज्यापासून हजारो इंग्रज लोकांचे पालन पोषण होत असतां आणि तशांत त्यांचा प्रत्यक्ष मी मुलगा असतां मला नेमणूक न करून देण्याविषयीं इतकें अजिजी करून मागणें केलें तरी कांहींच गोष्ट कबूल करीत नाहींत, तर असें दुष्ट कर्म करण्याची खोड मोडण्याचा यत्न केल्यावांचून असें कुत्र्यासारखे तुकडे मोडीत जगून तरी काय करावयाचें आहे? पुनः स्थिरस्थावर होऊन जरी कदाचित त्यांचे राजाची स्थापना पूर्वीप्रमाणें झाली तरी माझ्या या अशा वर्तणुकीवरून, जे दुसरे राजेरजवाडे आहेत त्यांच्या बरोबर असें इतकें बेपरवाईनें इंग्रजाच्यानें वागवणार नाहीं- दत्तक मुलगा ह्मणजे औरस मुलाप्रमाणें वारस नाहीं असें ह्मणण्याचाही त्यांस मग विचार पडल्यावांचून खचित राहणार नाहीं. इतकें तर होईलना! चल तितकेंच पुरे. आज या नीचांनीं आपलें धर्मास अनुसरून व अनादि कालापासून चालत आलेले दत्तक घेण्याचे रीतीचा केवळ आपले लोकांची सत्ता जमिनीवर राहु नये ह्मणून उच्छेद मांडला आहे. हें याचें दुष्ट व अति नीच कर्म पाहून माझे पायांची आग मस्तकांत जाते, सबब तुह्मीं कांहीं कां ह्मणाना, यांचा सूड उगविण्यासाठीं माझें अंतःकरण रात्रंदिवस किती तळमळत आहे, तें मीं तुह्मास काय सांगूं?

**हंबीरराव**—तें सगळें खरें, परंतु एकानें गाय मारली ह्मणून दुसऱ्यानें वासरूं मारावें ही रीती नाहीं..

तुमचे धर्मशास्त्राचे महत्त्व तुह्मांला ठाऊक, तें त्यांणीं मानलें पाहिजे असा का कांहीं आधार आहे ? तुह्मी दत्तक आहां तर औरस पुत्राप्रमाणें काकासाहेबाचें ( बाजीराव पेशव्याचें ) श्राद्धपक्ष वगैरे सर्व करितां. आपले लोक व धर्मशास्त्र औरस आणि दत्तक यांत कांहीं भेद मानीत नाहींत, हें न्यायानें किंवा नीतीनें योग्यच आहे; परंतु ते गैर नीतीनें वर्ततात ह्मणून त्यांस शिक्षा करावी किंवा चांगल्या गोष्टी प्रचारांत राहण्याचे हेतुनें त्यांचें आपलें बलाबल न पाहतां सामर्थ्यवानांशीं कलह करून पतंगासारखा आपणच आपला नाश करून घेणें हें मला तर अगदीं पसंत वाटत नाहीं. ह्मणून उगीच तसदी देत आहें, माफी असावी.

**नानासाहेब**—तुमचें अंतःकरण माझे हितासाठीं पूर्ण कळवळत आहे ह्मणून तुह्मी आज सकाळपासून एकांताची संधि पाहात आहां हें मी समजलों, नाहीं असें नाहीं; परंतु मी विचारितों कीं, ज्या कीर्तिमान पूर्वज्यांचे वंशांत मी आलों आहें, त्यास असें मेलेलें अन्न खाऊन काळोखी लावावी असें वर्तन करणें तरी मजसारख्यास योग्य होईल का? अहो तुह्मींच पाहा कीं, या इंग्रजांचे वर्तणूकीवरून त्यांचे अंतःकरणांत न्यायाचा किंवा नीतीचा एक लेश तरी असल्याचें दिसत आहे का ? ज्यांनीं लखनौचे महाराज यांजपासून लाखो रुपये कर्जाऊ घेतले असून त्यांजकडून किंचितही गैरनीतीची वर्तणूक न होतां एकदम त्यांचा मुलूख खालसा केला; नागपुरचे राज्याच्याही अपहारबुद्धीनें

प्रत्यक्ष राजघराण्यांतील पुरुषाच्या राण्या जिवंत असतां त्यांचे देखत त्यांचीं घरें दारें जशीं लुटावीं तशीं लुटून कर्जदाराप्रमाणें लिलांव करून टाकलें. साताऱ्याचें राज्य आज शेकडों वर्षें चालत आलें त्या वंशांतील धर्माप्रमाणें योग्य पुरुष अधिकारी असतां तें खालसा करून टाकलें. आंग्र्याचे बायांस रडत बसविलें आहे. असें एक कीं दोन ह्मणून तुह्मांला सांगू. फार तर काय, माजी राज्यांतून लोकांकडे चालत आलेल्या इनाम जमिनी वगैरे ज्यांजकडे जशा चालत असतील तशा चालवूं ह्मणून अव्वल इंग्रजींत जाहीरनाम्यानें लोकांस प्रगट केलें असून, मनास येईल तसे वेडेवांकडे कायदे करून, हिंदुस्थानचे लोकांस यांणीं दीन करून सोडलें आहे. याबद्दल आह्मांसारखे देशाभिमानी लोकांस कांहींच कां वाईट वाटूं नये ! ! जळो त्यांची नीति आणि आग लागो त्यांचे ख्रिस्तियन धर्माला ! ! हिंदुस्थानांत जीं कामें या नीतिभ्रष्ट इंग्रजांनीं केलीं आहेत तीं त्यांचे धर्माप्रमाणें बरोबर आहेत असें पांच वर्षांचें एखादें मूल जरी कबूल करील तरी मग मी आपला सर्वस्वी दोष कबूल करीन; परंतु हिंदुस्थानची रयत अति गरीब, विचारशील, नीतिमान, तशीच राज्यसत्तेस पूर्णपणें मान देणारी पाहून मेंढरांचे कळपांत लांडग्यानें जसा प्रळय करून द्यावा तसें या गोरकाय लांडग्यानीं करून सोडलें आहे. ( पराकाष्टेची उदास मुद्रा करून ) बन्यासाहेब, ज्या कायद्यानें आणि नीतीचे रीतीनें या देशांतील लोकांचें

राज्य आणि जमिनी हरण केल्या आहेत तेच कायदे जर इंग्लंड देशांत लागू करून तिकडील लोकांचे हक्कांस याचे सहस्त्रावे हिशानें धक्का आणिला असता तर यांच्या या अशा घातक कायद्यांचा एक क्षणभर तरी टिकाव लागला असता, तर मी ही पाहातों ! ! ! या गोष्टींची आठवण झाली, म्हणजे माझे आंगाची लाही लाही होऊन जाते, त्याला मी काय करूं ? शिव ! शिव ! जगदीशा !

**हंबीरराव**–त्यांनीं अनीतीचें वर्तन केलें नाहीं किंवा करीत नाहींत असें माझें बिलकुल म्हणणें नाहीं. गाई बैलाचे चरबीचे तोटेही शिपायास तोडावयास लावितात म्हणून त्यांच्यावर उलटून पलटणीच्या पलटणी बंडें करताहेत, त्यांत ईश्वरानें आपला राग त्यांस थोडा कां दाखविला आहे ? अहो, एवढ्या मोठ्या शिक्षेनेंही ते अद्याप जागे न होतील तर त्यांस अधिक शिक्षा केल्यावांचून देव सोडील असें तुम्हांला तरी वाटतें कां ? तुम्हांला माझें इतकेंच सांगणें आहे कीं, तुम्ही आपले हक्क पाहिजे तर विलायतेस जाऊन सांगा, तेथेही दाद न लागेल तर फ्रेंच, अमेरिकन वगैरे मोठे मोठे राजांचे मानकरी आहेत, तेथें त्यांस मध्यस्थीस घालून आपली तजवीज करून घ्या , परंतु या बंडवाल्यांस मिळून गोरे लोकांचे वर्तनांतील काळेपणा त्यांचे रक्ताचे पाटानें धुण्याचा प्रयत्न तुम्ही होऊन चालवूं नका, इतकेंच माझें मागणें आहे. इंग्रजांची वाईट वर्तणूक सर्व जगाचा नियंता जो परमेश्वर त्यासच

आवडत आहे ह्मणून तो त्यांचें चालूं देत आहे. ज्या दिवशीं या इंग्रजांचें पापाचा घडा भरेल त्या दिवशीं त्यांचा नाश होण्याला एक घटकेचा तरी अवकाश लागेल कां ? नानासाहेब, आपण विचार करून पाहवें कीं, हिरण्यकश्यपासारखे दुष्ट दैत्य, रावण, कुंभकर्णासारखे उन्मत्त राक्षस, कंस, दुर्योधन व जरासंध यांसारखे प्राचीन काळचें राजे, व मोंगलाई अमलांतील महंमद, तैमुरलंग, अवरंगजेब इत्यादि बादशाहा कीं, ज्यांचे सामर्थ्याची थोरवी अद्यापि लोक मान्य करीत आहेत ; परंतु त्यांस त्यांचे दुर्वर्त्तनाचें शासन करावेंसें ईश्वराचे मनांत आलें तेंव्हां बापाचा घात मुलाचे हातून, व राक्षसाचा वध मनुष्य व वानर यांचे हातून, आणि दुर्योधनादि बलिष्ठांचा घात निर्बली पांडवांकडून, आणि अवरंगजेब वगैरे उन्मत्त बादशांहाचा पाडाव आमच्या शिवाजी मराठ्याकडून करविला कीं नाहीं ? याचा तुह्मी विचार पहा ! या इंग्रजांची सद्दी अनुकूल आहे तेथपावेतों अशा दुर्घट उपायानें त्यांचे विरुद्ध कांहींच होणें नाहीं, इतकेंच माझें ह्मणणें आहे.

**नानासाहेब.**–( तेंच बोलणें आपले हितमार्गाचे साह्यास घेऊन ) फारफार चांगलें बोललां. आतांही या बंडवाल्यांचे हातून इंग्रजांच्या नाशाचा हेतु मनांत धरून हें बंड देवानें करविलें नसेल कशावरून ? व माझे मनांत तरी प्रेरणा त्याच ईश्वराची झाली नसेल हें कशावरून ? खऱ्याखोट्याचा निवाडा शेवटीं होईल तेंव्हां खरा.

**हंबीरराव**–( किंचित आवेशानें ) मला माफी असावी; आपण ह्मणतां तसं नाहीं. कां कीं, त्या प्रसंगाचीं चिन्हेंच वेगळीं असतात. हिरण्यकश्यपूनें प्ऱ्हादाचा छळ केला, तेव्हां प्ऱ्हादानें हिरण्यकश्यपूचे नाशाचा बिलकुल प्रयत्न केला नाहीं. रावणनाशाचे वेळेस तरी रामानें रावणाचे नाशाचं कारण त्याजकडूनच होऊं दिलें. कंसाला मारण्याचेच हेतूनें कृष्ण आपण होऊन गोकुळांत गेला नाहीं. पांडवांचा छळ दुर्योधनानें केला तरी ते होऊन विनाकारण लढाईस प्रवृत्त झाले नाहींत. जेव्हां दुसरे सर्व उपाय हरले तेव्हां मग त्यांनीं सर्वांचे मसलतीनें लढाईची तयारी केली तरी ऐन लढाईचे समरंगणांत अर्जुनासारखा योद्धा; पण लढाईंत अनीति आहे असें पाहून अडून बसला, तेव्हां ओघानें आलेलें क्षत्रियाचें कर्म केलें पाहिजे अशी जेव्हां श्रीकृष्णानें त्याची खात्री करून दिली, तेव्हां तो लढाईस प्रवृत्त झाला. तसें या ओघावरून पाहिलें तर जे आपण होऊन धर्मानें चालत नाहींत, त्यांस शिक्षा करण्यासाठीं तुह्मीं अधर्माचें अवलंबन केलें आहे असें दिसून येईल. इंग्रजांनीं अनीतीची राज्यरीति या देशांत चालविली आहे, ह्मणून त्या देशांतील जे लोक इकडे पोट भरण्यासाठीं मजूरीनें काम करण्याकरितां आले आहेत त्यांचा, किंवा त्यांचे बायकामुलांचा आपण निर्दयपणानें नाश करावा हें आपले हिंदुधर्माला तरी नीट दिसतें काय ! मी म्हणतों आपण पाहिजे तर त्यांबरोबर लढाई करा.

लढाईंत ज्यांचा पराजय होईल त्यांस अटकेंत ठेवा, त्याला चिंता नाहीं; परंतु निरपराधी, अशा दीन झालेल्या बायकामुलांस धरून आणून त्यांचा छळ करून मारणें हें ईश्वरास आवडेल कीं नाहीं, याचा विचार प्रथम केला पाहिजे.

**नानासाहेब**–त्याचा तो विचार काय करावयाचा आहे ! वाघ, लांडगे इत्यादि हिंसक पशूंचीं पिलें देखील पुढें उपद्रव देणारीं होतात हें तर तुह्मांला ठाऊक आहेना ? यासाठीं कोणी त्या सर्वांचें हनन करील तर तसें करणें नीट नाहीं, असें तरी तुह्मी ह्मणूं सकतां कां ?

**हंबीरराव.**–अहो, हिंसक जनावरांची गोष्ट वेगळी आहे. ते त्यांचे स्वभावधर्म पडले. ती गोष्ट मनुष्यास लागू होत नाहीं. आपण होड्या अडवून त्यांतील धरून आणलेलीं माणसें मारविलीं त्यावेळेपासून माझे आंगावर रोमांच उभे राहिले आहेत. माझा जीव थरथर कांपतो आहे कीं, आपण ब्राह्मणकुळांत उत्पन्न झालां आहां व न्यायनीतीस जाणणारे, शाहणे समजूतदार असून आपले धर्मशास्त्रांत सांगितलेले नीतीस काळोखी आणण्याजोगी वर्तणूक करण्यास कसे प्रवृत्त झालां, हें मला समजत नाहीं.

**नानासाहेब**–( आवेशानें ) तें मी तुम्हांला आतां काय सांगूं ? माझे जातीचे लोकांशीं इंग्रजांचें अनीतीचें वर्त्तन पाहून माझें मन अगदीं खवळून गेलें आहे, त्यानें मी अगदीं वेडा झालों आहें. सबब असें के-

त्यानें देखील माझे मनाची शांति होत नाहीं. या दुष्टांचें इंग्लंड बेटही खणून टाकलें तरी माझे मनास शांतता होईल किंवा त्याविषयीं दयाबुद्धि उत्पन्न होईल असें वाटत नाहीं. याला मी तरी काय करूं? मी आतां अगदीं रागाचे आवेशानें वेडा होऊन गेलों आहे, यास्तव माझे हातून वाईट कर्में घडतील किंवा घडलीं असतील तर त्याबद्दल देवानें मला शिक्षा करूं नये, असें माझें बिलकुल म्हणणें नाहीं. जी योग्य शिक्षा ती होईल असें मला पक्कें ठाऊक आहे; तरी या नीच इंग्रजांचे वागणूकीवरून व अनीतीमुळें आपले मनांत मी द्वेष फार दिवसापासून सांठवून ठेविला आहे, त्यांचा सूड घेण्याची संधि आज इच्छेप्रमाणें आली आहे. तर माझ्यानें या दुष्टांचा घात केल्यावांचून राहवत नाहीं. मी खचित सांगतों कीं, आतां मी आपले मालमत्तेची, फार काय, जीवाची सुद्धां आस्था अगदीं सोडली आहे. या जगांत मला इंग्रजांचा सूड उगविण्यासाठीं होईल त्या रीतीनें त्यांचा नाश करण्याशिवाय दुसरी इच्छा राहिली नाहीं. यास्तव वडिलांनीं जी कांहीं पुंजी मिळवून ठेविली आहे, ती सर्व लढाईच्या सामग्रींत खर्च करून जय मिळाल्यास राज्य भोगीन. नाहीं तर मरण आलें तर बरेंच; किंवा देशत्याग केल्यावाचून मोठेपणाचे खोटे भूषणानें यापुढें येथें काळ काढण्याची गोष्ट माझे हातून कालत्रयीं होणार नाहीं. देवानें मला अनंत जन्म नरकवास दिला तरी त्या दुःखापेक्षां या इंग्रजांचे अनीतीचें वर्त-

नानें माझे जीवास फार इजा होत आहे, ती मी तुम्हांला काय सांगू? तुम्हांला त्यांची भीति वाटत असेल किंवा त्या दुष्टांशीं सख्य ठेवावेंसें वाटत असेल तर तुम्हीं तिकडे जाऊन खुशाल मिळा. माझी मनाई नाहीं; परंतु (सक्रोध वाणीनें) हा नानासाहेब पुन्हा पूर्वजाप्रमाणें पेशवाई तरी गाजवून इंग्रजांस या हिंदुस्थानांतून समूळ घालवून देईल. नाहीं तर लढाईंत पडला तर बरेंच झालें; तसें न होईल तर इंग्रजांचे हातीं न लागतां जिकडे वाट फुटेल तिकडे जाऊन कालक्षेप करील. हें तुह्मी खूप समजा. (असें ह्मणून बाहेर निघून गेला)

---

# भाग १८.

पुतळाबाई ब्रह्मावर्ताहून निघाली तेव्हां तिचे मनाची स्थिति पाहिली तर जसें कोणी गुन्हेगार मनुष्यास फांशीं देण्यास नेतात तेव्हां आपलें मरण जवळ आलें म्हणून त्याचा पाय उचलत नाहीं, आसपास काय चाललें आहे तिकडे लक्षच जात नाहीं, गुंगल्यासारखें होऊन जातें, व कोणी बरी किंवा वाईट गोष्ट बोललें तरी त्याविषयीं विधिनिषेध वाटत नाहीं इतकेंच नाहीं, तर मनोधर्मरहित केवळ शारीरिक धर्माचे अनुरोधेंकरून लोकदृष्टीनें सजीवता त्याजवर स्थापन केली जाते; तशीच तिची अवस्था पूर्णपणें झाली होती. हंबीररावानीं माहेरीं जाण्याचें सांगितलें त्या रात्रीं तिला बिलकुल झोंप आली नाहीं; व पोटांत भूक होती तरी

ती त्या रात्रीं मनास झालेले महद्दुःखाचे कारणानें जेवली देखील नाहीं. घरांत सासू बायजाबाई होती. तिचें मन जरी पुतळाबाईविषयीं संतोषित नव्हतें तरी जेव्हां हिला माहेरीं वाटे लावून देतात असें समजलें तेव्हां तिला देखील फार वाईट वाटलें. तिनें पुतळाबाईचे तर्फेनें इंबीररावांजवळ बरीच रदबदली केली. परंतु त्यांचें मन तिजविषयीं सुंदराबाई व सुभानराव यांनीं आपले कपटबुद्धीनें अगदीं विपरीत करून टाकलें होतें, या कारणानें इंबीररावांनीं तिला ठेवून न घेण्याचे कामीं फारच दुराग्रह धरिला; तो इतका कीं, पुतळाबाई दुसरे दिवशीं घरांत आहे असें समजेल तर त्या घरांत आपण पाऊल ठेवणार नाहीं, म्हणून एकदम आई "बायजाबाई" चे पायांची शपथ वाहून घेतली. तसेंच ती गांवांत आहे किंवा तिला कोणी आश्रय दिल्याचें समजेल तर आपण प्राणत्याग केल्याशिवाय राहणार नाहीं म्हणून अगदीं निक्षून सांगितलें. तेव्हां बायजाबाईचीही खात्री झाली कीं, आतां या कामांत पडणें व्यर्थ आहे. मग पुतळाबाईची पुष्कळ समजावणी करून तूं आतां थोडे दिवस जा, मग तुला आणण्यास पाठविण्याची कांहीं तरी तोडजोड काढीन, म्हणून वडीलपणाचे नात्यानें सांगून व आपले जवळचे सुमारें ४००।५०० चे दागिने तिला खर्चावेचास देऊन सकाळींच तिची सर्व तयारी करून देऊन तिला वाटेस लावून दिलें.

पुतळाबाईचें मन दुःखानें अगदीं गुंग होऊन गेलें

होतें, या कारणानें तिचा मेणा भोयांनीं दहा अकरा वाजत तोंपावेतों सात आठ कोस आणला. बरोबरची मोलकरीण चालतां चालतां थकली, व ऊनही फारच लागूं लागलें. पायपोळ झाली, तरी पुतळाबाई तोंड धुऊन न्याहरी वगैरे करण्याचे हेतूनें ऊन टाळण्या-साठीं उतरण्याविषयीं कांहींच बोलत नाहीं हें पाहून बरोबरचे सर्व मनुष्यांस बरेंच आश्चर्य वाटलें; परंतु करतात काय ? तिचे मनाची स्थिति कोणासच माहीत नसले कारणानें त्यांस वाटलें कीं, बाईसाहेबांस जाण्याची फार जलदी आहे, ह्मणून त्या थांबण्याचें बोलत नाहींत. त्यांनीं आपआपसांत ऊन झाल्याचें बोलून तिला समजावें ह्मणून दोन चार वेळ यत्न केला; परंतु तिकडे तिचें लक्षच गेलें नाहीं. एकदां मोलकरणीनें तोंड धुण्यास उशीर झाला आहे ह्मणून उतरावयाचें कीं काय ह्मणून विचारिलें देखील; परंतु पुतळाबाई कांहीं बोलली नाहीं. भोई खांदा बदलण्यासाठीं उभे राहत तेव्हां फटीवाटे पाहिलें तर ती आंत जागी आहे असें पाहणारांचे समजुतीस येई; परंतु ती थांब-ण्याला कां सांगत नाहीं याचें कारण कोणाच्याच लक्षांत येईना; आणि पुढें उन्हांत चालण्याचा तर बिलकुल इलाज चालेनासा झाला, तेव्हां एका खिसमतगारानें आंब्याची छाया पाण्याचे लगत सर्व बरोबरचे माणसांस पुरण्याजोगी पाहून भोयांस मेणा उतरण्यास सांगितलें, तेव्हां सर्वांला मोठा आनंद झाला.

पुतळाबाईचा मेणा खालीं ठेविला तेव्हां ती कांहींशी

देहभानावर येऊन पडदा वर करून पाहूं लागली तों बाहेर उन्हाचे रखरखीतपणामुळें तोंड काढवत नाहीं, बरोबरचीं सर्व माणसें थकून जागोजाग विसावा घेत बसलीं आहेत, मोलकरीण मात्र मेण्याचे बाहेरील बाजूस बसून आपल्या कपाळावरील घाम निपटीत आहे असें पाहून,

**पुतळाबाई**-कोयनाबाई तुम्हांला ऊन्ह लागलें ना ? मघांच उतरण्याचें केलें असतं तरी चांगलें झालें असतें. म्हणजे सगळीं माणसें इतकीं हैराण झालीं नसतीं.

**कोयना.**–( नेहमीची वहिवाट नसतां आपले नांवा-पुढें "'बाई" शब्द घालून यजमानीन बोलल्यामुळें अमळ चकित होऊन ) बाईसाब मला य 'बाई" कशाला म्हनायला व्हाव. सरकारच्या पायांप चाकरी करूनशेनी अमी पोट भरतो, त्येना इतक म्होटपन नग द्यायला.

**पुतळाबाई** -(आपले दुरवस्थेनें अंत करणांत अगो-दरच अगदीं करपून गेली होती, तितक्यांतून तिचे बोलण्यांत सरकारशब्द कानीं आल्यानें त्यास आतां आपण योग्य नाहीं, हें मनांत आणून रोदनमिश्रित शब्दानें) कोयनाबाई, मी आतां तुम्हांला आपले चाक-रांप्रमाणें कसें मानूं? माझ्याकडे देवानें तो अधिकार आतां ठेविला नाहीं. सीतेची उपेक्षा करून रामचंद्रजींनीं तिला वनांत पाठविलें तेव्हां तिला न समजतां लक्ष्मणानें नेलें, तसें जरी झालें असतें तरी मला घर सोडतांना अंतःकरणाची तळमळ झाली हें दुःख झालें नसतें.

( मोठा सुस्कारा टाकून ) असो, आतां पुढें अंबाबाई अहे!! मला तर कांहींच सुचत नाहीं. ( असें ह्मणून रडूं आटोपेनासें झालें, यामुळें तोंड एकीकडे करून फुंदूं लागते. )

**कोयना.**–( नवऱ्याचें व तिचें कांहीं भांडण झालें ह्मणून ती माहेरीं चालली आहे अशा समजुतीनें ) बाईसाहेब, ह्ये काय दोडवानी डोळ्यांतून पानी आनावं? थोडे दिस माहेरीं ऱ्हाऊनशेनी आपल घराला सरकार आनतील तवां त्येचबी समद राग जाऊनशेनी मन वळल. त्येला इकतं दुःख कशाला व्होवं? हं, नका रडूं, डोळ दुखतील कीं! अधिच उन्ह लई लागतया, तशामंदीं रडल तर कस व्हइल? वाइच पानी तोंड धुया देऊ का? न्हेरी करूनशेनी येनी घालायाची कीं, अदुगर घालतां?

**पुतळाबाई**–( रडूं आटोपून ) आतां मला न्याहारी नको आणि वेणीही घालायची नाहीं, कोठें चांगलीशी अडोशाची जागा असेल तर .... बाहेर मात्र जाऊन यायचं आहे.

**कोयना.**–बाईसाब अस कस व्हइल? वाइच तोंड धुवन न्हेरी केलीच पाहिजेल. तीं बगा ते झाडाप .... जाण्यायोग जागा हाये, तकड म्येना नियाला भोइरजांसनी बोहूं का पायान जायाचा ब्योत हाइ! व्हाई तर जोडा देत्ये. मी संग येत्ये. चला व्होवं तर. विकुडशी आलां ह्मनजे वाइच खाऊन मगशेनी येनी घालावी त्यच बर.

**पुतळाबाई**.–( उदास शब्दानें ) आतां माझा मेणा तिकडे नेण्याचा मोठपणाही मला नको, आणि जोडाही घालण्याची मला गरज राहिली नाहीं. देवालाच माझे हाल करण्याचें आवडलें आहे, तर आतां दु:ख मानून काय होतें ? तांब्याभर पाणी दे म्हणजे झालें. या देहाची आतां प्रतिष्ठा ठेवणें मला अगदीं आवडत नाहीं. सर्पदंश होऊन याक्षणीं प्रेत होऊन पडेन तर मला किती आनंद वाटेल. हरि ! हरि ! ! ( उसासा टाकते. )

**कोयना**.–जा बाइसाब, ये अस वंगळवानी बोलन मला न्हाइ आवडत. आमच सरकारसनी तुमच बिना करमल कस ? घरधनी व्हत तवा मीबी त्येनीं राग केला मनजे लइ लइ निश्वास करावा पन एक दोन दिस गेल कीं, माझं मन हुरहुर व्हाया लाग. मग त्येनींबी पोटाशीं धराव तवा बर वाट. अपून तरी त्येच्या भांडनापाई इतका राग कशाला मानावा ? आन रागामंदीच म्हायेरीं तरी कशाला जान्याच कराव ! वाइच इचार मनामंदी करून त्येचा अन्येव असला तरी खेमा करूनशेनी आपल रोच्या वानी आनंद्यांत असाव त्ये बर ( • • • • कडे जाण्याचा हेतु जाणून ) चला मी तांब्ये घेऊनशेनी येत्य तुमच्या संग तकड.

**पुतळाबाई**.–( अडोशाच्या जाग्याकडे बोट करून ) हें येथें तें जवळच आहे, तिथें जायाला मला सोबत नको. तूं न्याहारी करून मला थोडें पाणी घेऊन

ये ह्मणजे झालें. ( असें ह्मणून जोडा न घालतांच तांब्या हातांत घेऊन पांच सात पावलें चालून पायांस खडे लागल्यामुळें झालेले दुःसह शरीरवेदनेनें उभी राहून ) येथें गडे खडे भारीच आहेत, ते पायांला कसे कांट्यासारखे टोचतात. तेवढा जोडा तरी इकडे टाक ह्मणजे मी घालून जातें. मी मेलें तसेच चालेन म्हटलें; पण जन्मापासून जोड्याची संवय पडली आहे ती कोठें चालूं देते आहे !

**कोयना.**–( किंचित विनोदयुक्त वाणीनें ) मी पहिल्यानदाच न्हाइ सांगितल कीं, जोडा न्ह्या, तवा न्हाइ ऐकिल. बाइसाब वनांतल्या केळीच्यान रानांतल्या बोरीबाभळीवानी राहन व्हइल काय ? आमी सैरट मानस करतो म्हून तुमच्यान तसं कंदीबी व्हायाच न्हाइ. ( जोडा तिचे पुढें नेऊन ठेवून ) बगा व्हाइ तर सोबतबी येत्य मग व्हाव तर मी न्हेरी करीन चला.

**पुतळाबाई.**–(जोडा घालून,) नको, नको; तूं आपली जा न्याहारी करायाला. जा मला कोणी वाघ लांडगे खायला येत नाहींत आणि आतां आले तरी माझें काय वाईट होणार ? सोनेंच होईल. आतां त्या ( नवऱ्याचे ) पायांचें अंतर पडलें तर पतिव्रताधर्मास झटलें ह्मणजे मरणच बरें. जगून तरी काय करावयाचें आहे. (असें ह्मणून‥ ‥कडे चालती झाली. इतक्यांत खिसमतगारही नदीवर जाऊन तोंड व हात पाय धुऊन न्याहारी करण्यासाठीं तांब्या पाण्यानें भरलेला हातांत घेऊन आला आणि कोयना एकटीच आहे असें पाहून. )

**खिसमतगार**–बाइसाब • • • • ला गेल्या हैती वाटत. मंगासी मंगासी त्येच बोलन ऐकिल तवापून मला वाटत कीं, त्यांसनी लइ दुःख झालया. कोयनाबाई, काय बर त्येसनी झालया ?

**कोयना**–(पुतळबाईस ऐकूं जाऊं नये अशा शब्दानें ) त्येच. दादल्याशीं काय नु भांडण झालया वाटत. आज बगा पंधारदी घरामंदी कुरकुरी चालल्याता. सुंदराबाय आन् कारभारी मामासाब याहिनी काय तरी बागा भांडन लावलया. अस माझ्या होन्यांत येत. न्हाइ तर ही बिचारी इतकी खंती नई व्हती!!

**खिसमतगार**–थोरेल वाड्यांतल त्ये मल्हारबा हाइत किनी, त्यांचेबी बोलन्यांत असाच काइ रंग दिसलाया. त्यांसनी कारभाऱ्यांनीं काल पर्वादी बगा दोन दोन हजाराच दोन तोड दिल्यात. त्योबी गिरस्त मग लइच हरखला व्हता. आन् चोळीच कायनू बायनू सांगत व्हता. पण मला इळ न्हवता म्हून मी ऐकत बसलों न्हाई. पन त्येंच काइ तरी कारन असावं वाटत.

**कोयना**.–बाइसाबाचे तैनातची समदी मानस बदलली त्येवाच मी तरोक केला कीं, यामंदी काइ वाइच तरी कारन असाव. मी पगा झाड लोट करीत व्हतें त्या मला शिरीमंत बाइचे तैनातीमंदी टिऊनशेनी पगार अधिक केलाया. पन आमी काय सैरट मानसं ( पुतळा ) बाईच्या उपयोगी न्हाइ, तरी ती बिचारी काइबी बोलत न्हाइ. मलाच तिची साधुइरीति पाऊन

शेनी तिच काम बर व्हत न्हाइ म्हून बंगाळ लागत. आपून समदी नवीन मानस त्यांचे संग आलोत येबी अच्छिरच दिसता या !

**खिसमतगार.**–तुमी बी मजसारख्या नव्याच हात तर बर असो. बाईच ह्मायर तर लइ लांब इंदुरास हाय. तर मग तुंमचेनी म्योन्याबरोबर थितवर कस चालव-ल ? घोड्यावर न्हाइ तर गाडीमंदी बसन्याचा इचार करावा कीं, न्हाइ ?

**कोयना.**–त्या कुट मला चाल म्हनत्यात ? मीच आपली सकाळपून चालत्येया. त्येनीं घोड दिलया, समद केलया. पन ( इतक्यांत पांच पंचवीस घोडे स्वारांची टोळी पाहून ) त्ये कोन लोक येत्यात बर ? बाइसाब एकट्या गेल्या तकड तरी जाऊ का ?

**खिसमतगार,**–त्या टोळीकडे अमळ लक्ष लावून पाहून ) अं: सवारांची टोळी वाटन चाललिया वाटत. आपलेकड त्ये कशाला येतील.

असें ह्मणतो आहे तों, ते स्वार अगदीं चाल करून म्यान्यापाशीं आले, आणि त्यांत काय काय आहे ? तें पाहण्यास भोई हरकत करूं लागले तेव्हां त्यापैकीं कितीऐकांस तरवारीनें तोडून व भाल्यानें भोंसकून पाडलें, त्यासमयीं त्यांचें कृत्य पाहून खिसमतगार वगैरेंची अगदीं दाणादाण होऊन गेली, तेव्हां कोय-ना पुतळाबाई गेली होती त्या आडोशाच्या जाग्याकडे धांवत गेली ; हें बंडवाले स्वारांनीं पाहिलें तेव्हां त्यांतले दोघेतिघे तिकडे गेले. तेथें पुतळाबाई तरुण व श्रीमं-

त्याची स्त्री सर्वांगावर दागिन्यांनीं भरलेली पाहून त्यांणीं काय विचार केला असेल, व त्या बाईची काय दशा झाली असेल, तिचें वर्णन करण्यापेक्षां वाचकांनीं कल्पनेनेंच ती मनांत आणावी, असें ह्मणून हें प्रकरण असेंच ठेवणें योग्य वाटतें.

---

## भाग १९.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें पुतळाबाई बंडवाल्यांचे हातांत सांपडली, तेव्हां त्यांस डागडागिने यांची लूट करण्यापेक्षां अधिक हेतु होता असें नाहीं, व तीही ब्रह्मावर्त सोडल्यापासून विरक्तता पावून जिवाची देखील बिलकूल परवा करीत नाहींशी झाली होती; मग डागडागिन्यांसाठीं कोठून काळजी करणार? परंतु बंडवाल्यांनीं तिचे खिसमतगारास ठार केलें, व कितीएक भोई मारले, आणि लुटालूट चालविली, तेव्हां जे डागडागिने तिला नकोसे झाले होते त्यांतून कांहीं तरी राहतील तर बरें असें तिला वाटूं लागलें. निदान आपले जिवाला तरी कांहीं इजा केल्यावांचून त्यांनीं सोडावें, म्हणून ती त्यांची अगदीं गयावया करून काकळूत करूं लागली.

पुतळाबाईचें स्वरूप साधारण व रंग काळसर होता तरी शरीरावर तारुण्याची टवटवी पूर्णपणें भरलेली दिसत असलेकारणानें, त्या बंडवाल्यांपैकीं कितीएक जवानीचे भरांत होते, त्या कितीएकांचे मनांत पराधीन अवस्था पाहून, तिजविषयीं लोभ उत्पन्न झाला

त्यांत मुख्यत्वेंकरून " जीवनप्रसाद " ह्मणून एक पुरभया जातीचा जमादार होता त्याचें मन तिचे ठिकाणीं इतकें गुंतून गेलें कीं, कांहीं तरी युक्ति करून हिला आपल्या हस्तगत करून घ्यावें, ह्मणून मोठे सदय अंत:करणाचा भाव दाखवून तिची बेअदबी किंवा छळणूक कोणीं करूं नये, यासाठीं त्याणें आपले बरोबरचे बंडवाले बारगिरांबरोबर पुष्कळच तंटा केला; तेंव्हां पुतळाबाईसही वाटलें कीं, हा कोणी पेशव्यांचे पदरचा मनुष्य असून आपणास ओळखिल्यावरून आपलें रक्षण करण्यास झटत आहे; ह्मणून ती त्याचे ह्मणण्यास मान देऊन कांहीं वेळ चालली. प्रथम हे बंडवाले आहेत असें पुतळाबाईस बिलकुल समजलें नाहीं. पहिल्यानें तिणें स्वार पाहिलें तेंव्हां तिचे मनांत आलें कीं, इंबीरराव यांस आपली दया येऊन त्यांनींच हे स्वार आपणास परत नेण्यासाठीं पाठविले आहेत, ह्मणून ती मनांत अमळ हर्षित झाली; परंतु त्यांनीं मारहाण चालविली तेंव्हां तिला वाटलें कीं कोणी चोरांची टोळी असावी. परंतु कोपनानें बंडाबद्दल कांहीं आफवा उठलेल्या घरीं असतांच वरचेवर सांगितलेल्या होत्या; तेंव्हां हे इंग्रजी छावणींतील शिपाई बंड करून चालले आहेत व वाटेनें लोक भेटतील त्यांस लुटीत आहेत असें तिचे समजूतीस आलें, तेंव्हां पुतळाबाईचें मन फारच गलबलून गेलें. ब्रह्मावर्ताहून निघते वेळीं माहेरीं जाण्याचें तिचे मनांत बिलकुल नव्हतें; परंतु बंडवाल्यांचे हातीं सांपडलें असें जेंव्हां तिला समजलें

तेव्हां तिला आपले माहेरीं जाण्यांत हा अडथळा झाल्यामुळें फारच वाईट वाटलें. पुढें काय करावें तें तिला सुचेना ? इतक्यांत "जीवनप्रसाद" जमादार याणें तिला आपल्या मानमान्यतेचा डौल दाखवून आपण रक्षण करण्यासाठीं प्राण गेला तरी देण्यास तयार आहों, अगदीं भीति बाळगूं नये असें तिचें सांत्वन करून तिला एके घोड्यावर बसवून आपले बरोबरचे कांहीं लोकांसहित अलाहाबादेचे रस्त्यानें चालला, इतक्यांत तिकडूनही एक बंडवाल्याची टोळी येऊन यांची त्यांची कांहीं मसलत होऊन दोनही टोळ्या मिळून दिल्लीकडे जाण्यास निघाल्या.

अलाहाबादेहून बंडवाल्यांची टोळी आली तींत शिपायांच्या कांहीं बायकाही होत्या त्यांस पाहून अमळसा पुतळाबाईच्या जिवांत जीव आला. कारण आपले बरोबरचीं सर्व माणसें भोई वगैरे नाहींशीं झालीं, तेणेंकरून तिला दुःख झालें होतें; परंतु त्यापेक्षांही जेव्हां जीवनप्रसाद याणें कोयना तिचे घोड्याबरोबर नेट करून चालत होती तिला देखिल वाट चुकवून मागें टाकलें तेव्हां आतां आपले जवळ ओळखीचें किंवा बिन ओळखीचें कोणीच बायको मनुष्य नाहीं, व पुरुषांचे जमावांत राहण्याची संवयही नाहीं; तितक्यांतून हे सर्व पलटणबारगीर, उर्मट व दांडगे, यांच्या बरोबर आपले एकटीच्यानें कसा निभाव लागेल ही काळजी तिचे मनांत उत्पन्न होऊन ती अगदीं गर्भगळित होऊन गेल्यासारखी झाली होती.

जीवनप्रसाद यांजबरोबर न जावें तर जिकडे तिकडे बंडाळ्यामुळें गडबड झाली आहे असें तिला समजून आलें होतें. तेव्हां दुसरा कोण मनुष्य येऊन काय घात करील याचाही तिला कांहींच भरंवसा वाटेना. जीव जाण्याचें तिला फारसें दुःख वाटत नसे; पण पातिव्रत्याचा भंग न व्हावा ह्मणून ती अगदीं मनापासून काळजी वाहत होती; परंतु अशा संकटसमयीं त्याचें रक्षण कसें होतें याचा तिला कांहींच मार्ग सुचेना. जीवनप्रसादाचें कपटी आर्जव जरी प्रथम तिला स्पष्टपणें दिसून आलें नाहीं तरी संध्याकाळीं मुक्कामास जेव्हां ते लोक एका दाट आबराईत उतरले तेव्हां त्या जमादाराचें हास्ययुक्त व मधून मधून विनोदयुक्त भाषण व तशीच त्याची एकांत जाग्याचे तजविजीसाठीं खटपट, हीं पाहून पुतळाबाईचे मनांत त्याविषयीं बराच संशय उत्पन्न झाला. जन्मापासून राजविलासांत तिचे दिवस गेले असले कारणानें सूर्याचें उन्ह किंवा रानचा वारा ह्मणजे काय याची कल्पना देखील तिच्या मनांत कधीं आलेली नव्हती; व लढाईच्या गोष्टी बुकांत वाचल्या होत्या किंवा लोकांचे तोंडून ऐकिल्या होत्या त्याशिवाय तिला त्या समजण्याचाही कधींच प्रसंग नसतां एकाएकीं तरवारी, बंदुका, पिस्तुलें यांची गर्दी तिचे चाकरमाणसांवर उडालेली तिणें पाहिली, तेव्हां अगोदरच तिचें अंतःकरण चकित झालेलें असून दुःखानें तळमळत होतें, सगळा दिवस अन्न नाहीं, तशांतून रात्रीं विश्रांतीचे ठिकाणीं जेव्हां तिणें असा

प्रसंग पाहिला तेव्हां अर्थातच कांहींवेळ तिची शुद्धिच निघून गेल्यासारखें झालें, व तिजवर भ्रांतीचें आवरण पूर्णपणें येऊन पडलें. मी आहें कोण ? जातें कोठें ? कोठून आलें ? हे लोक कोण ? यांणीं अशी मारहाण कां केली, वगैरेकडे तिचें लक्षच जाईना; परंतु मनोधर्मांचा चमत्कार अशाच प्रसंगीं विजातीय रीतीनें दिसून येतो. तशा कारणानें ती एकाएकीं देहभानावर येऊन विचार करूं लागली, तेव्हां तिला आपल्या पातिव्रत्यरक्षणापेक्षा कांहीं अधिक वाटत नव्हतें, तरी जेव्हां बंडवाल्यांनीं तिचे आंगावरून डागिने जबरीनें काढले तेव्हां तिचा लोभ जागृत झाला नव्हता असें नाहीं; परंतु त्याचा क्षणिक झटका निघून गेल्यावर सवतमत्सर व द्वेषभाव साधण्यासाठीं आपणास विनाकारण या दुःखांत दुष्ट वैऱ्यांनीं घातलें, असें तिचे मनांत येतांच क्रोधानें तिचे शरीरांत प्रवेश करून तिला संतप्त करून टाकलें. तेणें करून तिचे डोळे इंगळासारखे लाल होऊन गेले व सर्व आंगावर रोमांच उभे राहिले; परंतु इलाज काय करावा, हें जेव्हां तिला सुचेना. तेव्हां ती आपली अतिशय भयंकर स्थिति पाहून ईश्वराकडे डोळे आणि हात करून करुणा भाकूं लागली. तिचे डोळ्यांतून अश्रूंच्या धारा चालल्या होत्या, व हात पाय तर लटलटां कापूं लागले होते, तोंडाची बोबडी वळून गेली होती, अशा स्थितींत तिचा कांहीं वेळ गेला. जीवनप्रसादानें त्या बंडवाल्यांचीं गर्दी तिचे भोंवतालून दूर करून तिला त्रास देणारांस

धमक्या दिल्या होत्या, तेव्हां तिचे मनास इतके दुःखाचे प्रसंगींही किंचित आनंद वाटून जीवनप्रसाद याचे स्वरूपानें केवळ ईश्वरच आपणास सोडविण्यास आला असें तिला वाटलें, ह्मणून तिणें त्याचे बोलण्यावर विश्वास ठेवून येथपावेतों येणें केलें; परंतु तोच जीवनप्रसाद त्या रात्रीं मुक्काम झालेले आंबराईंत जेव्हां कुबुद्धिसूचक वर्तन करूं लागला, तेव्हां तिला तोच केवळ काळासारखा वाटूं लागला. जीवन-प्रसाद याची तशी वर्तणूक पूर्णपणें तिचे लक्षांत येऊन चुकली, तेव्हां जरी त्या दिवशीं तिला अगदीं उपोषण घडलें होतें, व सकाळपासून सर्व दिवसभर झालेले दगदगीनें व त्रासानें आणि उन्हानें तिचीं गात्रें अगदीं गलित होऊन गेलीं होतीं, व घोड्यावर बसून प्रवास करण्याची संवय नसले कारणानें तिचें सर्व आंगही इतकें ठणकत होतें कीं, तिला पडले जाग्या वरून उठण्याचेंही सामर्थ्य राहिलें नव्हतें, तरी तिणें संकटसमय जाणून तेथून पळून जाण्याचें मनांत आण-लेंच; परंतु ही गोष्ट कशी सिद्धीस न्यावी त्याविषयीं तिचे मनाचा निश्चय होईना. तिणें त्या टोळीबरोबर असलेले एका स्त्रीस आपले भीतीचें कारण थोडक्यांत व तांत्रिक रीतीनें कळविलें; परंतु तिचे दुर्दैवानें ती बाईही एके स्वाराची राखलेली औरत असले कारणानें हिणें आपलेसारखें व्हावें या बुद्धीनें, अशा चैनी शिपायी लोकांबरोबर मजा मारून सुख भोगून न घेतां व्यर्थ तळमळ करितां आहां म्हणून पुतळाबाई-

सच दोष लाविला. तेणें करून तर तिला नुसतें वाईटच वाटलें असें नाहीं, तर त्या जारिणी स्त्रीनें ती बातमी जीवनप्रसादास कळविल्यावरून त्याणें पुष्कळच अपशब्द बोलून तो पुतळाबाईचा पळून जाण्याचा प्रयत्न सिद्धीस न जावा म्हणून तिला अधिक बंदोबस्तांत ठेविलें. हें जेव्हां तिला दिसून आलें तेव्हां तिला अगदीं ' दे माय धरणी ठाय ' होऊन गेलें. पहिल्यानें नुसते संशयानेंच तिला भीति वाटत होती; परंतु तिला त्याचें तें अभिलाषबुद्धीचें प्रत्यक्ष स्वरूप आणि अंतःकरणापासून वाईट कामाचा हेतु हे जेव्हां दिसून आलें, तेव्हां त्या साध्वी स्त्रीचे मनांतील विचारांचें वर्णन करून दाखविण्यास लेखणी असमर्थ झाली आहे. सबब पातिव्रत्यभंग होण्याचें भय, तसेंच रक्षण होण्याची निराशा, व त्या पुरुषाचे अंतःकरणांतील दुष्ट हेतु, व ईश्वराचा दीन, अनाथ प्राण्याकडे ऐन संकटसमयीं डोळेझांकपणा, हीं पाहून तिचे मनांतील उत्पन्न झालेले तरंगांचा विचार सुज्ञ वाचकांनींच करावा.

---

## भाग २०.

नानासाहेब पेशव्यांच्या पदरीं तात्या टोप्या म्हणून एक मोठा उलाढाल्या ब्राह्मण होता. तो लाहनपणापासून अगदीं निकृष्ट आणि दीन अवस्थेंत असतां आपले बुद्धिसामर्थ्यानें मोठमोठीं शौर्याचीं कामें करून नानासाहेबांस फारच आवडता झाला होता. पेनशन मिळण्याची अगदीं निराशा झाली, तेव्हां तात्याटोप्या

यानेंच नानासाहेबांस मोठमोठ्या पराक्रमाच्या गोष्टी सांगून वीरश्रीस चढविण्याविषयीं झटून उद्योग चालविला होता. पेशवाई नष्ट झाल्यामुळें आपले सर्व हक्क नाहींसे झाले म्हणून नानासाहेबांस तळमळ सुटलीच होती. तितक्यांतून तात्याटोप्या यानेंही इंग्रजी राज्यांत ब्राह्मणांची किती दुर्दशा झाली आहे, याचें वर्णन तिखटमीठ लावून त्यांजपाशीं वारंवार करावें, आणि आपणाशिवाय आतां ब्राह्मणास त्राता कोणीच राहिला नाहीं. आपण मनावर घ्याल तर ब्राह्मणांचें महत्व वाढण्यास पुनः काय कठीण आहे? असें सांगून व पलटणी लोकांचे मनाचा, चरबी लाविलेले तोटव्याचे संबंधानें धर्माचें बाबतींत झालेला घोंटाळा वरचेवर नानासाहेबांस कळवून, आणि कानपूर, अलाहाबाद, लखनौ वगैरे ठिकाणचे पलटणींतील बिथरलेले नेटिव सरदारांची आणि नानासाहेबांची मध्यस्थीनें वरचेवर भेट करून देऊन, बंडाची हालचाल होतांच नानासाहेबांनीं बंडवाले लोकांस पैशाचा पुरवठा करावा, आणि त्यांणीं नानासाहेबांस राजे करून त्यांचे हुकुमानें वागावें असा सर्व बंदोबस्त तात्याटोप्या याणें करून ठेविला होता; तो प्रसंग जेव्हां येऊन ठेपला तेव्हां कानपूरचे बंडवाले अर्थातच नानासाहेबांस मिळाले. तसाच अलाहाबाद वगैरे ठिकाणांहूनही पुष्कळ लोक येऊन मोटा जमाव झाला, तेव्हां नानासाहेबांनीं आपले फौजेची व्यवस्था करण्यांत तात्याटोप्या यास मोटा अधिकार देऊन सर्व फौजेचा अधिकार त्याचे स्वाधीन केला,

आणि बाळासाहेब याजकडे सर्व खजिना व खर्चवेंच याची व्यवस्था ठेविली होती.

इंबीरराव याणें प्राप्त झालेले वैभवांत कांहीं तरी मोठें काम पतकरावें असें नानासाहेबांचे मनांत फार असे; परंतु नानासाहेबाचे विचार फारच कोते आहेत, व तात्याटोप्या शूर व धैर्यवान आहे खरा, पण नानासाहेबांसारखाच अति हूड, आणि अविचारी आहे व त्याचें प्राबल्य बंडावा उत्पन्न झाल्यापासून नानासाहेबांजवळ विशेष झालें, तेणेंकरून नानासाहेब आपले सांगण्याकडे आतांशा कांहींच लक्ष देत नाहींत, हें पाहून कांहीं अंशीं अंतःकरणाचें औदासिन्य दाखविण्यासाठीं व कांहीं अंशीं नानासाहेबांची आपणाविषयीं बेपरवाई पाहून इंबीररावाच्या मनांत रोष उत्पन्न झाला होता त्या कारणानें, कोणतेंही जोखमीचें काम पतकरण्यास तो सरदार कबूल झाला नाहीं; तेव्हां आपसांत एकमेकांचा विरुद्धपणा नसावा या हेतूनें बाळासाहेब इंबीररावाचें मन वळविण्याचे खटपटींत पडला होता, व तात्यातोप्या आणि इंबीरराव यांचें ऐक्य झालें तर नानासाहेब यांचे राज्यकारस्थानसंबंधीं आरंभिलेले प्रयत्नास अधिक मजबुती व स्थिरता येईल, असें बाळासाहेबांचे मनांत अगदीं बिंबून गेलें होतें, ह्मणून नानासाहेब जरी इंबीररावाची हेळणा करूं लागले होते, तरी बाळासाहेब त्यांचें मन वळविण्याचे कामीं अगदीं आळस करीत नसे.

बाळासाहेबाविषयीं सुभानरावानें इंबीररावाचे मनांत जो किंतु उत्पन्न केला होता, तो बाळासाहेबांस जरी

खुलासेवार समजला नव्हता, तरी हंबीररावाचे मनांत आपलेविषयीं कांहीं तरी विजातीय संशय उत्पन्न झाल्याचीं चिन्हें त्यास वरचेवर दिसून येत; परंतु त्याचा खुलासा होऊन त्याचे मनांतून असा वाईट संशय काढून टाकण्याचा बाळासाहेबास कांहीं उपाय सुचत नव्हता, ह्मणून बाळासाहेब आपले अंतःकरणांत फारच अजुरदा असे. ज्याअर्थी नानासाहेबाप्रमाणें हंबीररावास बाळासाहेब लहानपणासून वडील भावास योग्य असा मान देत असे, त्याअर्थी हंबीररावाच्या उभयतां स्त्रियांशीं बाळासाहेबांचें भाषण भावजईच्या नात्यास योग्य असें कधींही झालें नाहीं असें नाहीं; परंतु तेणेंकरून अति सलगीचा किंवा अमर्यादेचा प्रकार त्याजकडून कधींही झालेला नाहीं, अशी त्याचे मनाची पक्की खात्री होती. त्यामुळें आपलेविषयीं हंबीररावाचे मनांत कसा संशय आला, हें त्यास कांहींच समजेना. हंबीररावानें पुतळाबाईस घरांतून घालविल्यापासून तर बाळासाहेबाचे मनास फारच चटपट लागून गेल्याकारणानें तो पुतळाबाईस घालविण्याचें मूळ कारण काय याचे शोधास गुप्तरूपानें फारच प्रवृत्त झाला होता. आपले संबंधानें त्या बिचारीस असे हाल भोगण्याचा प्रसंग विनाकारण आला हें पाहून त्यास महद्दुःख झालें; परंतु ऐकिलेली बातमी खरी खोटी ठरविण्याचा व त्याचा परिहार करण्याचा त्यास कांहींच मार्ग सुचेना. पुतळाबाईचे मागोमाग जाऊन तिला साह्य केल्यास धरलेले संशयासच विनाकारण बळकटी येणा-

र, तेणें करून इच्छित फल जें हंबीरराव व पुतळाबाई यांस सुख लागणें तें प्राप्त होत नाहीं, तेव्हां तसें करून उपयोग नाहीं, असें त्यास उघड दिसून आलें. असा कितीएक दिवस त्या विचाराच्या घोटाळ्यांत पडला असतां, एके दिवशीं नानासाहेबांचे वाढलेले वैभवांत हंबीरराव कांहीं काम पतकरीत नाहीं तर त्याचे बद्दल आपणास तरी मोठे अधिकाराचें आणि प्राप्तीचें एखादें काम मिळावें म्हणून सुभानराव बाळासाहेब यास भेटण्यास आला. त्याचे संभाषणांत गुप्त बीज बाहेर पडलें त्याचा प्रकार असाः—

**सुभानराव**.—(ताबेदारीस योग्य असा मुजरा करून) बन्यासाहेबाचे मामा मी सरकाराप कहीबी उद्योग मिळवावा म्हून आलोया. ( हात जोडून ) किरपा केली पाहिजेल.

**बाळासाहेब**—सुभानमामा मी तुम्हांला ओळखिलें. तुमचें इकडे येणें जाणें फारसें नाहीं तरी मी बन्यासाहेबांकडे येतों तेव्हां तुम्हांला हमेष पाहतों, नाहीं कां ! बरें असो. तुम्हांला कोणतें काम पाहिजे ! तुमचें आतां म्हातारपण नाहीं कां झालें ! आतां तुम्ही चाकरी ती कोणती करणार आणि तितक्यांतून या राज्यक्रांतीचे धांदलींत तुमचा निभाव कसा लागेल ? याचा अगोदर विचार केला कां !

**सुभानराव**.—इचार त्यो काय करायचा होय. तुमासरके यजमान काम घिपाला राजी व्हतील तर ह्यो सुभानराव पापाप चाकरीबी करूनशानी दावील.

बाजीराव साहेबाप पुन्यामंदी दीडवरस मोदीखान्याच खारकान्यांत काम कस कस केलया त्यें सोनजीराव आमच म्हेवन असत तर तुमासनी सांगत. आतां त्ये दिसबी गेळ आन सगळच गेल. आतां आपल नाना-साहेब लई पुन्यपरतापी म्हून त्यांहिला देवान राजपद आज दिलया. तर आमचे सरिख म्हातार कोतारबी आसऱ्याखाली निभावल पाहिजेल दिसर काय ?

**बाळासाहेब.**–एकुण तर मग मोदीखान्यांत काम करण्याची तुमची मर्जी दिसते. फार चांगलें आहे. आज नानासाहेबांची भेट झाली म्हणजे गोष्ट काढून तजवीज करतों. ( इतक्यांत पुतळाबाईस घालविण्याचीं कारणें त्याजकडून चांगलीं व खरीं समजतील अशी कल्पना बाळासाहेबाचे मनांत येऊन ) पण सुमान-मामा, माझे मनांतून तुम्हांला कांहीं विचारावयाचें आहे. तुम्ही खरें सांगण्याचें वचन द्याल तर विचारितों.

**सुभानराव.**–( आपणास चाकरी मिळते म्हणून अतिशयित आनंदित झालेले मनानें ) जी सरकार, अस कुट झालया ? आपल्या पायाप इकत दिस हाये, पन कंदी वांइच नखभर तरी काई लबाडी लाताडी गवसलिया का ? बऱ्याबापूसनीबी का इचाराना ? आज इकतदी त्येच बापापसूनशानी संमद कामकाज करतोया त्ये सरकारासनी ठाव नाहींका काय ? आपुल्याला बुआ जनमापून लबाडी म्हंजी कशी असती त्ये ठावच न्हाई ! !

**बाळासाहेब.**–तुम्हीं खरें बोलाल ही माझीही खात्री आहेच. म्हणूनच मी तरी तुमच्या जवळ गोष्ट काढली. वचन द्या म्हणजे सांगतों. आणि जर तुम्हीं खरी हकीकत सांगितली तर मोदीखान्यांतील दरकदारीची असामी दोनशे रुपये पगाराची तुम्हांस खचित देववीन. त्याविषयीं तुम्ही कांहीं काळजी करूं नका?

**सुभानराव.**–(हें ऐकून तर फारच हर्षयुक्त झाला आणि ते कोणते कामांत खरें बोलण्याविषयीं वचन मागत आहेत त्याचा विचार न करितां) सरकाराप लबाड बोलूनशानी ढवळ झालेले केसांला बट्टा मजपून लागला असं कधीं तरी व्हइल? (त्याचे पायांकडे हाताचीं बोटें करून) या पायांच्यान मी सरकाराप खोट बोलनार न्हाइ. आतां तर झाल. तवढी दरकदारीची असामी ह्यो ताबेदारासनी करून देन्याच सरकारांनीं मनावर घेतल म्हनजे झाल. माझं दिसर काइ बोलन न्हाइ.

**बाळासाहेब**–ठीक आहे. त्याविषयीं तुम्हीं निर्धास्त असा; परंतु पहिल्यानें मला सांगा कीं, पुतळावहिनी आतांशा कोठें गेल्या आहेत हें तुम्हांला समजलें आहे कां?

**सुभानराव.**–(चपापल्यासारखा होऊन) जी सरकार आपले बाचे घरीं वाट लावलिया म्हून ऐकितों.

**बाळासाहेब.**–त्यांना माहेरीं वाटे कां लाविलें यांचें कारण तुम्हांला कांहीं माहीत आहे कां?

**सुभानराव.**–( अंमळ गांगरल्यासारखा होऊन ) न्हाईबा, आपून काई त्ये खटल्यामंदी न्हवतोबी. दादल्या बायकोचीच कायनु कुरबूर होऊन तकड गेल्याला बरा महिनासा व्हत आला असल.

**बाळासाहेब.**–(अमळ रागाची मुद्रा करून) सुभानमामा, पहा पहिल्यानें तुम्ही खरें बोलण्याचें वचन दिलें आहे, आणि माझ्याशीं गांठ आहे. तुम्ही म्हणाल कीं, हिकडे तिकडे करीन तर एकदम उचलून झाडाशीं टांगून फरमाशी मार देईन. ( तगदम्यानेंच ) त्या बिचारीचे दुःखाला तुम्हीच कारण झालां. ही गोष्ट तुम्हीं समजतां मला ठाऊक नाहीं काय? बोला लौकर, कीं देवडीवरील लोकांला बोलावून तुमची चांगली तजवीज करूं?

**सुभानराव.**–(बाळासाहेबाची ती रागाची मुद्रा पाहून आणि हा दोषारोपित शब्दांचा आवेश पाहून त्याचें सर्वांग कांपूं लागलें, आणि घाम सुटला. चाकरी न मिळाली तर न मिळो; पण या संकटांतून देव कसा सोडवील हीच त्यास काळजी पडली; परंतु पळून जावयाचें किंवा बाळासाहेबाबरोबर अमर्यादेचें भाषण करण्याचें सामर्थ्य नाहीं जाणून खरें सांगितल्यानें तरी सुटका होओ अशा समजुतीनें) महाराज, आतां आपल्या पायाप काईबी चोरीत नाहीं. पण ह्या गुलामावर दया करूनशानी ही गोष्ट बग्याबापूला कळवूं न्हाई इकतच मागन हाये. (रडूं लागतो.)

**बाळासाहेब.**–(रोषयुक्त वाणीनेंच) बरें आहे.

बोला लौकर सगळी हकीकत. पुतळावहिनी म्हणजे माझे बहिणीसारखी. मी तिला आईचा मान देत असतां व तिचे शाहणपणासाठीं तो मानही तिला सर्वथैव योग्य असतां तुमच्यानें हें असें खोटें काम कसें करवलें ! ! असो, मला सगळें कळलें आहे ; पण तुमचे तोंडून एकदां समजूं द्या म्हणजे झालें.

**सुभानराव.**–( यास बन्याबापूंनीं सगळें सांगितलें असेल तर आतां आपण चोरिल्यानें फुकट लबाडी मात्र येईल सबब खरेंच सांगावें अशा विचारानें ) मारा अथवा तारा, खर खर हाये त्ये संमद सांगतों, ऐकाव. इकड सरकारवाड्यामंदी मल्हारबा हुजऱ्या हाय न्हई, त्यासनी सुंदराबाईनें मथवून शानी त्यान पुतळाबाईची चोळी देऊन शानी ( त्याजकडे बोट करून ) सरकारच्या उशागती ठेवन्याच केल, आन मग शान त्यासनी ( बन्याबापूस ) सांगूनशानी मला बोहून इचारल तवा सुंदराबाइच्या भयान मीबी हित चोळी पायली म्हून म्हंगालों आन त्यांसनीबी गबासली. त्याजवरून शानी राग करून वाट लावून दिलिया. ( असें म्हणून त्याचे पाय धरून ) आतां या पायांनीं माझा अन्याव माफ केला पायझेल.

इकडे तात्या टोपा याणें नानासाहेबांचे सांगण्यावरून बारीक शोध काढतां काढतां, नाना साहेब कारकुनाचे खोलींत एकटेच पत्र वाचीत बसले असतां जें बोलणें त्यांणीं कांहीं दिवसांमागें ऐकिलें होतें तें मल्हारबा हुजऱ्याचे असून त्यानें लबाडीनें छपाविलें

असल्याची बातमी समजतांच ती नानासाहेबांस कळविली. आणि त्यांचा हुकूम घेऊन नानासाहेबाविरुद्ध कांहीं असल्यास त्याचे घरीं कागदपत्र सांपडतील अशा समजुतीनें पांच पंचवीस शिपाई घेऊन तो गेला होता आणि त्याचे घराची जप्ती करून त्यास कैद करून आपले समोर आणून विक्राळ मुद्रा करून त्यास म्हणतो.

**तात्याटोपी.**–मल्या मादर * * * सरकारवाड्यांत मसलती करून काय बोलत होतास त्याचा थांग लागूं देत नाहींस काय? तूं काय समजला आहेस. गांठ कोणाशीं आहे हें मनांत आण, आणि काय मसलत करीत होतास तें सर्व खरें सांग. नाहीं तर आतां तुला तोफेचे तोंडीं देऊन तुझें घरदार जाळून फस्त करितों. ( नागवे तरवारीचा हात उगारून ) बोल लौकर, कां करूं दोन तुकडे?

**मल्हारबा.**–( ती मुद्रा आणि तो शिपायांचा जमाव पाहून व वरचेवर गोरे लोकांच्या कत्तली वाड्यासमोर उडत आहेत तें मनांत आणून लपवालपवी करण्याचें अशा प्रसंगीं साधारण नाहीं, त्याअर्थीं आतां खरेंच सांगून काय निभाव लागेल तो लागो, अशा समजुतीनें अगदीं घाबरून गेला आहे, तरी धीर करून हात जोडून ) तात्यासाहेब, तुमचे पायांची शपथ मी कांहीं सरकारचे विरुद्ध मसलत करीत नव्हतों. अभयवचन मिळेल तर इत्थंभूत सगळें खरें खरें सांगतों.

**तात्याटोपी.**–पेशव्यांचे विरुद्ध खचित कांहीं नसेल

तर तुला मरणाची शिक्षा होणार नाहीं, इतकेंच वचन देतों. बाकीचें अभिवचन तुझे मसलतीचें स्वरूप पाहिल्यावांचून देववत नाहीं. ( छातीकडे तरवारीचा हात वळवून ) हा तात्याटोपी तुझें विनाकारण नुकसान कधीं करणार नाहीं हें तूं खूप समज, आणि काय असेल तें खरें सांग. चल बोल बोल लवकर, हूं.

**मल्हारबा.**–( जवळ कोणीं येऊं नये असें करून मग सांगूं लागतो. ) बन्यासाहेब यांची थोरली बायको ....बाईसाहेब यांणीं मला हजार रुपये देऊं केले, आणि धाकट्याबाई ह्या वाड्यांत आल्या ह्मणजे बाळासाहेबांचे महालांत जातात, असा वाड्यांत बोभाट करण्यास सांगितलें, व त्यांचा कांहीं जिन्नस बाळासाहेबांचे निजण्याचे खोलींत ह्मटले वेळेस सांपडावा असें करण्याचें मी पैशाच्या लालचीनें कबूल केलें. त्या बाबतींत बाळासाहेबांचा खिसमतगार सटवाजी याशीं त्या दिवशीं कांहीं बोलत होतों, दुसरें कांहीं नाहीं. हें खरें नसेल तर तुह्मी जी शिक्षा ठरवाल ती भोगण्यास मी आतां तयार आहें.

**तात्याटोपी.**–( या गोष्टीचाही शोध पाहिजेच होता ह्मणून अधिक उत्सुकतेनें ) ही तरी गोष्ट खरी कशावरून याचा पुरावा पाहिजे; मग खरें ह्मणेन. त्या बाईनीं तुला कांहीं दिलें आहे कीं काय ? आणि तो सटवाजी कोठें आहे ?

**मल्हारबा**.–त्या बाईनीं आपले कारभाऱ्याकडून दोनदां हजार हजार रुपये मला दिले आणि परवां

दोन पागोटीं, एक मला व एक सटवाजीसाठीं दिलें तें हल्लीं मजपाशीं आहे. हुकूम होईल तर आणून दाखवितों. मग तर झालेंना ?

**तात्याटोपी.**–अगोदर तूं जिन्नस बाळासाहेबांचे खोलींत नेऊन ठेविलीस कीं काय, व ती काय होती तें समजूं दे, व त्या जिनसेचें पुढें काय झालें तें तुला ठाऊक आहे कां ? तें सांग; मग ते रुपये आणि पागोटीं कोठें आहेत तीं पाहूं.

**मल्हारवा.**–एक जरीची नवीच शिवलेली चोळी त्यांनीं मजकडे दिली, ती मी सटवाजीपाशीं दिली होती. पुढें तीच चोळी त्याचा कारभारी सुभानराव याणें बातमी ठेवून जाऊन पाहिली आणि बन्यासाहेबांचे दृष्टीस पाडली. तेव्हां एक पुतळ्यांची माळ आणि तनमाणि हीं मला बक्षीस दिलीं आहेत. मी तुमच्या पाशीं कांहीं आतां चोरून ठेवीत नाहीं. तुम्हीं मारा अथवा पाहिजे तें करा. सरकारच्या विरुद्ध म्हणून मी कांहीं मसलत कधींही केली असेल तर देव आपल्याला जाळून भस्म करील.

**तात्याटोपी.**–( त्याजकडून रुपये व दोन पागोटीं व पुतळ्याची माळ आणि तनमाणि वगैरे सर्व मुद्देमालाचे जिन्नस आणून ) या जिनसा तुला त्या बाईनींच दिल्या अशाबद्दल पुरावा काय आहे ? ह्या तूं किंवा दुसऱ्या कोणी चोरून आणल्या नाहींत कशावरून ?

**मल्हारबा.**–सटवाजीदेखत सुभानरावानें दिल्या आहेत, पाहिजे तर त्यांना आणून विचारा ; मग तर

खात्री होईलना ? ते सर्वच खोटें बोलतील तर मग माझें नशीब ह्मटलें पाहिजे.

इकडे हंबीरराव कांहीं निमित्तानें आपले पैशाची व दागिनें वगैरेंची मोजदाद करीत असतां पांच चार हजारांची रोकड कमी व कांहीं दागिनें नाहींसे झाल्याचे संशयावरून कारकुनास धमकी देऊन विचारीत असतां सुभानरावानें कोणाला से दोन तीन हजार रुपये बक्षीस दिले व २०० पुतळ्यांची माळ आणि जडावाचा थोरला तनमणि हरवला ह्मणून कांहीं दिवसामागें बोभाटा केला होता. तोही दिल्याचें कारकुनाकडून समजलें; तेव्हां त्याचा शोध करीत असतां पेशव्यांचे वाड्यांत चाकरीचा लाग पाहण्यासाठीं सुभानराव गेले आहेत असें समजल्यावरून त्याचे दुष्टपणास योग्य शासन देण्यासाठीं तेथले तेथेंच त्यास कैद करवून कांहीं तरी शिक्षा देववावी असें रागाचे भिरिरीनें मनांत येऊन तिकडे जाण्यास निघाले तों वाटेंत मल्हारबा हुजऱ्याचे घराजवळ शिपाई पाहून तेथें काय आहे ह्मणून पाहण्यास गेले, तों तात्याटोपी याणें हंबीररावास पाहून एकीकडे नेऊन सर्व प्रकार सांगून त्या जिनसा त्यास दाखविल्या, तेव्हां हंबीररावाची मनोवृत्ती अगदीं तटस्थ होऊन गेली. पहिल्यानें नुस्ता चाकरी करण्याचे कामीं दगाबाजीविषयींच सुभानरावाचा त्यास राग आला होता; परंतु आपले बायकोचें विनाकारण नुकसान करण्याचे कामीं त्या जिनसा मल्हारबा यास बक्षीस देऊन त्याजकडून चोळी टाकविली, आणि

आपणास खोटेंच बनाऊन चोळी दृष्टीस पडल्याचे सांगितलें, येणेंकरून तर त्याचे पायांची आग मस्तकास जाऊन पोंचली. तो इंगळासारखा अगदीं लाल होऊन गेला, त्या दुष्टाचें काय शासन करावें आणि काय नाहीं हें त्यास कांहीं सुचेना. ही त्याचे मनाची स्थिति पाहून तात्याटोपी त्याचें सांत्वन करून त्यास ह्मणाला कीं, बाळासाहेबांचे कानावर ही गोष्ट घालून तेथे सुभानरावास आणवूं; मग त्यांचे विचारानें सरकारचे कानावर ही गोष्ट घालून या सर्व दुष्ट लोकांस योग्य शिक्षा करविल्या पाहिजेत, असें दोघांनीं ठरवून ते सर्व जिन्नस आणि मल्हारबा यांस घेऊन बाळासाहेबांकडे आले तों बाळासाहेबाचे पाय सुभानराव धरून त्यास विनवणी करीत आहे हें पाहून अमळ चकित झाल्यासारखे दिसले, परंतु हंबीरराव व तात्याटोपी यांस पाहून बाळासाहेब यांस किंचित् हर्ष व आपण ऐकिलेली चमत्कारिक गोष्ट सांगण्याची उत्सुकता त्यांचे मनांत एकेच समयीं उत्पन्न झाल्यामुळें तो सुभानरावाचे हातून आपले पाय झटकन सोडवून घेऊन त्या दोघांस सामोरा गेला, आणि हंबीररावाचा हात धरून बाहेरचे बाजूचे मोठे दिवाणखान्यांत खुर्ची होती तिजवर त्यास बसवून आपण एके खुर्चीवर बसला, आणि तात्याटोपी यास दुसरीवर बसण्याची खूण केली.

त्या तिघांचे भेटींत हंबीररावाचे घरच्या मनुष्यांनीं कशा मसलती करून पुतळाबाईस घालवून देण्याचा यत्न केला व त्या कामीं कोण कोण कशा

रीतीनें सामील आहेत याचा सर्व खुलासा समजल्यावरून आपणावरील दोषारोपाचें निरसन देवानें चांगले रीतीनें केलें म्हणून बाळासाहेबांस फार आनंद झाला. तसेंच ज्या मसलतीचे योगानें नानासहेबांचें मन अस्वस्थ झालें होतें ती उघाडीस आली व तींत त्यांचे संबंधाचें कांहीं नाहीं म्हणून तात्याटोपी यासही समाधान वाटलें; परंतु आपले वडील बायकोचा आणि फार दिवसांपासून पालन केलेले सुभानरावाचा दुष्टपणा फारच वाईट प्रकारचा दिसून आला त्यामुळें त्याविषयीं अतिशय राग व पुतळाबाईस माहेरीं वाटे लावून देण्यांत तिचा विनाकारण छळ व स्त्रियांचे मनास अति दुःख देणारें असें भाषण आपण बोललों याचा पश्चात्ताप, तसेंच या गोष्टी बाहेर पडल्यामुळें बाळासाहेबांविषयीं आपले मनांतील किंतु गेल्यामुळें झालेला आनंद यांचे घोंटाळ्यानें हंबीररावाचे मनाची काय स्थिति झाली असेल तिचें वर्णन करण्यापेक्षां वाचकांनीं तर्कानेंच समजावें म्हणून तें तसेंच ठेवणें अधिक प्रशस्त वाटतें.

---

## भाग २१.

नानासाहेब पेशवे यांस पलटणचे लोकांचे साह्यानें नवीन बनावलेले राज्यपदावर आपली स्थापना करून घेतांच मोठी कृतकृत्यता वाटली. मग अर्थांतच फौजेची व्यवस्था, तसेंच लढाईचे सामानाचा पुरवठा आणि राज्यकारस्थानी विचारांत पूर्ण शहाणे व माहितगार

अशा मनुष्यांचा संग्रह करण्याकडे त्यांचें लक्ष विशेष न राहिल्यामुळें ब्राह्मणभोजनें चालू करण्याकडे त्यांचें मन पदरचे भटभिक्षुकांनीं तेव्हांच वळवून घेतलें. मग काय !! नानासाहेबांचा नित्यक्रम पाहिला तर सकाळीं वडिलांचे संप्रदायाप्रमाणें मोठा पुजेचा थाट, रुप्याचे भांड्यां उपकरणासहित मांडलेला असून त्या सभोंवती रुप्याच्या समयांच्या जोड्या लावल्यानें जिकडे तिकडे चकचकाट दिसे. पूजास्थानाचे संनिध एकीकडें स्तुतिपाठक, शास्त्री, पंडित मंडळी बसलीच आहे. दुसरे बाजूस वैदिक ब्राह्मणांच्या झुंडीच्या झुंडी आशीर्वादार्थ येत जात त्यांसाठीं सोवळ्यानें बसण्याचे वेतानें कितीएक पाट मांडलेले असून शिवाय त्या दिवाणखान्याचे मधले बाजूस गवयाचें गाणें चालूच असे. मधून मधून नवीन नेमणुकी केलेले सरदार मुत्सदी आपआपले कामासंबंधी कांहीं मजकूर समजाविण्यासाठीं येत त्यांजपाशीं आपले वैभवाचे डौलानें कांहीं प्रसंगीं निरोपानिरोपीनें व कितीएकांशीं सांकेतिक रीतीनें थोडें थोडें बोलणें होऊन त्यांचें जाणें येणें चालूच असे. जवळ पांच चार शागिर्द पूजाक्रमाप्रमाणें गंध, तुळशी, फुलें, अभिषेकपात्र वगैरे जें साहित्य लागेल तें देण्यास तयारच असत. गुलाब, मोतिया, गुलछबू, सोनचाफा, वगैरे फुलांच्या आणि पांच, मरवा, दवणा, यांचे तुऱ्यांच्या परड्या भरलेल्या देवास वाहण्यासाठीं बाजूस ठेविलेल्या असत. त्यांचे सुगंधामध्यें उत्कृष्ट अगरबत्त्या पूजासंबंधानें लावून

ठेविलेल्या असत. त्यांचे वासाचें मिश्रण झालें म्हणजे तेथें बसलेले लोकांस त्या सुवासानें अतिशय आनंद वाटे. अशा रीतीनें सकाळचा वेळ सुमारें नऊ दहा वाजत तोंपावेतों गेल्यानंतर मग नित्यदानें वगैरे धर्मादाय घेण्यास आलेले ब्राह्मणांची संभावना दानाध्यक्ष यांचे विचारानें झाल्यावर आपले राज्याचे बळकटीकरितां कांहीं सप्तशतीचे पाठ व कांहीं होमहवनें करीत बसलेले व कांहीं नवग्रहांचे जप करीत बसलेले वगैरे अनुष्ठानाचे ब्राह्मण ज्या दालनांत असत तिकडे एक वेळ फेरी होऊन नदीतीरीं ब्रह्मयज्ञ करण्यास स्वारी सोंवळ्यानें पायांत खडावा घालून जाऊन तेथील नित्यकर्म आटोपून परत आली नाहीं तों ब्राह्मण भोजनाचीं तयारीच असे. मग जिकडे तिकडे ब्राह्मणांच्याच पंक्ति. त्यांकरितां शिसवीचे पाट, त्यांस रुप्याच्या फुल्या लावलेल्या असत. पाटांपुढें पाहिलें तर केळीचें साग्र सवाहात लांबीचें सुरळीचें सुंदर पान, त्यावर उजवे बाजूस निदान पांच सहा उंची उंची भाजा व कधीं अळवाच्या तेलवड्या व डावे बाजूस पांढरें शुभ्र मीठ व लगतच लिंबाची फोड व दहा पांच चटण्या व पांच चार कोशिंबिरी व बताशांचीं वगैरे कांहीं मसालेदार रायतीं व पंचामृत, तशींच कांहीं नुसतीं लोणचीं, व कांहीं फोडणीचीं, आंबे, लिंबें, माहळुंगें, पेरू, आंवळे, वगैरेचीं लोणचीं वाढलेलीं व त्यांच्या खालच्या अंगास सांडगे, कुरडया, पापड, पापडया, कधीं घोसाळ्याचीं वगैरे भजीं व कधीं वडे असत. शिवाय बुंदी, मोती-

चूर, जिलब्या, घिवर, श्रीखंड, बासुंदी, आटीव खीर यांतून निदान दोन तीन तरी उंचीं उंचीं पक्वान्नें रोज असत. पुऱ्या, पांढऱ्या किंवा पुरणाच्या अगर सांजाच्या पोळयाही मधून मधून कोणास लागल्या तर वाढवीत असत.

पान जरी एवढें मोठें असे तरी एकंदरीनें इतके पदार्थ वाढलें असत कीं, त्यावर कोठेंही दोन बोटें जागा रिकामी दिसत नसे. दर एका पानाचे बाजूस पांचपांच द्रोण, एकांत उत्तम कढी, एकांत मधुर व रुचकर केलेला मठ्ठा व एकांत गोळ्यांचें सांभारें व एकांत कधींकधीं आंबटी कधींकधीं सार आणि एकांत सुंदर ताजें लोणकढें तूप, भोंवताल्या महिरापदार वेलबुट्टीच्या रांगोळ्या व एका पानाआड पानावर उत्कृष्ट सुगंधिक उदबत्त्या लावलेल्या असत, तशाच मधून मधून समया लावलेल्या असत. आणि उष्णकाळाचे दिवस होते म्हणून ब्राह्मणांस वारा घालण्यासाठीं हातांत पंखे घेऊन कितीएक शागिर्दलोक मोठे तत्परतेनें उभेच असत, व अशा थाटाचीं जेवणें चालू असतां मधून मधून ब्राह्मण एकमेकांस मोठे आग्रहानें पक्वान्नें वाढवीत असत, आणि कोणी कोणी पेशव्यांचे मोठेपणाची नानासाहेबांस ऐकूं जाई अशी संधि पाहून स्तुति करीत असत. फार तर काय सांगावें तो ब्राह्मणभोजनाचे पंक्तीचा थाट पाहून मनाची संतुष्टताच व्हावी इतका उत्तम रीतीचा तो बेत रोज चालू असे.

अशा थाटानें ब्राह्मणांचीं सहस्रभोजनें चालू झालीं

तेव्हां संध्याकाळीं सर्व एकत्र जमले म्हणजे कितीएक वृद्ध ब्राह्मणांचे तोंडून उद्गार निघत कीं, ईश्वरा धन्य रे महाराज पेशवा बाजीराव आणि त्याचा पुत्र नानासाहेब ! ! पुण्यास बाजीरावाचे कारकीर्दींत ब्राह्मणभोजनें झालेलीं आह्मीं पाहिलीं; परंतु हा थाट आणि ही भक्ति अगदीं अतुल आहे ! ! कितीएक ब्राह्मण नानासाहेबांची स्तुति करून कोणी त्यांस विष्णूचा अवतार ह्मणत व कोणी भोळा शिवाचा अवतार म्हणत व कोणी ब्रह्मावर्तास इंद्रभुवनाची किंवा कुबेरपुरीची उपमा देत असत; तें नानासाहेबांचे समजुतीस आलें ह्मणजे त्यांस कृतकृत्यता वाटे.

अशा रीतीनें ब्राह्मणांचे स्तुतिपाठास भुलून नानासाहेबांचें विशेष लक्ष पूजा, ब्राह्मणभोजन वगैरेकडे लागलें, तेव्हां अर्थातच जनरल हावलॉक साहेब कानपूरचे लोकांचे सोडवणुकीस येऊन ठेपले तरी त्याशीं सामना करण्याची किंवा योग्य रीतीनें आपला व आपले घरचे मनुष्यांचा बचाव करण्याजोगी देखील तजवीज नानासाहेबांच्यानें होऊं सकली नाहीं. जनरल हावलाक साहेब व त्याबरोबरचे लोक यांणीं, कानपूरचे गोरे लोकांचा कत्तल बंडवाल्यांनीं उडविल्यामुळें कोणीही शिलक राहिलें नाहीं ह्मणून एकिलें तेव्हां त्यांचा आणि त्यांचे रागाचा आवेश काय पहावयाचा आहे!!! अगोदरच इंग्लिश लोक मांसाहारी यामुळें स्वाभाविक रीतीनें दयाळूपणांत कमी, तशांतून त्यांचे लोकांचा घात झालेला ऐकून ते फारच खवळल्यासारखे झाले;

तेव्हां इंग्लिश लोकांवर प्रीति करणारे मनुष्याच्यानेंही त्यांपुढें जाण्याचा इलाज चालेना ! ! जों जों कानपुरचे छावणींतील इंग्रज लोकांच्या हालांच्या गोष्टी त्यांचे कानावर जात तों तों त्यांतून खरें किती व खोटें किती आहे याचा कांहीं एक विचार न करितां त्यांनीं संतापून गरीबगुरीब बाया बापड्या व जे कोणी फकीर, बैरागी, सावकार, दुकानदार व संभावित मनुष्य वगैरे निरपराधी लोक हिंदुस्थानांतील रहिवाशांपैकीं सांपडत त्यांचे देखील हाल करावे. भलतेच मनुष्यास धरून त्यास बंडवाला समजून कैद करावें. तो आपला निरपराधीपणा स्थापित करूं लागल्यास त्यास बंदुकीचे दस्ते मारून खालीं पाडावें. कोणतेही हिंदु मनुष्यास विनाकारण बुटांच्या लाथा मारण्याचा तर गोरे लोक बिलकुल विधिनिषेध मानीनातसे झाले होते. हिंदुस्त्रियांशीं तर नीतिमान मनुष्यास लाज वाटेल अशी व त्यांचें पातिव्रत्य भंग होण्याजोगी वर्तणूक त्याजपैकीं कोणाकडूनही झाली नाहीं, असें ईश्वराला स्मरून शुद्ध अंतःकरणानें सांगणारे कोणी मिळतील तर त्या लोकांस श्रेष्ठत्वाचा मान देणें खचितच योग्य समजलें पाहिजे ! ! ! जितक्या तांत्रिक चौकशा झाल्या त्या सर्वांतून कितीएकांत न्यायाचा लेश देखील होता असें ह्मणवत नाहीं. हजारों निरपराधी हिंदु व मुसलमान लोक न्यायाचे मिषानें मारले गेले व शेंकडो तोफेचे तोंडीं देऊन ठार केले. कित्ती एक रस्त्यांतून जातां येतांच झाडाला टांगून फाशीं

दिले गेले. सोजीर लोकांनीं रागाचे आवेशांत किता-एकांस संगिनीनें टोंचून मारिलें तें एक परमेश्वर जाणे !! हिंदूंच्या बायका किंवा मुलें त्या हालांतुन सुटलीं असें त्यावेळची प्रत्यक्ष स्थिति पाहिलेल्या मनुष्याच्यानें म्हणवणार नाहीं. सारांश गुन्हा एकाचा आणि शिक्षा भलत्याला, अशीं उदाहरणें त्याप्रसंगीं हजारों घडलीं; परंतु निरपराधी मनुष्यांचे बचावासाठीं बोलणारा त्यासच प्रथम शिक्षा ! ! असा पाठच पडलेला पाहून त्याप्रसंगीं कोण आपला जीव धोक्यांत घालण्यास जातो ! आतां इंग्रजी फौजेचे लोकांस हा जो अतोनात राग आला होता तो विनाकारण, किंवा बंडवाल्यांनीं छावणींतील गोरे लोकाचे अन्यायानें व क्रूरत्वानें प्राण घेतले माहीत असें कोणी म्हणणार नाहीं; परंतु ते बोलून चालून अविचारीच. त्यांजकडून वाईट व निर्दय गोष्टी झाल्या म्हणून बंडवाल्यांचे देशांतील राहणारे व बंड झालेले ठिकाणीं कमनशिबानें त्यावेळेस असले कारणानेंच कितीएक लोकांचे प्राण गेले व घरादारांची नासाडी झाली हें पाहून कोणाही विचारी पुरुषास दुःख झाल्यावांचून राहील असें वाटत नाहीं. आतां अशा प्रसंगीं राग आवरणें किंवा शांततेनें न्याय करणें अथवा अपराधाचें तारतम्य पाहून क्षमा, शांति व दया यांचें अवलंबन करणें केवळ मोठ्या विचाराचेंच कृत्य समजलें पाहिजे; परंतु तसा कांहीं अंशीं तरी प्रकार होता तर ख्रिस्तियनधर्माचीं तत्वें जीं लोकांत प्रसिद्ध आहेत त्यांचा चांगला ठसा हिंदुलोकांचे

मनावर उठून त्या धर्माचें वर्चस्व न्यायी, चतुर व नीतिमान लोकांचे दृष्टीस पडल्यावांचून कधींही राहिलें नसतें. ज्या अर्थी तसें झालें नाहीं त्या अर्थी ख्रिस्तियन धर्माप्रमाणें, किंबहुना अधिक वजनशीर व मान्य करण्यास योग्य अशीं धर्मतत्वें हिंदुधर्मांत सांगितलेलीं असूनही त्यांचा अव्हेर करून ज्या नीच मनाचे हिंदूंनीं दुष्कर्म आचरून सर्वांस काळोखी आणली, त्या हिंदूपेक्षां दया व शांति यांचें मायघर जे ख्रिस्तियन धर्मानुयायी, न्यायी व राजाश्रित तज्जातीय लोक, ज्यांस अधिक प्रौढ व नीतीच्या मार्गास अवलंबून वागणं योग्य असतां, त्यांणीं तसें केलें नाहीं हें पाहून ख्रिस्तियनधर्माचें महत्व राखण्याचे ऐन प्रसंगींच तें नष्ट झाल्यानें त्या धर्माचा अभिमान बाळगणारांस दुःख झाल्यावांचून राहील असेंही वाटत नाहीं. आणि न्याय व नीति तसेंच चातुर्य किंवा संभावितपणा, अगर क्षमा, शांति, दया वगैरें सद्गुण ख्रिस्तियन किंवा मुसलमानी अगर हिंदुधर्म यांस अवलंबून न राहतां केवळ स्वतंत्रतेनें त्यापैकीं किंवा इतर कोणतेही धर्म आचरणारांचें अंतकरणांत वास करितात त्यास कारण त्यांचा धर्म नव्हे असेंही कित्तीएकांचे लक्षांत येऊन चुकलें असावें.

असो, याप्रमाणें परस्पर वैरभावाचे समरंगणांत अनाथ, दुर्बळ व निरपराधी लोकांची संख्या एकीकडे ठेविली तरी दोहींपक्षांकडील लढाऊ लोकांची नासाडी कमी झाली असें नाहीं. अलहाबादेस ओनील साहेब जनरलपणाचें महत्वाचें काम करीत असतां

राज्यव्यवस्थेचे मुख्यस्थानीं कांहीं घालमेल होऊन, जनरल हावलॉक साहेब यांची नेमणूक त्या जागीं होऊन, ते कानपुराकडे चाल करून आल्याचें नानासाहेब यांस समजतांच त्यांचेकडील बंदोबस्ताची जी धांदल उडाली तिचें वर्णन होणें दुर्घट आहे म्हटलें तरी चालेल. नानासाहेब आपले कडील अस्ताव्यस्त जमलेले फौजेच्या मोटेपणाच्या भरंवशावर आपणास अजिंक्य मानीत होते, व त्याच कारणानें फौजेकडील बंदोबस्ताकडे त्यांचें विशेष लक्ष जात नसे; परंतु जेव्हां त्या बारभाई, जमलेल्या सर्व फौजेंतील शिपायांनीं इंग्रजी गोरी पलटण व तोफखाना पाहिला तेव्हां ते अगदीं भयभीत होऊन गेले, कितीएकांनीं तर नानासाहेबांची चाकरी टाकून पळच काढला, कितीएकांनीं पैशाचा सर्व खर्च ब्राह्मणभोजन वगैरे दानधर्माकडे होतो म्हणून थकलेले पगार मागण्याचे मिषानें भांडण काढून नानासाहेबांस सोडून जाण्याचें योजिलें. मुसलमान होते त्यांणीं नानासाहेबांची हिंदुधर्माविषयीं भक्ति, व हिंदूचेंच मात्र कल्याण करण्याचा हेतु पाहून धर्मभेद दाखवून दिल्लीकडे जाण्याचा इरादा केला, व कितीएक नीतिमान व संभावित मनाचे सरदार होते त्यांस नानासाहेबांचें युरोपियन लोकांचें बायकामुलांस मारण्याचें अविचारी काम आवडलं नसल्यामुळें ते पहिल्यापासूनच नानासाहेबांपासून अलग झाल्यासारखे होते. त्यांस त्या प्रसंगीं नानासाहेबांचा पक्ष स्वीकारणें चांगलें वाटलं

नाहीं, तेव्हां अर्थातच चोहींकडे फाटाफाट झाल्या कारणानें नानासाहेबांजवळ त्यांचे रक्षणार्थ भरंवसा ठेवण्याजोगे फारच थोडे लोक राहिले कितीएक वेळ लढाया होतां होतां नानासाहेबांचे वाड्याभोंवतीं शेवटीं इंग्रजी फौजेचा गराडा येऊन पडला; तेव्हां ज्या ब्राह्मणांस शेंकडो रुपये खर्च करून सहस्रभोजनें नानासाहेबांनीं घातलीं, व ज्यांस उत्तम दक्षिणा, व शालजोड्या, धोतरजोडे, वरचेवर देऊन सुप्रसन्न करून घेतलें होतें, व ज्यांकडून आपलें महत्त्व वाढण्यासाठीं आपले धर्माचे आधारानें मोटमोठीं अनुष्ठानें करविलीं व ज्यांस मोहरा पुतळ्यांचे खिचडीनें संभावनेची दक्षिणा दिली ते सर्व ब्राह्मण त्यांस ऐनवेळीं सोडून चालते झाले, ज्यांस मोठमोठीं वतनें देऊन चाकरीस टेविलें होतें, व वाढविलें होतें व जे नानासाहेबांचे ऐश्वर्यावर लक्षाधीश बनले होते त्यांनींही त्यावेळेस आपलें तोंड चुकवून नानासाहेबांस सोडलें. कितीएक इंग्रजांकडून अशा प्रसंगीं आपणास अधिक लाभ होईल म्हणून नानासाहेबांस धरून देण्याचे इराद्यानें निमकहराम बनून इंग्रजी छावणींत रिघाव करून साहेब लोकांचे आर्जवास लागले. कितीएकांनीं नानासाहेब आतां उधळून जाणार असें पाहून त्यांचे वाड्यांतून डागदागिनें, द्रव्य व चांगल्या चांगल्या चिजा चोरण्याचा सपाटा चालू केला. ही सर्व स्थिति पाहून नानासाहेब अगदीं गांगरून गेल्यासारखे झाले. मी करतों काय? करावें काय? आतां माझा हितकर्ता

कोण ? शत्रू कोण ? आपला निभाव लागतो कसा व आपण इंग्रजांचे हातीं सांपडलों तर आपली दशा काय होईल, हें एकदम त्यांचे मनांत येऊन त्यांस कांहीं- च सुचेनासें झालें. तात्याटोपी व पूर्वघरचे बंधु बाळा- साहेब हे नानासाहेबांचे हितासाठीं फार झटून युद्धाचे कामीं होईल तितकी पराकाष्टा करून कानपुरचे छांव- णींत लढत होते; परंतु इंग्रजी फौजेस वरचेवर कुमका लौकर लौकर येऊं लागल्या कारणानें त्यांनीं जेव्हां "आतां निभाव लागणें कठीण, पळ काढला पाहिजे," असें नानासाहेबास निरोपानें कळविलें तेव्हां नानासा- हेबांस केवळ आकाशच कोसळल्यासारखें झालें. आतां आपली धड गत नाहीं म्हणून प्राणत्याग करण्याचें क्षणो क्षणीं त्यांचे मनांत येऊं लागलें, व शेवटीं एके दरवा- जावर इंग्रजी फौजेनें मोठे नेटाचा हल्ला करून आंत रिघाव केला असें नानासाहेबांस समजलें, तेव्हां नाना- साहेबांनीं आपलें शरीराची आहुति रिवाल्व्हर नामें पाच गोळ्यांचा एक पिस्तुल जवळ होता त्यास देण्याचा निश्चय करून, तो भरलेला पिस्तुल आपले उराबर धरून आतां त्याचे चापाचा घोडा दाबणार इतक्यांत हंबीरराव याणें त्या पिस्तुलाचे तोंडावर हात ठेवून तो त्यांचे हातचा घेतला आणि त्यांस बंधुत्वास योग्य अशा रीतीनें कंवटाळून धरून चोरवाटेनें वाड्याबाहेर उचलून एके ठिकाणीं कोणी मनुष्य नाहीं अशी जागा पाहून तेथें नेलें.

---

# भाग २२.

मागें सांगितल्याप्रमाणें जीवनप्रसाद जमादार याणें पुतळाबाईस कुमार्गास प्रवृत्त करण्याविषयीं आपले कडून होते तितके इलाज केले. कबूल न झाल्यास तिला मारून टाकण्याचें देखील भय दाखविलें, व त्याप्रमाणें अविर्भावही आणला; परंतु तिणें मोठे शांतपणानें आणि गांभीर्यानें पातिव्रत्य राखण्यासाठीं प्राणही खर्चण्याची तयारी केली आहे, हें पाहून ती जिवावर उदार असल्याची त्याची खात्री झाली. ह्मणून आपणावर तिचा विश्वास बसावा या हेतूनें त्याणें तिचे मर्जीविरुद्ध किंवा अकल्पित घाला घालून कोणतेही रीतीनें तिला त्रास देणार नाहीं, व तिला पाहिल्यानेंच आपणास संतोष वाटत आहे, यास्तव तिणें स्वस्थ आपले जवळ असावें अशी तिची समजूत घातली, व तिचे माहेरीं नेऊन घालविण्याची आशा दाखवून कोठें तरी योग्य ठिकाण पाहून आपल्या पापवासना तृप्त करण्याचा त्याचा हेतु होता. व त्याणें पहिला क्रम सोडून देऊन सचोटीचे डौलानें तिजपाशीं कपटानें वर्तनही कांहीं दिवस चालविलें होतें; परंतु तो बेत सिद्धीस जाण्यापूर्वींच असा चमत्कार झाला कीं ज्या बंडवाल्यांचे टोळीबरोबर ती फिरत होती त्या टोळीवर अकस्मात इंग्रजी फौजेची दौड आली आणि त्यांची यांची चकमक झडून बहुतेक बंडवाल्या शिपायांस धरून इंग्रजी सरदारांनीं कैद करून नेण्याची तयारी

केली, तेंव्हां त्याजबरोबर असलेल्या बायका मनुष्यांची चौकशी होतां होतां पुतळाबाईवर पाळी आली त्या-समयीं तिणें आपली खरी हकीकत होती ती यथास्थित जशी आठवली तशी त्या पलटणीचे मुख्य साहेबा-जवळ सर्व सांगितली, तेंव्हां तिचे बोलण्याचा सरळभाव व थोडक्यांत सांगण्याचें चातुर्य व शब्दगांभीर्य, व आपले हल्लींचे स्थितीविषयींचा समंजसपणा पाहून व सत्य आणि नीति यांविषयीं तिचा अभिमानही पाहून त्या साहेबाचे व त्या ठिकाणीं असलेले सर्व लोकांचें मनावर हिंदुलोकांतही कांहीं स्त्रिया फार विचारी व नीतिमान आहेत सर्वच केवळ अडाणी, असमंजस व पुरुषास काळिमा आणणाऱ्या अशा नाहींत, असा स्पष्टपणें ठसा उठल्यावांचून राहिला नाहीं; परंतु ती वेळ हिंदुजातीचे स्त्रियांवर देखील दया करण्याजोगी बिलकुल नव्हती, या कारणानें तेथें असलेले गोरे किंवा हिंदुलोक यांपैकीं कोणासही तिला साह्य करण्याचा विचार करवेना, तथापि तिला कैद करण्यापेक्षां सोडून देणें योग्य वाटल्यावरून एकदम सोडून देण्याचा ठराव मुख्य सरदारानें केला आणि तिला तेथें टाकून बाकी सर्व निघून गेले.

याप्रमाणें ती त्या दुष्ट जीवनप्रासादाचे कचाटींतून मुक्त झाली, तेंव्हां प्रथम तिला फारच आनंद वाटला; परंतु त्या छावणीचे आंबराईत ती एकटी राहिली तेंव्हां तिचे मनांत आलें कीं, आपली सुटका देवानें केली हें बरें झालें नाहीं. त्या जाग्याची भयंकर स्थिति अवलो-

कून व आपण कोठें आहों, व आपलें माहेर कोणते दिशेकडे आहे, किंवा ब्रह्मावर्त कोणीकडे राहिलें हें तिला कांहींच समजेनासें झालें, तेव्हां आतां काय करावें, अशा काळजीनें ती फार घाबरी झाली. जवळ पाहिलें तर केवळ एक वस्त्र नेसलेली होती तेवढें मात्र तिचे अंगावर होतें. बाकी छावणींतील सारे जिनस इंग्रजी टोळींतील बाजारबुणग्या लोकांनीं भराभर लूट करून नेले होते. तेव्हां आपलें माहेरीं जाणें होतें कसें ह्मणून तिचे मनांत प्रथम मोठें दुःख वाटलें, आणि गहिंवराचा हुंदका येऊन कंठ अगदीं दाटून आला. तथापि आणखी कांहीं वेळ ती विचार करीत असतां, तिचे मनांत आलें कीं, आपलें घर तर आतां सुटलेंच बरोबर असावी तशी वैभवाची सामग्रीही वाटेंत दुर्दैवानें नाहींशी झाली. आतां माहेरीं तरी जाऊन असें लाजिरवाणें तोंड दाखविण्यांत काय सुख आहे! बरें तिकडे न जावें तर असें भडकत फिरण्यांत पुन्हा एखादा पहिल्यासारखा दुर्घट प्रसंग आपणावर येणार नाहीं कशावरून? येथें आसपास खेड्यांत जाऊन रहावें ह्मटलें तर नांवलौकिक वगैरे सर्वांची छपावणी होईल; परंतु आंगांत असलेलें तारुण्य कसें छपलें जाईल? व येथें अन्नवस्त्रावांचून आपला निर्वाह कसा लागतो? मोल मजुरी करावी तर जन्मापासून संवय नाहीं, आणि जोड्यावांचून जमिनीवर चालणें देखील कठीण पडतें; मग मोलमजुरी आपणाच्यानें कशी होणार? आणि तशा स्थितींत मदांध कुमार्गी पुरुषांपासून वरचे-

वर उपद्रव होण्याचा संभव फारच आहे, असें मनांत आणून आतां अशा दुःखांत आयुष्य काढण्यापेक्षां जीव द्यावा हें बरें, असें वाटून ती त्याच विचारांत निमग्न झाली; परंतु पुन्हा मनांत आलें कीं, अन्यजन्मीं काय पातक केलें होतें तें भोगण्याकरितां या जन्मीं मी इतके विपत्तींत पडलें आहे, व याजन्मींही अशी आत्महत्या केली तर त्या पापासाठीं दुसरे जन्मीं इजा सोसावी लागणार नाहीं असें नाहीं. यास्तव तसेंही करणें चांगलें नाहीं. अशा विचाराचे घोटाळ्यांत ती आहे, तोंच जवळपास कांहीं घायाळ झालेले लोक विवळत पडलेले होते, त्यांच्या दुःखवेदनेच्या आरोळ्या आणि दीन व काकलूतवाणी स्वरानें परमेश्वराचा धांवा ऐकून त्या शब्दांनीं तिचें मन फारच वेधून गेलें, आणि परोपकारानें जसा ईश्वर संतुष्ट होतो तसा दुसरे कोणतेही गोष्टीनें होणार नाहीं, अशी तिच्या मनाची खात्री होती म्हणून मनुष्यप्राणी अशा दुःखांत तळमळत आहेत तर त्यांस परमार्थबुद्धीनें साह्य करणें आपलें कर्तव्य कर्म आहे असें समजून ती आपलें सर्व दुःख व संकट क्षणभर विसरून त्या आरोळ्या व करुणाशब्द ऐकूं येत होते तिकडे जाण्यास निघाली तों जवळच सुमारें २०।२५ वर्षांचे वयाचा एक मनुष्य उजवे पायाचे मांडींतून बंदुकीची गोळी पार गेल्यानें घायाळ होऊन घोड्यावरून पडल्यामुळें नाक तोंड ठेचलें जाऊन हिरवें निळें झालें आहे, आंगावरील सर्व कपडे रक्तानें भरले आहेत, डावे हातावर तरवारीचे एक दोन

निसटते घांव घातल्यामुळें तो हात अगदीं उचलवत नाहीं, रक्तस्रावानें तोंडाची कोरड वळली आहे, लढण्याचे हेतूनें कातडी पट्टा, कट्यार सुऱ्यासहित कंबरेस बांधलेला होता तो तसाच असल्यामुळें कंबरेत विशेष ताठा भरल्यासारखें झालें होतें, त्या इजेनें व लागलेले घांवानें दोन घटका बेशुद्ध होता तो शुद्धीवर आल्याकारणानें दुःखाचा अनुभव जास्त होऊं लागल्यामुळें त्याचे अंतःकरणांत मनस्वी तळमळ सुटली. म्हणून ईश्वरास त्या दुःखापासून सोडविण्यासाठीं हाका मारतो आहे असें पाहून पुतळाबाई त्याचे जवळ गेली, तेव्हां त्याणें तिजकडे डोळे उघडून पाहिलें. त्यासमयीं तो तशाही दुःखांत असतां मनुष्य आपले साह्यास आलें आहे असें त्यास वाटून किंचित आनंद झाला व ती स्त्री आहे असें जेव्हां त्याचे लक्षांत आलें तेव्हां कांहीं वयपरत्वें व स्त्रियांचे अंतःकरणांत साधारणतः दयेमायेची आर्द्रता अधिक असते, यास्तव अशा स्थितींतही तिचे समागमाची त्यास इच्छा होऊन तीस म्हणाला.

**घायाळ.**–अहो बाई, या वेळेस माझ्या तुम्हीं मातोश्री होऊन माझ्या तोंडांत थोडें पाणी तरी घाला हो. मरत्या प्राण्यास पाणी पाजलें तर तुम्हांला मोठें पुण्य लागेल, व तुम्हांला अक्षय सुख आणि सौभाग्य प्राप्त होईल. माझा प्राण कासावीस होत आहे पहा. ( असें म्हणून डोळे झाकून पुन्हा कण्हूं लागतो. )

**पुतळाबाई.**–( ती त्याची अंतकाळसूचक मुद्रा व

हृदय कळवळण्याजोगे शब्द आणि आसपास दुसरेही कितीएक जखमी झालेले लोक असेच तळमळत पडले आहेत व कितीएक प्रेतें होऊन पडलेलीं आहेत, अशी स्थिती पाहून तिचीही अंतःकरणवृत्ति अगदीं उदास होऊन गेली आणि या लोकांस साह्य करण्यांत यांचे बरोबर येथें आपलाही प्राण भुकेनें आणि तहानेनें गेला तर कांहीं वाईट नाहीं. अशा मनाचे कलानें त्या घायाळ मनुष्यापासून कांहीं अंतरावर उभी राहून सद्गदित अंतःकरणानें ) हे देवा, परमेश्वरा, या मनुष्याचे असे अंतकाळचे हाल पाहण्यास मला त्वां या ठिकाणीं कसें आणलें !! ( इतक्यांत त्याणें हातानें खूण केली, तेव्हां जवळ जाऊन ) बाबा, तुह्मांला माझ्यानें आतां कसें साह्य करवेल तें मला सुचत नाहीं. माझें आयुष्य कमी करून देव तुह्मांला या यातनेंतून उठवील तर मी आतां तसें करण्यास फार खुषी आहे. पण काय करूं!

**घायाळ.**—बाई साहेब, मला तुमचें आयुष्य आतां नको, मी मरणाचे दारांत उभा आहें माझ्या तोंडांत कसें तरी थोडें पाणी घाला हो ! जीव जात नाहीं. मी काय करूं, काय करूं ! !

**पुतळाबाई**–( हें त्याचें दुसऱ्यानें पाणी मागणें पाहून फारच विव्हळ झाली आणि लुगड्याचा ओंचा जवळचे विहिरींतून भिजवून आणून त्याचे तोंडांत पिळून त्यास ) देवानें या वेळेस पाणी आणण्यासाठीं मजजवळ भांडें देखील ठेविलें नाहीं ! मर्जी त्याची !

( अमळ त्याजकडे न्याहाळून पाहते ) आतां कांहीं बर वाटतें का ?

**घायाळ.**–बरें वाटतें; पण उन्हानें माझा जीव कासावीस होत आहे हो ! डोळे उघडत नाहींत. बोलवत नाहीं. तुमचा मुलगा समजून मला त्या झाडाचे सावलींत घ्याल तर मरतांना माझे जिवास सुख दिल्याचें मोठें पुण्य तुह्मांला लागेल. मोठे उपकार होतील ! अग आईग, अरे देवा ! बाई तुह्मींच मला आतां आईचे ठिकाणीं आहां हो ! माझी आई आतां कोठें राहिली ! मी आतां काय करूं, तिची माझी भेट कशी होईल ! ( असें ह्मणून पुन्हा डोळे झाकून कण्हूं लागतो. )

**पुतळाबाई**–( अशा प्रसंगीं परपुरुषाचे आंगास हात लाविला तर खचित दोष लागणार नाहीं अशा समजुतीनें त्यास मोठे कष्टानें उठवून बसावितें व कांहीं खुरडवीत व कांहीं ओढीत छायेंत घेऊन गेल्यावर. ) आतां अमळ विसावा घ्या, ह्मणजे तुह्मांला बरें वाटेल.

**घायाळ.**–( तिजकडे पाया पडल्याची खूण करून अहो बाईसाहेब, तुमचे उपकार मी किती मानूं ! माझे कमरेचा हा एवढा पट्टा काढा, माझ्यानें काढवत नाहीं. मी या वेळेस तुमचें अनाथ लेकरूं रानांत पडलेलों आहे. मी वाचलों तर तुमचा बंदा गुलाम होऊन राहीन. मी आपले कातड्याचे जोडे करून तुमचे पायांत घातले तरी तुमचे उपकार फिटणार नाहींत, पण मला अशा स्थितींत टाकून जाऊं नका.

**पुतळाबाई.**–( दयार्द्र दृष्टीनें त्याचा पट्टा काढून त्यापुढें ठेऊन त्यास म्हणते ) मी येथें तुम्हांजवळ राहून माझ्यानें तुम्हांस आतां काय साध्य होणार ? मजजवळ खाण्यापिण्याचें कांहींच सामान नाहीं, व तुमचे पायांस काय औषध करावें तें मला ठाऊक नाहीं, तेव्हां..

**घायाळ.**–( खिशांतून मोहरा पुतळ्यांची पिशवी काढून ) मातोश्री ! याचा मला आतां कांहीं उपयोग राहिला नाहीं. हें तुम्ही सर्व घ्या, आणि माझा प्राण जाईतों पावेतों घटका दोन घटका फार झालें तर लागतील, तों पावेतों मला सोबत करा. इतकेंच माझें आतां शेवटचें मागणें आहे. ( असें म्हणून पुन्हां जमिनीवर मान ठेवून कण्हूं लागतो. )

**पुतळाबाई.**–( जरी स्वतः जिवावर उदार झाली होती व त्या मनुष्याचे तशा अंतकाळचे स्थितींत त्याजवळ सोबत करण्यासाठीं राहण्याविषयीं इच्छायुक्त नव्हती तरी त्याणें पिशवी ओतली तेव्हां त्यांतील मोहरापुतळ्या पाहून तिचें मन लोभयुक्त झालें तें तिला समजलें नाहीं; परंतु वाटलें कीं, यास सोडून न जातां वाचविण्याची कांहीं तरी तजवीज होईल तर पहावी, म्हणून तो शुद्धीवर आला असें पाहून त्यास मोठे ममतेनें ) मी तुमच्या जवळ बसण्यासाठीं तुमचें द्रव्य घेऊं इच्छितें आहे असें नाहीं. माझे बसण्यानें तुम्ही वांचत असाल तर मी बसण्यास तयार आहें; परंतु उपाय केल्यानें

तुम्ही वांचण्याचा संभव आहे तर प्रयत्न करावा आणि तुम्हांस गांवांत घेऊन जावें हें मला बरें दिसतें. तुम्ही सांगाल तर मी हें द्रव्य खर्च करून तुम्हांस गांवांत नेण्याची तजवीज करून औषधपाणी वगैरे याची योजना करितें. परंतु येथें दुसरें कोणीच नाहीं, यास्तव मला तिकडे जाण्याची तुम्ही परवानगी दिली पाहिजे.

घायाळ.–( वांचण्याची आशा प्राप्त झाल्यावरून ) मला आतां कांहींच सुचत नाहीं. तुम्हांला मी वांचेन असें वाटत असेल तर प्रयत्न करण्याची तुमची मर्जी असल्यास करावा. मी नाहीं म्हणत नाहीं; पण ! ( बोलेनासा झाला. )

ही त्याची वरचेवर बेशुद्ध होण्याची स्थिति पाहून पुतळाबाई त्यास तेथें तसाच ठेवून धांवत धांवत जवळच एक कोसावर खेडें होतें तेथें गेली, आणि एक दोन वृद्ध म्हातारींशीं मनुष्यें पाहून त्यांस त्या मनुष्याची स्थिति सांगून त्यास गांवांत आणून उपाय केल्यास त्याकारितां जो खर्च लागेल तो करण्यास आपण तयार आहे, असें सांगून त्यांचे हातावर दोन दोन मोहोरा टाकल्या, तेव्हां त्या मनुष्यांसही लोभ उत्पन्न होऊन त्यांणीं एक पाळणा मिळवून दोघे तिघे मिळून तिचे बरोबर जाऊन त्यांनीं त्यास गांवांत आणिलें.

---

# भाग २३.

तारीख १५ जुलई सन १८५७ इसवी रोजीं जनरल हावलाक साहेब यांणीं कानपूरची छावणी आपले ताब्यांत आणण्याची तजवीज मोठे हिकमतीनें चालविली, तेंव्हां नानासाहेब अगदीं उदास होऊन आत्महत्या करण्याचे बेतांत असल्याचें मागें सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें नानासाहेब आतां आपला शेवट करून घेणार, इतक्यांत इंबीरराव यांनीं मोठ्या त्वरेनें जाऊन त्याचे हातांतील पिस्तुल घेऊन त्यांस, जवळ कोणी मनुष्य नाहीं अशा ठिकाणीं घेऊन जाऊन दोघांचे बचावासाठीं आपण वेषांतर करून येथून कांहीं लांब गेलों तर सर्व वैभव पुनः प्राप्त होईल अशी तयारी करून ठेविली आहे असें सांगून, त्यांणीं नानासाहेबांस मोठा धीर दिला, व शूरांनीं रणांत मरावें; आत्महत्या करूं नये, असें सांगून दोघांनींही वैराग्याचे वेष घेऊन व नानासाहेबाचे ठिकाणीं दुसरे एका मनुष्यानें राहून नानासाहेब गेल्याची बातमी न फुटूं देतां दोन दिवस काम कारभार चालवावा असा एक मनुष्य तयार करून त्यास नानासाहेब आजारी असल्याचे बाहण्यानें बिनराबत्याचे जाग्यांत राहण्याचें सांगून दोघेही मोठे हिकमतीनें ब्रह्मावर्ताहून निघून रातोरात पंधरा कोसांचे अंतरावर कांहीं लढाऊ लोक तयार करून ठेविले होते तेथें जाऊन त्या टोळीस मिळाले.

इकडे नानासाहेब गेल्याची खबर दुसरे दिवशीं

तात्याटोपी आणि बाळासाहेब वगैरे कानपूरचे छावणींत लढाऊ बंदोबस्ताचे घालमेलींत होते त्यांस समजतांच त्यांनां फारच वाईट वाटलें; परंतु करतात काय? नानासाहेबाचे ठिकाणीं जो मनुष्य ठेविला होता त्याचे सांगण्यावरून हंबीरराव नानासाहेबाबरोबर गेल्याचें त्यांस समजलें, तेव्हां हे लौकरच परत येतील किंवा भेटतील असें तात्याटोपी वगैरे सरदारांस वाटलें; परंतु लढाईची हालीमाली होतांहोतां कानपूरची छावणी इंग्रजांचे हातांत गेली, तरी वरचेवर हल्ले करून बाळासाहेब व तात्याटोपी यांणीं महिना पंधरा दिवसांत आसपासचीं कांहीं ठिकाणें पुन्हा घेतलीं; परंतु नानासाहेबांचा कोठें थांग लागेना, तेव्हां बाळासाहेबांनींही नानासाहेब जातांना आपले जागीं दुसराच कोणी मनुष्य नानासाहेब आहे असें खोटेंच उठवून ते गेले आहेत त्या अर्थी त्यांत कांहीं तरी हेतु आहे अशा समजुतीनें चालत आलेले बंदोबस्त जशाचे तसेच चालू आहेत, तर तसाच प्रकार पुढें चालविणें दोघांसही चांगलें वाटल्यावरून त्यांणीं तसेंच पुढें चालविलें आणि आपली कांहीं ठिकाणीं सरशी झाली पाहून पुण्याकडे रिघाव करण्याकरितां एक टोळी तयार केली व तिकडे जाण्याचा बंदोबस्त आरंभिला.

इकडे नानासाहेब पुन्हा कांहीं पलटणचे लोक मिळवून मोठी जमात जमवून इंग्रज लोकांची नासाडी करीत करीत दिल्लीकडे रोंख लावून चालले, तेव्हां आतां नानासाहेबांनीं पुनः संकटांत पडूं नये म्हणून

हंबीररावांनीं नानासाहेबाचे हिताचा असा पुष्कळ बोध केला; परंतु पुन्हा सत्तेचें ऐश्वर्य येतांच नानासाहेबांनीं त्याचा पहिलेप्रमाणें बेजुमान चालविला, तरी इमानी सेवकाप्रमाणें फक्त नानासाहेबांचे शरीरास इजा न होण्यापुरती तजवीज ठेवण्यासाठीं नानासाहेबांजवळ शस्त्ररहित केवळ हुजऱ्याप्रमाणें राहून हंबीरराव काळ काढीत होते.

असें होतां होतां सुमारे दोन महिन्यांनीं नानासाहेब मोठे डामडौलानें जमावासहित येऊन दिल्लीचे बंडवाल्यांस मिळाले. तेव्हां नानासाहेब आणि दिल्लीचे बादशाहाचा वजीर यांच्या भेटी वगैरे होऊन जेव्हां तेथील लक्षावधि बंडवाल्यांचा जमाव पाहिला तेव्हां नानासाहेबांस वाटलें कीं, आतां एवढे मोठे जमावाचा मोड होण्यास इंग्रज लोकांस फारच कठीण पडेल. आणि अशा समजुतीनें दिल्लीचे बादशाहाची पूर्वसंकेताप्रमाणें ताबेदारी पतकरून तेथें राहण्याचा त्यांणीं बेत केला.

त्या दिल्लीशहराची त्या वेळची व्यवस्था पाहिली तर तिचें पूर्णपणें वर्णन होणें अशक्यच दिसतें; परंतु वाचक लोकांचे मनाची निराशा करण्यापेक्षां अपूर्ण व तांत्रिक वर्णन केलें तरी तें अधिक ग्राह्य होईल, असें समजून थोडेसें करितों.

दिल्ली शहर पाहिलें असेल त्यांच्या लक्षांत येईलच कीं, राजवाडा व जुम्मा मशीद यांचे समोरचे रस्त्यानें दोहोंबाजूंनीं पाण्याचे नहर सदोदित वाहत आहेत.

व त्याचे बाजूनीं बाजारची रचनाही मोठे सुरेख रीतीनें केलेली आहे व त्याजवरून जाण्यास पुलासारखे जागोजाग रस्ते असल्यानें त्या नहरास विशेष शोभा येत आहे. शहरांत जागोजाग मोठमोठे वाडे तेथें वास करणाऱ्यांचे श्रीमंतीची जशी कांहीं साक्षच देत आहेत; तसेच मुसलमानी धर्माच्या भव्य इमारती पाहून त्या धर्माचेंही महत्व लोकांचे मनांत आल्यावांचून राहत नाहीं.

असें तें मोठें विस्तीर्ण व राजधानीचें नामांकित शहर त्यावेळेस बंडवाल्यांच्या टोल्यांनीं इतकें गजबजून गेलें होतें कीं, जिकडे पहावें तिकडे तोफा व बंदुका, तरवारी, स्वार, शिपाई, शिलेदार, आरब, पठाण, व पलटणचे लोकांचे कंपू वगैरेंच देखाव्यानें जसें कांहीं सर्व पृथ्वींतील शौर्य आणि त्याचीं साधनें त्या वेळेस त्या ठिकाणीं एकवटलेलींच आहेत कीं काय असा लोकांस भास होई.

दिल्लीच बादशाहानें हिंदु, मुसलमान वगैरे एतद्देशीय लोकांस जाहीरनाम्यानें प्रगट केलें होतें कीं, " सर्व युरोपियन लोकांनीं असा कट केला आहे कीं, नेटिव लोकांच्या पलटणी आहेत त्यांस प्रथम भ्रष्ट करून मग पुढें जुलूम जबरी करून त्यांजकडून ख्रिस्तीयन धर्माची दीक्षा घेववावी, व याच हेतूनें गव्हर्नर जनरल साहेबांनीं गाईच्या व डुकरांच्या चरबीचे तोटे देण्याचें काम मोठ्या युक्तीनें काढलें आहे. परंतु अशा रीतीनें या देशांतील चालत आलेले धर्माचा

उच्छेद होऊं नये व आमचे राज्याचे आश्रयाखालीं असलेले सर्व लोकांचा बचाव व्हावा व कोणावर जुलूम जबरी चालूं नये या हेतूनें सर्वांस सुख होण्याकरितां या कामांत आह्मीं हात घातला आहे, व काफर फिरंगी लोकांस निर्मूल करण्याचा यत्न चालविला आहे, तर ज्या ज्या पलटणचे लोक आपलेवरील युरोपियन अंमलदारांस मारून आमचेकडे येऊन मिळतील त्यांतील दरएक मनुष्याचे दरजाप्रमाणें सर्वांस दुप्पट पगार दिला जाईल. शेंकडों तोफा व लाखो रुपये बादशाही अंमलदारांचे स्वाधीन झाले आहेत, यास्तव आतां इंग्रज लोकांची बिलकूल भीति न धरितां ज्यास ख्रिस्तिधर्माचा अंगिकार करणें नसेल त्यांनीं खुशाल येऊन आमचा आश्रय करावा. त्यांस कोणतेही गोष्टीची ददात राहूं दिली जाणार नाहीं. जे कोणी भेभिस्तदणानें या जाहीरनाम्याचा फायदा करून नघेतां इंग्रजांचे जुलमाखालीं राहतील व त्यांचे खोटे खोटे वचनावर भरंसा ठेवतील, त्यांची दशा लखनौ एथील लोकांप्रमाणें होऊन ते फुकट फसले जातील. ”

"या जाहीरनाम्याच्या प्रति जिकडे जिकडे जातील तिकडे तिकडे प्रसिद्ध जाग्यांत लावून त्याची माहिती सर्वांस होईल असें करावें. हल्लीं दिल्लीचें राज्य नवीन व्यवस्थेप्रमाणें झालें आहे. त्याचे अमलाखालीं हरकोणी बारागिरीची चाकरी करण्यास येतील त्यांस निदान ३० रुपये व पायदळ पलटणींत चाकरीस राहतील त्यांस हमखान रुपये १० प्रमाणें पगार देण्यांत येईल."

याप्रमाणें दिल्लीचे बादशाहाचा जाहीरनामा लागल्या पासून बंडवाल्यांच्या झुंडीच्या झुंडी येऊन दिल्ली शहरांत व आसपास आश्रय करून राहूं लागल्या, त्यामुळें बादशहाची चोंहीकडे वाहवा होत चालली, इंग्रजी अंमलदार माफीचे व धर्माचे बाबतींत इंग्रजी राज्यांत कोणावर जुलूम होणार नाहीं म्हणून धूम जाहीरनाम्यानें लोकांस कळवूं लागले; परंतु त्या दिवसापावेतों त्याजकडून वर्शी वर्तणूक निष्कपट निर्वैरबुद्धीनें कधींही झाली नाहीं. अशी बहुतेक पलटणी लोकांची समज पडून गेलेली असल्याकारणानें इंग्रजांचे बोलण्यावर त्यांचा विश्वास पटेनासा झाला, "इंग्रजलोक आतां अडचणींत गुंतले आहेत ह्मणून अशी साखर पसरीत आहेत. परंतु त्यांचा अंमल चालू होऊन स्थिर स्थावर झाल्यावर यांतून किती वचनें टिकतील तीं पहा" असें सांगणारे जागोजाग असतच, तेव्हां जरी कोणी भरंवसा ठेवण्याचें मनांत आणूं लागलें तरी असे प्रश्न निघाले म्हणजे कितीएकांचे मनांची डळमळ होऊन जाई.

त्याच संधींत साठावी नेटिव पलटण इंग्रजी फौजेबरोबर दिल्लीवर हल्ला करण्यास आलेली इंग्रजाकडून फुटून बंडवाल्याकडे येऊन मिळाली, तेव्हां तर नानासाहेबास पूर्ण भरंसा वाटला कीं, आतां इंग्रजांचे पाय या हिंदुस्थानास पुनः लागणें नाहींत, अशा समजुतीनें नानासाहब खुशाल दिल्ली शहरांत लोकांस मेजवान्या करीत व लोकांच्या घेत आनंदानें काळ काढूं लागले.

असेही महिना पंधरा दिवस गेले इतक्यांत अंबाल्याहून इंग्रजांची मोठी फौज येऊन त्यांचा दिल्लीवर हल्ला करण्याचा ठराव झाला व त्यांस लौकरच मिरतचे फौजेकडूनही बरेंच साह्य मिळालें, तेव्हां इंग्रजी छावणींतील लोकांस केव्हां लढाई सुरू होईल आणि आह्मी केव्हां शत्रूचा सूड उगवूं अशी उत्कंठा प्राप्त झाली; परंतु करतात काय ? त्यांजबरोबर तोफा आल्या नव्हत्या, तोफा आल्यानंतर गोलंदाज नाहींत, गोलंदाज आले तर शिधा सामग्रीची तयारी नाहींशी झाली. तितक्यांत पुष्कळ लोक आजारी पडले; परंतु औषधाचा पुरवठा नाहीं; अशी त्यांची दुर्बल अवस्था पाहून त्यांजवरच उलटे हल्ले चालू झाले. सारांश निर्भयपणाची वर्तणूक चालविण्यांत बंडवाले नानासाहेब वगैरे सरदार यांस कांहींच भीति किंवा शंका वाटेनाशी झाली.

परंतु मध्यान्हीं आलेला सूर्य सदोदित तसाच राहणें अशक्य आहे. बंडवाल्यांचा भोळेपणा, सुस्ती व कोती दृष्टि ह्मणा किंवा इंग्रजांचें चातुर्य व चलाखी व हुशारी ह्मणा थोडेच दिवसांत इंग्रजी फौजेची जमवाजमव चांगले तऱ्हेची होतांच लढाईचा कडाका सुरू झाला. इंग्रजांस वरचेवर जय मिळूं लागले; तरी बंडवाल्यांचा मोठाच जमाव होता त्या अर्थी त्यांस जेरीस आणण्याचें एकाएकीं होईना व टोळ्यां मागून टोळ्यांची मदत इंग्रजांस येऊन पोंचली व हजारो बंडवाले मारले, तरी दिल्ली सर होणें मोठें दुर्घट असें त्यांस वाटूं

लागलें. परंतु तसाच प्रयत्न चालू राहून एक दोन दिवस मोठे नेटानें इंग्रजांकडून हल्ले झाले. तेव्हां बंडवाले हतवीर्य होऊन लढाईचा शेवट होऊन व दिल्लीचा बादशाहा इंग्रजांचे स्वाधीन झाला. त्याचे वाड्यांची जी विचित्र व मनोहर आणि बंदोबस्ताची सूचक शोभा व रचना होती तिचा विध्वंस होऊन एखादे मोडून पडलेले भयाण इमारतीसारखा तो दिसूं लागला, त्याचे कितीएक भाग जाळून टाकले गेले व कितीएक तोफेचे गोळ्यानें जमीनदोस्त केले गेले. उंची उंची लांकडी व बिलोरी सामान होतें त्याचे राईसारखे तुकडे होऊन गेले. राजघराण्यांतील बायका-पुरुषांची व चाकरनौकरांची अगदीं दाणादाण होऊन गेली. प्रेतांचा तर राजवाड्यांत आणि दिल्ली शहारांत केवळ सडाच होऊन गेला. दुसऱ्या मोठमोठ्या इमारती शहरास शोभा देत होत्या त्यांस कांहीं इजा झाली नाहीं असें नाहीं. सारांश चार दिवसांचे सतत लढाईमुळें जें शहर हिंदुस्थानांतील उत्तम स्थानांत गणलें जात होतें, त्याची दशा अति निकृष्ट खेडेगांवा-पेक्षांही वाईट होऊन गेली.

अशा घनघोर लढाईचे प्रसंगीं नानासाहेब पेशवे ज्या भागाकडून मुख्य होऊन लढत होते त्यांचा मोड लौकर झाला नाहीं ह्मणून तिकडे सर्वांचें लक्ष लागलें होतें; परंतु चोहींकडील लढाई बंद होऊन इंग्रजांचा भडमार त्यांचे टोळीवर वळला तेव्हां त्यांचा कांहीं इलाज चालेनासा झाला, तथापि शरण जाण्यापेक्षां लढून

मरणें त्यांस पसंत वाटून त्यांनीं जिवाकडे न पाहतां मोठा भडिमार केला. तो पाहून इंग्रजांकडील कितीएक सरदारांनीं त्यांचे लढण्याची आपआपले जागीं मोठी तारीफ केली, इतक्यांत नानासाहेबांचे उजवे हातास एक गोळी लागून, ते सगळे दिवसाचे श्रमानें अगदीं थकून गेले होते व लढाई चालू झाल्यापासून दोन तीन दिवस अन्नपाण्याकडे त्यांचें बिलकुल लक्ष नव्हतें. त्या कारणानें ते बेशुद्ध पडतांच त्यांचें बहुतेक लोक इंग्रजांस शरण गेले; तेंव्हां अर्थातच हे नानासाहेब पेशवे असें जरी लोकांस ठाऊक झालें नव्हतें तरी दिल्लीचे बादशाहाचे पदरचा हा कोणी मोठा शूर, सरदार आहे असें समजून लढाईचे रीतीप्रमाणें त्यांस इंग्रजी फौजेंतील लोकांनीं कैद करून आपले छावणींत आणिलें.

---

## भाग २४.

नानासाहेब घायाळ होऊन इंग्रजी फौजेचे अमलदारांनीं कैद करून नेल्याची बातमी हंबीररावांस समजतांच त्यांस फारच वाईट वाटलें व अन्नपाणी वगैरे कांहींच सुचेनासें झालें. नानासाहेब होते त्या ठिकाणीं हंबीरराव त्यावेळेस नसण्याचें कारण त्यांची प्रकृति दोन तीन दिवसांचें दगदगीनें फारच बिघडली असून ज्या दिवशीं लढाईचा शेवट झाला त्या दिवशीं सुमारें बारा वाजत तों पावेतों हंबीरराव नानासाहेबांजवळ होते; परंतु बारा वाजतां आंगांत अतिशय ताप भरला

उभें राहवेनासें झालें, तेव्हां आपलें कारणानें नानासाहेबांचे लढण्याचे कामांत व्यत्यय येऊं नये म्हणून व नानासाहेबांसाठीं कांहीं खाण्याचे पदार्थ तयार करून पाठवून देण्याची तजवीज करण्यासाठीं म्हणून हंबीरराव बिऱ्हाडाकडे गेले होते, व अमळ हुशारी वाटल्यानंतर पदार्थांची तयारी करीत आहेत, इतक्यांत त्यांस नानासाहेब धरले गेल्याची बातमी समजली; तेव्हां इतके दिवस जवळ राहून व्यर्थ, असें त्यांस वाटून फारच तळमळ लागली; परंतु करतात काय? कांहीं उपाय चालेना!!

मग त्यांणीं आपले जिवाकडे न पाहतां व नानासाहेबांचे नांवाचा बोभाटाही न करतां त्यास कोठें ठेविलें आहे व कसें ठेविलें आहे, याचा तपास लाविला. तेव्हां त्यांस समजून आलें कीं, इतर सरदारांबरोबर मानमरातबाप्रमाणें इंग्रजांचे छावणीलगतच एक मोठी हवेली बंदोबस्त ठेवण्याजोगी व मजबूत अशी होती, ती इंग्रजांकडील अमलदारांनीं आपले ताब्यांत घेऊन त्यांत बादशाहा व त्याचे पदरचे सर्व मानकरी वगैरे पदवीचे लोक कैदेंत ठेविले आहेत व त्यांवर गोरे लोकांचा खडा पाहरा ठेविला असून तिकडे कोणाचाही जाण्याचा रिघाव होण्याचा संभव नाहीं. फक्त कांहीं चाकर लोक मात्र खाण्यापिण्याचें सामान नेऊन देण्यासाठीं त्या कैदींचे कोठड्या कोठड्यांतून जात असतात, व डाक्तराबरोबर कांहीं लोक त्यांच्या जखमा धुण्याचे किंवा पट्या लावण्याचे कारणानें जातात.

ही बातमी हंबीररावास समजतांच त्याणें आपलें वेषांतर करून साधारण मनुष्याप्रमाणें तेथील दवाखान्यांतील हलकें काम करण्यासाठीं कांहीं नवीन लोक ठेविले गेले होते त्यांत चाकरी धरली, व डाक्तराबरोबर आजारी कैद्यांस पट्या वगैरे लावण्याचे निमित्तानें नानासाहेब कोणते कोठडींत कसे ठेविले आहेत तें सर्व माहीत करून घेतलें. मग इंग्रजी छावणींत त्या बंडांत धरलेले राजकैदींचे बंदोबस्तास अंमलदार होते त्यांचें मोठें मनधरणीचें आर्जव ( त्यांस न समजूं देतां ) करून त्यांचा भरंवसा संपादून कैदींस खाणेंपिणें देणारे नौकरलोकांत आपला रिघाव करून घेतला. असेही आठ चार दिवस गेल्यावर संध्याकाळचें खाणें देण्याची पाळी आपलेवर नानासाहेबांचे कोठडीची यावी असा बंदोबस्त हंबीररावांनीं इतर चाकर लोकांपैकीं कांहींचे संगनमतानें करून त्या दिवशीं बराच संभावित असा पोषाग करून मागील सर्व हकीकतीचें एक पत्र व कांहीं हजार हजार रुपयांच्या नोटी, व सुटका झाल्यास प्रथम कोणते ठिकाणीं जावें म्हणजे तेथें कोण भेटेल, व तेथून कोणते वाटेनें नेपाळाकडे कसें निघून जाऊन तेथें काय करावें ह्या सर्व सूचना तांत्रिक रीतीनें लिहून तोही लखोटा खिशांत ठेवून कैद्यांस रात्रीचें खाणें देण्यास गेले.

मग एक दोन कोठड्यांतील कैदींस खाणें पिणें देऊन सुमारें सात आठ वाजण्याचे वेळेस हंबीरराव नानासाहेबांचे कोठडींत आले, तेव्हां पाहरेकरी याणें

हंबीररावाबरोबर येऊन खाणें घालण्यासाठीं उभें राह-ण्याचा हेतु असल्यासारखें केलें. परंतु नेहमीं तसेंच दर कोठडींत करण्याचा कंटाळा आला आहे, व तो जातीचा सोजर, त्यास न समजूं देतां नानासाहेबांनीं शौचास बसून लांबण लावावी अशी हंबीररावांनीं नेत्रानें सूचना केली, तेव्हां नानासाहेबांनीं हंबीररावास ओळखलें, तरी त्याविषयीं कांहींएक मनोभाव न दाख-वितां मनांतले मनांत त्याचे धारिष्टाचें आश्चर्य करीत त्याचे सांकेतिक सूचनेप्रमाणें केलें; तेव्हां पाहरेकऱ्यास कपट माहीत नसल्या कारणानें व इतर कोठडीवरील त्याचे स्नेही पाहारेकऱ्यांनीं त्यास हाक मारलेवरून तो अमळ बाहेर गेला. इतक्यांत हंबीररावांनीं नाना-साहेबास आपला पोषाग घालण्याची विनंती करून एक अक्षर न बोलतां या संकटांतून निभाव झाल्यास निघून जाऊन खिशांत असलेले पत्राप्रमाणें करावें ह्मणून सांगून व गुलगलबा होऊं देऊं नये, कां कीं, बोलण्याचे कारणानें ही बातमी फुटूं देण्यापेक्षां मी सांगतों हें ऐकिल्यास दोघांचाही बचाव होईलच. नाहीं-पेक्षां एकाचा जरी बचाव झाला तरी चांगला व मी स्वामिभक्तीस उचित असें करून आपण होऊन स्वा-मीसाठीं आपले जिवावर उदार झालों आहें, तर अशा वेळेस ऐकण्याची एवढी शेवटली देणगी दिली पाहिजे. त्यांनीं नकार करूं नये असें ( त्या दोघांस नेत्रपल्लवी भाषा येत होती तिचे योगानें ) त्यांस कळवून निघून जाण्याचा मार्ग दाखविला.

नानासाहेबांसही आपण अशा अवघड ठिकाणीं सांपडलों हें फारच वाईट झालें. आतां येथून कोणतेही रीतीनें सुटका होईल तर चांगली असें वाटत होतेंच, व विचार करण्यास वेळ तर अगदीं राहिला नाहीं, त्या अर्थीं हंबीररावाचे मसलतीप्रमाणें करून आपली सुटका झाल्यास तो आपले आपण केलेले मसलतीनें न सुटला तरी त्यासही सोडविण्याचा आपणास प्रयत्न करतां येईल अशा समजुतीनें हंबीररावावर येणारे संकटाचा विशेष विचार न करतां संधीचा फायदा घेऊन पहारेकऱ्याची नजर चुकवून आंगावर तो पोषाग घालतांच त्या चाकराचे वेषानें नानासाहेब त्या कोठडींतून निघून गेले; आणि हंबीरराव नानासाहेबाचे ठिकाणीं राहिले.

नानासाहेब चाकराचे राहण्यासाठीं असलेले कोठडींत येतांच झाड्यास जाण्याचे निमित्तानें तेथून निघाले ते एकदम संकेतस्थानाकडे चालते झाले. ते हंबीररावांनीं सांगितले ठिकाणीं येतांच तेथें त्यांस ताजबी ह्मणून बादशाहाची सून मागें सांगितलेली ती राजघराण्याबरोबर कैदेंत सांपडली नव्हती ती हंबीररावाचे मसलतीप्रमाणें सर्व तयारी करून सिद्ध होती ती भेटली. मग तिचे मसलतीनें पूर्वी तयार असलेला स्त्रीजातीचा पेहराव करून ती व आपण मोठे चातुर्याचे हिकमतीनें रातोरात दिल्ली शहरापासून १२ बारा कोसांचे पल्यावर गेले. त्या ठिकाणीं हंबीररावाचे बंदोबस्ताप्रमाणें वेषांतराची व्यापारी बाह-

ण्यास शोभे अशी सर्व तयारी केली होतीच, सबब त्याप्रमाणें पेहराव करून नानासाहेब व ताजबी तेथून निघून नेपाळाकडे चालतीं झालीं.

नानासाहेब गेल्यावर हंबीरराव एकटे राहिले, तेव्हां नानासाहेब पहारेकऱ्याचे हद्दींतून पार जाईतों पावेतों त्यांचे जिवांत जीव नव्हता. पार गेल्यावर त्यांस अंमळ बरें वाटून आज आपण नानासाहेबांची मुक्तता केल्यानें कृतार्थ झालों असें मनांत येऊन प्रथमतः आनंद झाला; परंतु आपले प्राणावरची ही जोखीम पडली आहे हें लक्षांत आलें, तेव्हां प्रथम अंमळ त्याचें मन उद्विग्न झालें; परंतु नानासाहेबाकरितां आपला प्राण खर्च झाला तरी त्यांस सोडविण्याचें यश मिळविण्याचें त्यांचे मनांतून फार होतें ह्मणून त्यांस फारसें वाईट वाटलें नाहीं. त्यानें आपले सुटकेविषयीं तजवीज केली आहे ह्मणून नानासाहेबांस खोटेंच सांगून वाटे लाविलें; परंतु कांहींच तजवीज केली नसल्यामुळें पुढें ईश्वरावर हवाला ठेवून दैवानें काय होईल तें पाहण्यासाठीं स्वस्थ बसला. इतक्यांत इकडे कैदखान्याचे बंदोबस्ताचे चाकरींत ठेविलेला एक चाकर पळून गेल्याचा बोभाटा झालेला हंबीरराव यांनीं ऐकिला; परंतु त्यांनीं त्याबद्दल कांहींच गुलगलबल केली नाहीं. पुढें तपास चालतां चालतां तो चाकर पळाला नाहीं, त्यानें कैदीचे ठिकाणीं राहून राजघराण्याचे व दरबारचे कैदींतून एका कैदीस सोडविलें अशी माहिती चौथे दिवशीं हंबीररावास

इतर चाकरांनीं त्याचे कोठडींत पक्कें ओळखिलें तेव्हां बंदोबस्तास असलेले अंमलदारास समजली. मग काय विचारावें ? प्रथम त्याणें हंबीररावास सर्व खरी हकीकत सांगावी म्हणून लाथाबुक्यांखालीं अर्धमेलें केलें. तरी हंबीरराव रडत ओरडत व दुःख करीत; परंतु एक शब्दही बोलले नाहींत, तेव्हां त्यांस मोठे इजेचे कैदेंत ठेवून ज्यास मुक्त केलें तो पळालेला कैदी तरी कोण होता याची चौकशी इतर मार्गानें चालू झाली, तेव्हां मूळारंभीं अंमलदारानें कैदींचे केलेले यादींत त्यास बरोबर बातमी न समजले कारणानें पीर महंमद म्हणून बादशाहाचे पदरचा एक सरदार लढाई संपल्यावर नाहींसा झाला होता तोच आपण आहों, असें नानासाहेबांचे धोरणयुक्त नांव छपविण्याचे हेतूचे सांगण्यावरून, त्यांस त्या नांवानें, दाखल केलें होतें. त्यावरून, अर्थातच इंग्रजांकडील सर्व अंमलदार समजत होते कीं, नानासाहेब हा पीर महंमद आहे. सबब प्रथम पीर महंमद सुटून गेल्याची चोहीं-कडे बातमी पसरली; परंतु पुढें दोन चार दिवसांनीं तो पीर महंमदही जिवंत सांपडला; तेव्हां पळून गेलेला मनुष्य तो नव्हे असें पुष्कळांस दिसून आलें. सबब फारच बारकाईनें चौकशी पुन्हा सुरू झाली. कोणते कैदीस सोडवून वाटे लाविलें म्हणून पुष्कळ अंमलदारांनीं पुष्कळ रीतीनें हंबीररावांस विचारिलें; परंतु हंबीरराव त्या बाबतींत एक चकार शब्दही बोलत नसत. त्यांस मार तर दिले, उपाशी तर ठेविले,

तोफेचे तोंडीं देण्याचें भय तर दाखविलें; त्यांनीं कबूल व्हावें म्हणून त्यांचे कानाला व अं*ला चाप तर ला-विले, कधीं कधीं सुटका करण्याची आशा दाखविली व बक्षीसही देण्यास कबूल झाले, गांव इनाम देण्या-च्या सनदा त्यांचे पुढें टाकल्या; परंतु नानासाहेबांचें नांव सहसा सांगावयाचें नाहीं असा त्यांचा निश्चय झाला होता तो त्यांणीं अगदीं ढळूं दिला नाहीं.

हंबीरराव हा कोण मनुष्य व कोठील राहणारा याचा ही प्रथम कांहींच ठिकाण लागेना, तेव्हां इंग्रजी फौजे-चे अंमलदारांस त्याविषयीं अधिकाधिकच संशय उत्प-न्न होऊं लागला. शेवटीं कांहीं दिवसांपूर्वीं तो दिल्लीस आलेला इंग्रजी छावणींतील कांहीं लोकांस ठाऊक होता त्यांणीं ओळखल्यावरून, तो ब्रह्मावर्ताचा मनुष्य कांहीं दिवसांपूर्वीं दिल्लीस नानासाहेबांचे कामासाठीं आल्याची खबर वजीर वगैरेंचे सांगण्यावरून उघाडीस आली; तेव्हां पळालेला मनुष्य कदाचित् नानासाहेब असेल असा तर्क बहुतेक अंमलदारांनीं बांधला आणि त्यांविषयीं फारच शोध चालविला आणि हा हंबीररावच खरा आहे अशी शाबिदी होण्यासाठीं त्याच्या फोटोग्रा-फाच्या तसबिरी काढवून लखनौ, कानपूर वगैरे ठिका-णचे अंमलदारांकडे पाठविल्या.

हंबीररावास ठार मारल्यानें नानासाहेबांचा शोध लागण्यास व पळाल्याची शाबिदी होण्यास पुराव्याची कमताई होईल असें समजून त्यास चीफ साहेबांचे हुकूमावरून त्या राजकैदांचे मंडळांतून काढून विशेष

बंदोबस्तानीं निराळे जाग्यांत नेऊन ठेविलें आणि त्यास चौकशी होई तोंपावेतों अलाहाबादेचे बंदोबस्ताचे छावणींत ठेवावें म्हणून तिकडे त्यास रवाना करून दिलें.

इकडे पुतळाबाईनें ज्या घायाळावर दया करून त्यास गावांत आणलें तो तिचे माउसबहीणीचा मुलगा असें एकमेकांचे बोलण्यावरून समजल्यावर तिणें त्यास बरें करण्याविषयीं फारच खटपट केली. खर्चासही मागें पुढें पाहिलें नाहीं. परंतु कांहीं गुण पडेना. एक कमी होई तर एक अधिक होई, अशा रीतीनें संभाजीराव ( घायाळ ) याचा आजार वाढत चालला हें पाहून तो बरा होई तोंपावेतों तेथें राहणें पुतळाबाईस अवश्य झालें होतें.

अशा रीतीनें कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं पुतळाबाई संभाजीरावाचे खटपटींत असतां एक युरोपियन मडम दोन मुलें ( एक मुलगा व एक मुलगी ) बरोबर घेऊन रात्रीं सात वाजण्याचे सुमारास काळोखांत त्यांचे दाराजवळ अनओळखीप्रमाणें येऊन स्फुंदून स्फुंदून रडत उभी राहिली. त्यांची ती स्थिती पाहून पुतळाबाईचें अंतःकरण विरघळून गेलें. मग त्या मडमीस कांहीं हिंदुस्थानी भाषा येत होती. सबब त्या तिचे बोलण्यावरून बंडामुळें ती जीव घेऊन . . . . . . छावणींतून मुलांसहीत निघाली व दोन तीन दिवस रानांत पडून राहून त्यांणीं काळ घालविला. परंतु खाण्यापिण्याची सामग्री सरली व रानटी अवस्थेंत

राहण्याची संवय नाहीं ह्मणून झालेलं दु:ख ती मडम वर्णन करूं लागली; तेव्हां दोघींचेंही अंत:करण भरून आलें; डोळ्यांवाटें अश्रुधारा चालल्या; अशी त्या मडमेची दशा पुतळाबाईनें ऐकून आपणास भोगावी लागलेलीं दु:खें मनांत आणून तिणें जातिभेदाचा कांहीं एक विचार मनांत न आणतां आपले घरांत जी उत्कृष्ट बंदोबस्ताची जागा होती ती तिला व मुलांला राहण्यास दिली, व आपण त्या दोन मुलांप्रमाणेंच मडमसाहेबांची धर्माची मुलगी आहे असें तीस कळवून पुतळाबाईनें आपली सर्व हकीकत तिला सांगितली. ती हकीकत ऐकून नेटिव लोकांसही त्या बंडामुळें दु:खें भोगावीं लागलीं आहेत अशी त्या मडमेची समजूत होऊन तिनें मोठे आदरानें पुतळाबाईंचे नवऱ्याचे फोटोग्राफिक तसबिरीची अंगठी पाहिली आणि दैववशात् आपले कानपूराकडे जाणें झालें व इंग्रजांची सरसी झाली तर तिचे नवऱ्याची तिजविषयीं चांगलेपणाची खात्री करून देण्याचा पत्कर मोठे आनंदित मनानें त्या मडमीनें घेतला.

कानपुरास बंड होऊन ब्रह्मवर्त वगैरे ठिकाणची अगदीं धुळधाणी झाली. नानासाहेब पळून गेले वगैरेची बातमी त्या मडमेकडूनच पुतळाबाईस समजली, तेव्हां हंबीररावाची काय दशा झाली असेल याविषयीं तिचें मनांत नवीन काळजी उत्पन्न झाली; परंतु त्याचा ठिकाण लागणें तर आतां या मडमेचेच साह्यानें लागेल अशा समजुतीनें पुतळाबाई त्या मडमेशीं अगदीं

निष्कपट भावानें वागून तिची प्रीति आपलेवर कोणते रीतीनें अधिक जडेल तो प्रयत्न करूं लागली.

अशा रीतीनें ती मडम महिना पंधरा दिवस पुतळाबाईचे आश्रयानें तेथें अगदीं घरच्याप्रमाणें सुखांत राहिल्यावर पुतळाबाईचे चांगुलपणाविषयीं त्या मडमेस मोठेंच आश्चर्य वाटलें. व त्या दोघी फारच सख्यानें पुढें वागूं लागल्या. इतक्यांत त्या वाटेनें एक इंग्रजी फौजेची टोळी आली तींत त्या मडमेचा नवरा मुख्य अमलदार होता, ही बातमी पुतळाबाईस समजतांच त्याची आणि त्या मडमेची भेट पुतळाबाईनें मोठे मानमरातबीनें करविली. मग त्या मडमेनें आपले नवऱ्याचे भेटीमुळें आलेलें आनंदाचें भरतें निघून गेल्यावर त्याजवळ पुतळाबाईचे भलेपणाविषयीं फारच वर्णन केलें आणि जशी ईश्वरानें आपली दोघांची भेट करवून आपणास सुखी केलें आहे, तशी पुतळाबाईस तिच्या नवऱ्याची गांठ घालून देण्याचा उद्योग करण्याविषयीं त्याच वेळेस पुतळाबाईसमक्ष त्याजकडून वचन देववून त्या तिचे आंगठीवरील तसबिरीच्या पांच पन्नास प्रती ( यंत्र त्या जवळ होतेंच ) त्याणें करून आपले स्नेही इष्ट मित्र होते त्यांजकडे तशा चेहऱ्याचा व आपण लिहिलेले वर्णनाचा मनुष्य भेटेल तर कळविण्याविषयीं लिहून पाठवून, पुतळाबाईस संभाजीरावाचे प्रकृतीमुळें येण्याची सवड नाहीं म्हणून तेथें चांगले बंदोबस्तानें ठेवून तो साहेब आपली मडम व मुलें घेऊन निघून गेला.

# भाग २५.

इकडे हंबीररावाची रवानगी अलाहाबादेचे छावणींत बंदोबस्तानें ठेवण्यासाठीं व त्याची चौकशी होण्यासाठीं झाली. त्याप्रमाणें ते येऊन पोंचल्यावर कांहीं दिवसांनीं चौकशीसाठीं कोर्ट नेमिलें त्यांत ज्यानें जीवनप्रसादाचे हातून पुतळाबाइस सोडविलें होतें व ज्यास तिचे चातुर्याचें आश्चर्य वाटलें होतें तो एक साहेब असून दुसरा ज्या मडमेवर पुतळाबाईनें उपकार केले होते त्या मडमसाहेबांचा एक भाऊ होता. त्या दोघांकडे पूर्वी सांगितल्याप्रमाणें फोटोग्राफाच्या तसबिरींच्या प्रती आल्या असल्या करणानें जो मनुष्य त्यांचे समोर चौकशी करण्यासाठीं आणलेला आहे तोच साहेबांचे मडमेवर उपकार करणारे स्त्रीचा नवरा आहे, असें समजतांच त्यांनीं ती चौकशी पंधरा दिवसांचे लांबणीवर टाकून त्या साहेबास ही हकीकत कळविली; तेव्हां त्यानें तावडतोब स्वतः येऊन हंबीररावास पाहिलें, व तसबिरींतीलच हा मनुष्य आहे असें पक्कें समजल्यावर त्यानें हंबीररावांस खरें सांगितलें तर सुटणुकीची कांहीं तरी तजवीज होईल असें खात्री वाटण्याजोगें वचन देऊन व पुतळाबाईचे तोंडून ऐकिलेली हकीकत तिचें नांव न कळवितां आपणास चांगले आधारें समजली असल्याचें सांगून त्यांजकडून सर्व खरी हकीकत ऐकून घेण्याची इच्छा दाखविली; तेव्हां हंबीररावांनींही त्याची आपलेविषयीं आस्थापूर्वक

चौकशी पाहून व आतां नांव प्रगट केलें तरी नाना-
साहेबांस इजा होऊं सकणार नाहीं अशा समजुतीनें
व कैदेंतील जाचणीस त्रासून गेल्या कारणानें खरी
खरी हकीकत होती ती सर्व यथास्थित सांगितली;
तेव्हां हा स्वतः होऊन बंडाचे कामांत बिलकूल पड-
लेला नाहीं. फक्त नानासाहेबांजवळ एक विश्वासु चाकर
असून यानें लहानपणापासून त्यांचें अन्न खाल्लें आहे.
तर संकटसमयीं त्यांचे उपयोगीं पडावें ह्मणून स्वतः
मरणास तयार होऊन त्यानें आपला पिढीजाद धनी
नानासाहेब यास सोडविल्यांत अनीतीचा कांहींच गुन्हा
केला नाहीं, असें पक्कें त्यांचे मनांत येऊन त्यानें, चौक-
शी करणार दोघां अंमलदारांस खरी हकीकत कळवून
अशी वर्तणूक आपले तर्फेनें याच मनुष्यानें केली
असती तर खचीत तो बक्षिसास पात्र झाला असतां अशी
समज घेऊन त्यास सोडून देण्याचा घाट मोठे हिकम-
तीनें जमवून आणला. आणि ही गोष्ट बिलकूल
पुतळाबाईस कळूं न देतां तिला चांगले मानमरात-
बाप्रमाणें आणण्याविषयीं ती ज्या गांवांत राहिली होती
तिकडील सरकारी अधिकाऱ्यांस लिहून तिची रवानगी
अलाहाबादेस करून देण्याची तजवीज होईल असें केलें.

त्याप्रमाणें गांवचे अधिकाऱ्याकडून बातमी समजून
तजवीज होण्यापूर्वींच संभाजीराव याची प्रकृति अगदीं-
च बिघडून तो मरण पावला होता. तेव्हां पुढें काय
करावें याच विचारांत ती पडली होती. इतक्यांत सा-
हेबांकडील अलाहाबादेस जाण्याबद्दल बोलावणें आल्याचें

तिला समजलें; तेव्हां कांहीं तरी सुखाची आशा आहे अशा समजुतीनें तिकडे जाण्यास ती निघाली ती आठवे दिवशीं तेथें येऊन पोंचली.

इकडे पुतळाबाईचा बाप यास हंबीररावाकडून आपण पुतळाबाईस बिन अपराधी माहेरीं वाटे लाविल्याचें पत्र पश्चात्तापपूर्वक येऊन पोंचून ती माहेरीं जाऊन पोंचली असेल अशा समजुतीनें तिचे मनास दुःख न व्हावें ह्मणून त्याच पत्रांत एक तिचे नांवचें पत्रही पाठविलें होतें, त्यांतील हंबीररावाचे मनाचा शोक पाहतां हंबीररावाचे सासऱ्याचें मन अगदीं सद्गदीत होऊन गेलें, व आठ चार दिवसांत पुतळाबाई इंदुरास येऊन पोंचेल अशा समजुतीनें कांहीं दिवस त्याणं जाऊं दिले; परंतु ती आली नाहीं सबब शोधास माणसेंही तेथून पाटविलीं; परंतु कांहींच शोध लागेना. पुढें जिकडे तिकडे बंडावा झाल्यामुळें त्याचाही जीव थारीं नव्हता, यामुळें पुतळाबाईचे शोधाचा कांहीं इलाज झाला नाहीं. मग सप्तंबर महिन्यांत दिल्ली शहर सर करून इंग्रजी अंमल जिकडे तिकडे पूर्ववत् चालला, तेव्हां हंबीररावाचा सासरा देवराव खुद्द आपण कांहीं माणसें बरोबर घेऊन पुतळाबाईचे शोधास निघाला होता तोही त्याच संधानास अलहाबादेचे छावणींत आला.

इकडे तात्याटोपी व बाळासाहेब हे ब्रह्मवर्तावर इंग्रजांचा हल्ला झाला व कानपूरची छावणी त्यांचे स्वाधीन झाली तेव्हां पुण्याकडे येण्यास निघाले होते,

त्यांजबरोबर नानासाहेबांचें कुटूंब वगैरे बायका होत्या. त्यांतच हंबीररावाची मातोश्री बायजाबाई व पहिली बायको सुंदराबाई ह्या होत्या; त्या सर्व बंडवाल्यांचे धोरणानें अनियमित रीतीनें इकडे तिकडे फिरतां फिरतां फारच बेजार झाल्या. हें पाहून बाळासाहेबांसही वाटलें कीं जर अवघड प्रसंग आला तर हें बायकांचें लचांड बरोबर उपयोगी नाहीं. त्यांचेमुळें ओढाताण अधिक होऊन घातही लवकर होईल; व धरलें जाण्यास फार प्रसंग येतील. असें समजून त्या सर्व बायका एक दोन विश्वासु माणसें बरोबर देऊन यात्रेकरूंचे मिषानें अलहाबादेस पाठवून दिल्या. त्या आपलीं नांवें व मोठेपणा छपावून बचावास योग्य अशा रीतीची वागणूक करीत अलहाबादेत येऊन कांहीं दिवस राहिल्या होत्या; परंतु नानासाहेब कोठे आहेत, हंबीररावाची काय दशा आहे, व पुतळाबाई माहेरीं जाऊन पोंचली नाहीं ह्मणून तिचे बरोबरचे माणसांनीं कळविलें होतें. ती आतां कोठें आहे, व जिवंत आहे किंवा नाहीं, याची त्यांस कांहींच माहिती नव्हती.

हंबीररावाचे संबंधाचे सर्व माणसांचा जमाव याप्रमाणें दैवयोगानें अलहाबादेस झाल्याची कांहींच माहिती हंबीररावास नव्हती, व आपले चौकशी करणारे गोरे युरोपियन साहेब लोक त्या तिऱ्हाइत साहेबानें दिलेले वचनाप्रमाणें आपणावर दया करतील, हें त्यांचे स्वप्नींही वाटत नसे; सबब केव्हां तरी फांशीचा अगर तोफेचे तोंडीं देण्याचा हुकूम होणार याविषयीं

षयीं त्यांचे मनाचा अगदीं निश्चय होऊन गेला होता. यामुळें जसा फांशीची शिक्षा झालेला प्रामाणिक व शूर मनुष्य सर्व ऐहिक हवाला देवावर ठेवून आपणास मोटी जबर अशी शिक्षा करण्याचें देवाचे मनांत आलें आहे, तर स्वस्थ अंतःकरणानें ती भोगावी अशा उदार मनानें दिवस काढीत असतो, तसा प्रकार हंबीररावाचे अंतःकरणाचा झालेला होता.

आपलेविषयीं हंबीररावाची मनोवृत्ती बदलली असल्याची पुतळाबाईसही कांहींच माहिती नव्हती. म्हणून जेव्हां ती अलहाबादेस येऊन मडम साहेबाचे द्वारें साहेबास भेटली, व हंबीरराव जिवंत असून अशा अशा प्रकारानें कैदेंत आहे असें तिला समजलें, तेव्हां जरी हंबीररावांनीं आपणावर पहिले प्रमाणें प्रीतिभाव करण्याचें नाकबूल केलें तरी त्यांस कैदेंतून सोडून देण्याविषयीं पुतळाबाईनें त्या साहेबाची फारच पायधरणी केली; परंतु ती गोष्ट मान्य करणें आपणास कायद्यावरून योग्य होत नाहीं असा त्याणें बाह्यात्कारी प्रकार दाखवून पुतळाबाईकारितां त्या कैद्यास आपण सोडीत आहों, हा बोभाट न होऊं देण्याचे हेतूनें त्या साहेबांनीं कायद्याप्रमाणें चौकशीचे सर्व प्रकार चालू केले; तेव्हां हंबीररावांसही आतां जगण्यापेक्षां मरणें बरें आहे असें वाटलें; कारण कीं, पुतळाबाई जिवंत आहे हें त्यांस बिलकूल माहित नव्हतें व ती माहेरीं जाऊन पोंचली नाहीं, मध्येंच बंडवाल्यांनीं लुटालूट करून तिला धरून नेल्याची बातमी हंबीररावांस ब्रह्मावर्त

सोडण्यापूर्वींच लागली होती, व त्यापुढें त्यांचे सासऱ्याचेंही पत्र पुतळाबाई माहेरीं येऊन पोंचली नाहीं म्हणून ब्रह्मवर्त सोडण्यापूर्वीं आलें होतें; परंतु ती कोठें आहे याचा तपास अगर चौकशी करण्यास त्यांस कांहींच अवकाश मिळाला नाहीं. यामुळें तिजविषयीं ते अगदीं निराशच झाल्यासारखे होते. व अशा साध्वी स्त्रीस आपलेकडून बिनाकारण इजा पोंचली त्या अपराधाबद्दलच देव आपणास आतां मरणाची शिक्षा देईल तर बरें असें त्यांस त्या चौकशीचे समयीं वाटत असे.

हंबीररावांची चौकशी नेमली होती त्या ठिकाणापासून जवळच साहेबानें पुतळाबाईस एका आडोशाचे जाग्यांत आणून बसविलें होतें; परंतु खचित सुटका होईल असा भरंसा दिलेला नसले कारणानें तिचें मन फारच भीतींत होतें; तथापि सुटका व्हावी अशी त्या साहेबानें तजवीज ठेविली असेल असें वारंवार तिचे मनांत येई, म्हणून ती फारच उत्कंठितपणानें क्षणामागून क्षण मोजीत बसली होती.

त्या चौकशीचा शेवट झाल्यावर मुक्तेचा हुकूम होऊन त्याची सुटका झाली म्हणजे पुतळाबाईचे उपकार फेडण्यासाठीं आपण स्वतः हंबीररावांस नेऊन पुतळाबाईस आपले मडमेसमक्ष भेटविण्याचा बेत त्याणें (साहेबानें) अगोदरच करून ठेविला होता. त्याप्रमाणें चौकशीचा शेवट होतांच साहेबानें त्यांस आपले हातीं धरून जवळच दुसरे एके ठिकाणीं मराठी जाती-

स शोभे असा उंची पोषाग आणून ठेविला होता तो त्यांचे अंगावर घालण्याची त्यांस विनंती केली. हें पाहून हा काय प्रकार आहे व हा साहेब आपलें इतकें आर्जव करून कां बोलत आहे, हें त्यांस कांहींच समजेना. त्यामुळें हंबीरराव मनांत अगदीं चकित झाले होते आणि खचित तो कोणी तरी आपला हितकर्ता आहे अशा समजुतीनें ते त्याचे सांगण्याप्रमाणें पोषाग करीत होते.

इतक्यांत आपले जामात बंडाचे चौकशींतून सुटल्याची बातमी देवरावांस समजून त्यास भेटावें म्हणून ते फारच उत्कंठेनें त्या ठिकाणीं आले होते; व सुभानरावही सुंदराबाईबरोबरच हंबीरराव ब्रह्मवर्ताहून गेल्यापासून राहिलेला होता तो, कोणी कानपूरचे छावणींतला मराठा बंडाचे संबंधानें चौकशी होऊन सुटल्याची खबर ऐकून, तो कोणी आपले ओळखीचा आहे किंवा नाहीं हें पाहण्याचे हेतूनें त्या ठिकाणीं आ-ला होता; आणि तो कोण मराठा आहे त्याची चौकशी करीत आहे इतक्यांत त्या सर्वांची हंबीरराव पोषाग करून दार उघडून बाहेर येतांच दृष्टादृष्ट झाली; तेव्हां त्यांपैकीं कोणाचे मनाची कशी अवस्था झाली असेल, याचा विचार वाचणारांकडेच ठेवणें अधिक सोईचें दिसतें.

हंबीररावाची आणि पुतळाबाईची भेट त्या साहेबानें करविल्यानंतर त्याचेच तोंडून जेव्हां त्यास खचित दिसून आलें कीं, आपलें प्राणरक्षण हें केवळ पुतळा-बाईचे औदार्याचे वर्तनक्रमाचेंच फळ आहे. मग

पुतळाबाईचे सद्गुणांविषयीं इंबीररावांचे मनांत काय वाटलें असेल त्याचें वर्णन होणें अशक्यच आहे.

पुतळाबाईस इंबीरराव आपला अशा रीतीनें अंगीकार करतील असें स्वप्नींही वाटलें नव्हतें, सबब त्यांस भेटण्याचे कामांत ती फारच भयभीत अंतःकरणानें साहेबाचे मर्जीखातर व त्यांची सुटका होण्याचे हेतूस्तव कबूल झाली होती; परंतु जेव्हां इंबीररावांनीं तिचे सद्गुणांस योग्य असा मान देऊन तिचा अंगीकार करण्यांत त्या साहेबाचे अंतःकरणपूर्वक आभार मानिले तेव्हां, ती आनंदानें अगदीं वेडी होऊन गेली. आपण ज्या सुखाचा अनुभव घेत आहों तें स्वप्न तर नसेलना. असें तिला वारंवार वाटल्यावांचून राहीना ! !

त्या दोघांचे भेटीचा असा परिणाम होत आहे इतक्यांत देवरावही त्या ठिकाणीं येऊन पोंचल्यावर इंबीरराव व पुतळाबाई यांस एकेच ठिकाणीं व पुनर्जन्मासारखीं एकमेकांच्या भेटीचे आनंदाचे भरांत निमग्न झालेलीं पाहून त्यांस जें समधान झालें त्याचें पूर्णपणें वर्णन कोणाच्यानें करवेल ! त्याणें त्या दोघांस अतिशय प्रेमभावानें आलिंगन देऊन पोटाशीं धरलें आणि तीं तिघेंही हल्लीचा आनंद व मागील दुःख यांचे स्मरणानें कांहीं आनंदाश्रु व कांहीं दुःखाश्रु ढाळीत उकसाबुकशीं स्फुंदून स्फुंदून रडूं लागलीं. तेव्हां त्या साहेबास व त्याचे मडमेसही रडूं आवरेनासें झालें.

इतका प्रकार होत आहे तो इंबीरराव सूटल्याची

बातमी सुभानरावाचे तोंडानें सुंदराबाई व बापजाबाई यांस समजतांच त्या दोघीही त्या ठिकाणीं आल्या, तेव्हां त्यांणीं अकल्पित पुतळाबाई व तिचा बाप देवराव यांस पाहून व ते तिघेही एकमेकांचे गळ्यास मिठ्या मारून रडत आहेत हें पांहून त्यांचें मन किती चकित झालें असेल, याचा विचार वाचणारच करतील.

याप्रमाणें ईश्वरकृपेनें त्या सर्वांच्या भेटी होऊन साहेब व त्यांची मडम त्या ठिकाणांतून त्यांचा निरोप घेऊन निघून गेल्यावर, पुतळाबाईनें आपले दुःखाची सर्व हकीकत हंबीररावास थोडक्यांत सांगितली; व हंबीररावानेंही आपण कोणत्या संकटांत पडलों होतों तें त्या प्रसंगास योग्य अशा रीतीनें सासऱ्यास व पुतळाबाईस विदित केलें. इतक्यांत सुंदराबाई व सुभानराव एकीकडे उभे राहून आपले ठिकाणीं रडून फार आक्रोश करीत आहेत त्यांची समजावणी करण्यासाठीं पुतळाबाई पुढें गेली; तेव्हां हंबीररावानें त्या दोघांचें कपट कसें बाहेर आलें तें सर्व सांगून त्यांचें आपण तोंड पाहण्यास राजी नाहीं असें कळविलें; तेव्हां पुतळाबाई आपलेवर वाईट तुफानें घेणारांचे दुष्कर्माची उघाडी झाली, हें पाहून आपले स्वतःचे कामीं अंतःकरणवृत्ति प्रफुल्लित करून अधिक आनंद पावली. तरी आपलेकरितां कोणासही कांहीं दुःख होणें योग्य नाहीं असें तिचे मनांत येऊन तिणें हंबीररावाचे पायांवर डोकें ठेवून फार लीनपणानें आपले बापा-

देखत हंबीररावाजवळ मागणें मागितलें कीं, जेव्हां मला घालवून दिलें होतें, तेव्हां ( हातांतील आंगठी पुढें करून ) ही एक देणगी दिली होती; व दुसरी देणगी देण्याचा प्रसंग आला तर जें मी मागेन तें देईन ह्मणून वचन दिलें आहे; त्या वचनाबद्दल आतां इतकें-च द्यावें कीं, सुंदराबाईस अंतर देऊं नये. ती वडील सव[illegible] या कारणानें मातेसमान आहे; सबब, तिला दुःख झा[illegible]ने आपणास कधींही सुख वाटणार नाहीं, असें सांगितल.

तेव्हां सुंदराबाईस ते आपले हिताविषयींचे तिचे शब्द ऐकून असें झालें कीं, पुतळाबाईनें आपणास फांशी देण्याविषयींचें मागणें त्या वेळेस मागितलें असतें तर तें इतकें दुःखकारक झालें नसतें. त्याचप्रमाणें सुभानरावासही आपले पासून दूर ठेवून अन्नवस्त्राबद्दल कांहीं नेमणूक करून द्यावी ह्मणून पुतळबाईनें मागून घेतलें. अशा रीतीनें सदय अंतःकरणयुक्त व द्वेष-मत्सररहित पुतळाबाईचें मागणें पाहून हंबीरराव आणि तिचा बाप देवराव या दोघांस तो मोटा आनंदाचा दिवस प्राप्त झाला असें वाटलें. देवानें अशी सुजाण वायको आपणास दिली ह्मणून हंबीरराव, व अशी मुलगी आपले पोटीं जन्मास आली ह्मणून देवराव, यांनीं अनन्यभावेंकरून ईश्वराचा स्तव केला.

मग कांहीं दिवसांनीं हंबीरराव त्या साहेबाचा निरोप घेऊन आपले कुटुंबाचे सर्व मनुष्यांसहित आपले वतनाचे गांवावर येऊन राहिले; आणि पुतळा-

बाईचे सौजन्याविषयीं वरचेवर लोकांजवळ स्तुति करून अशी चांगली सुज्ञ बायको आपले या उतार वयांत देवानें आपणास दिली आहे, म्हणून आपली धन्यता ते लोकांस दाखवीत असत.

याप्रमाणें तीं दोघेंही परस्पर प्रेमयुक्त आनंदाचा उपभोग घेत असतां पुतळाबाईस एक पुत्र झाला, तेव्हांपासून तर हंबीरराव तिला आपलें केवळ कुलदैवतच मानूं लागले, म्हटलें तरी चालेल.

हंबीरराव आपले ठिकाणीं इतकी प्रीति ठेवीत आहेत हें पुतळाबाईस समजलें तरी तिणें आपली सुनीतीची आणि परोपकारबुद्धीची वर्तणूक पूर्वीपासून चालत आलेली अगदीं बिघडूं दिली नाहीं. तेणेंकरून त्यांचे वतनाचे गांवांतील सर्व लोक, पुतळाबाई ही केवळ देवीचा अवतार आहे, व हंबीरराव गारगोटीचे शोधांत असतां त्यांस हें रत्नच सांपडलें आहे, व तेणेंकरून सर्व गांव भूषित होत आहे, असें समजून तिला ईश्वरानें अक्षय सुखांत ठेवावें म्हणून वारंवार देवाची प्रार्थना करूं लागले.

समाप्त.